# जाती प्रथेचे निर्मुलन

# ANNIHILATION OF CASTE



- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# जातीप्रथेचे निर्मूलन

## (Annihilation of Caste)

## (हिंदूची जातीप्रथा व ती मोडण्याचा मार्ग)

म. गांधी यांचे परीक्षण

व

त्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उत्तर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
M.A., PH.D., D.sc., LL.D., D.LITT., BARRISTER-AT-LAW

प्रकाशक

**प्रबुद्धभारत प्रकाशन**

**नागपूर**

. Dr. Babasaheb Ambedkar writing & Speeches Vol No. 1
Annihilation of Caste च्या मराठी अनुवाद

# जातीप्रथेचे निर्मूलन

लेखक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

प्रकाशक : **प्रबुद्धभारत प्रकाशन**
पंचशिल नगर, बुद्धविहारा मागे, नागपूर-१७
मो.क्र. : ०९८५०३३२२९६

संगणक : मिरा काम्प्युटर
नागपूर

मुद्रक : श्रीसमर्थ ऑफसेट
नागपूर

मुखपृष्ठ : सोनु ग्राफीक
नागपूर

प्रकाशन तिथी : १४ एप्रिल २०१२

मूल्य ₹ : ५०/-

---

न्यायलय क्षेत्र
नागपूर न्यायालय

सत्य हे सत्य आणि असत्य हे असत्य जाणा

– तथागत गौतम बुद्ध

जो विवेक करु शकत नाही तो धर्मांध होय।
जो विवेक करु शकत नाही तो मूर्ख होय।
जो विवेक करण्याचे धैर्य दाखवित नाही तो गुलाम होय।

– एच. ड्रमंड

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेली

## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

मी हे भाषण मुख्यत्वे हिंदू जनतेचा विचार मनात ठेवून तयार करण्यात आले होते. लाहोरच्या जातपात तोडक मंडळासाठी मी तयार केलेल्या या भाषणाचे हिंदू जनतेकडून आश्चर्यकारकरीत्या उत्साहपूर्ण स्वागत झाले आहे. पंन्द्राशे प्रतीची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली व दोन महिन्यांच्या आत संपली. या भाषणाचे गुजराथीमध्ये व तामीळमध्ये अनुवाद होत आहे. मराठी, हिंदी, पंजाबी व मल्याळममध्ये त्याचे अनुवाद झाले आहे. इंग्रजी पुस्तकाची मागणी अद्याप न ओसरता चालू आहे. जरी मला सरळ निवेदनाच्या शैलीत हा निबंध पुन्हा लिहून काढावा असे सांगण्यात आले असले तरी, या भाषणाला ऐतिहासिक महत्त्व असल्यामुळे व मला विनंती करण्यात आल्यामुळे मला हा निबंध मूळ रूपात-म्हणजे भाषणाच्या रूपातच-ठेवावा लागत आहे.

१. या आवृत्तीत मी दोन परिशिष्टांची भर घातली आहे. श्री. गांधी यांनी 'हरिजन'मध्ये माझ्या भाषणावर परीक्षणवजा लिहिलेले दोन लेख आणि जातपात तोडक मंडळाचे एक सभासद श्री. संत राम यांनी लिहिलेले पत्र मी परिशिष्ट-एकमध्ये घेतले आहे. श्री. गांधी यांच्या परिशिष्ट-एकमधील लेखांच्या उत्तरादाखल मी माझी मते परिशिष्ट-दोनमध्ये छापली आहेत.

२. मी. गांधी यांच्या व्यतिरिक्त इतर अनेकांनी, माझ्या भाषणात मी अपेक्षा केल्याप्रमाणे, माझ्या मतावर प्रतिकूल टीका केलेली आहे. परंतु अशा प्रतिकूल अभिप्रायांची दखल घेताना मी श्री. गांधी यांच्यापुरतेच स्वतःला मर्यादित ठेवावे असे मला वाटते. मी असे करण्याचे कारण- ते जे काही बोलले आहेत ते उत्तर देण्याच्या लायकीचे आहे म्हणून नव्हे, तर अनेक हिंदूंना ते धर्मगुरू वाटतात, इतके महान की ते जेव्हा तोंड उघडतात तेव्हा वादविवाद थांबला पाहिजे व कोणतेही कुत्रे भुंकता कामा नये, अशी अपेक्षा करण्यात येत असते म्हणून. परंतु पोपच्या तोंडावर वादविवाद करण्याचे व तो अप्रमादशील नाही असे घोषित करण्याचे धाडस करणाऱ्या बंडखोरांचे जग फार ऋणी आहे. प्रत्येक पुरोगामी समाजाने त्याच्या बंडखोरांना किती श्रेय दिले, याची मी फिकीर करीत नाही. हिंदू हे भारताचे आजारी लोक आहेत व त्यांचे आजारपण इतर भारतीयांच्या आरोग्याला व सुखाला हानी पोहोचवत आहे, एवढे जरी मला हिंदूंच्या लक्षात आणून देता आले, तरी मला समाधान वाटेल.

- डॉ. बी.आर. आंबेडकर

# तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

या निबंधाची दुसरी आवृत्ती १९३७ मध्ये निघाली व अगदी अल्प कालावधीत संपली. फार काळापासून नवीन आवृत्तीची मागणी होत आहे. मे १९१७ च्या 'इंडियन अँटिक्वेरी जर्नल'च्या अंकात आलेल्या (कास्टस् इन इंडिया, देअर ओरिजिन अँण्ड देअर मॅकॅनिझम) नावाच्या माझ्या दुसऱ्या प्रबंधाचा यात समावेश करून हा निबंध पुन्हा लिहून काढण्याचा माझा विचार होता. परंतु मला वेळ मिळू शकला नसल्यामुळे व तसे करणे मला जमेल याची फारच थोडी शक्यता असल्यामुळे व लोकांकडून व तसे करणे मला जमेल याची फारच थोडी शक्यता असल्यामुळे व लोकांकडून याची सतत मागणी होत असल्यामुळे, मी केवळ दुसऱ्या आवृत्तीचे पुनर्मुद्रण करण्यातच समाधान मानत आहे.

हा प्रबंध इतका लोकप्रिय झाल्याचे पाहून आनंद वाटतो व तो ज्या हेतूने तयार करण्यात आला तो हेतू साध्य करण्यासाठी त्याचा उपयोग होईल, अशी मला आशा वाटते.

– डॉ. बी. आर. आंबेडकर

१ डिसेंबर १९४४
२२, पृथ्वीराज रोड,
नवी दिल्ली.

# पूर्वतिहास

१२ डिसेंबर १९३५ रोजी मला श्री. संत राम, सचिव, लाहोरचे जातपात-तोडक मंडळ यांचे पुढील पत्र मिळाले :

प्रिय डॉक्टर साहेब,

५ डिसेंबरच्या आपल्या पत्राबद्दल अनेक धन्यवाद. त्या पत्राला प्रसिद्धी दिल्याने कोणतीही हानी होणार नाही असे दिसून आल्याने आपली परवानगी न घेता मी ते वृत्तपत्राकडे प्रसिद्ध करण्यासाठी दिले त्याबद्दल मी आपली क्षमा मागतो. आपण थोर विचारवंत आहात आणि जातीच्या प्रश्नाचा आपण जितका सखोल अीयास केलेला आहे. तितका दुसऱ्या कोणीही केलेला नाही, असे माझे पूर्ण विचारांती मत झालेले आहे. आपल्या विचारांचा मला स्वत:ला व आमच्या मंडळाला नेहमीच फायदा झाला आहे. 'क्रांती' मध्ये मी त्याचे अनेकदा स्पष्टीकरण दिलेले आहे व आपल्या विचारांची शिफारस केलेली आहे. मी आपल्या विचारांवर अनेक परिषदांमध्ये व्याख्यानेदेखील दिलेली आहेत. 'जातीपद्धती ही ज्यावर आधारलेली आहे त्या धार्मिक कल्पना नामशेष केल्याशिवाय जाती तोडणे शक्य नाही' या आपल्या नव्या

विचारसूत्राचे स्पष्टीकरण वाचण्यास मी आता अत्यंत उत्सुक आहे. कृपया आपण शक्य तितकी सवड काढून सविस्तर स्पष्टीकरण करावे, जेणेकरून आम्हाला ते विचार घेऊन वृत्तपत्रांतून व व्यासपीठांवरून जोरदारपणे मांडता येतील. सध्या तो विचार मला पूर्णपणे स्पष्ट झालेला नाही.

आमच्या वार्षिक परिषदेसाठी आपण अध्यक्ष म्हणून राहावे, असा आमच्या मंडळांच्या कार्यकारिणीचा आग्रह आहे. आपल्या सोयीनुसार व्हावे म्हणून आम्ही आमच्या तारखा बदलू शकतो. पंजाबमधील स्वतंत्र मतवादी हरिजन आपणास भेटण्यास व त्यांच्या योजनांविषयी आपल्याशी चर्चा करण्यास अत्यंत उत्सुक आहेत. म्हणून तुम्ही जर आमच्या विनंतीचा कृपावंत होऊन स्वीकार केलात व परिषदेला उपस्थित राहण्यासाठी लाहोरला आलात तर त्यामुळे दुहेरी हेतू साध्य होईल. ज्यांचे मतभेद आहेत अशा सर्व हरिजन पुढाऱ्यांना आम्ही आमंत्रित करू व त्यांना आपले विचार ऐकवण्याची आपणास संधी मिळेल. आपणास ख्रिसमसमध्ये मुंबईत भेटावे व आपण कृपया आमची विनंती मान्य करावी व कार्यक्रमाविषयी आपली खात्री पटवून द्यावी या दृष्टीने सर्व परिस्थितीची आपल्याशी चर्चा करण्यासाठी मंडळाने श्री. इंद्र सिंह, सहाय्यक सचिव यांना प्रतिनिधी म्हणून नेमले आहे.

हिंदूंमधील जातीपद्धती नष्ट करणे हे एकमेव ध्येय असलेली जातपात-तोडक मंडळ ही सवर्ण हिंदू समाजसुधारकांची एक संघटना आहे, असे मला सांगण्यात आले होते. सामान्यतः सवर्ण हिंदूंनी चालविलेल्या चळवळीत कसलाही भाग घेणे मला आवडत नाही. सामाजिक सुधारणांबाबतचा त्यांचा दृष्टिकोण माझ्या दृष्टिकोणापेक्षा इतका वेगळा आहे की त्यांच्यासोबत काम करणे कठीण आहे, असे मला दिसून आले आहे. खरोखर आमच्या मतभेदांमुळे त्यांची संगत मला अगदी दुःसह होते असे मला दिसून आले आहे. त्यामुळे मंडळाने जेव्हा माझ्याशी प्रथम संपर्क साधला तेव्हा मी अध्यक्षपद स्वीकारण्याबद्दलचे त्यांचे आमंत्रण नाकारले. तथापि मंडळाने माझा नकार मान्य केला नाही व मी आमंत्रण स्वीकारावे यासाठी मला आग्रह करण्याकरिता त्यांच्या सभासदांपैकी एक सभासद मुंबईला पाठवला.

अखेरीस मी अध्यक्षपद स्वीकारण्याचे कबूल केले. वार्षिक परिषद लाहोर येथे, मंडळाच्या हेडक्वार्टरच्या ठिकाणी भरणार होती. ही परिषद ईस्टरमध्ये होणार होती, परंतु नंतर ती मे १९३६ च्या मध्यावधीत पुढे ढकलण्यात आली. मंडळाच्या स्वागत समितीने आता ती परिषद रद्द केली आहे. माझे अध्यक्षीय भाषण छापण्यात आल्यानंतर बराच कालावधी उलटून गेल्यावर ते रद्द केल्याचे कळविण्यात आले. या भाषणाच्या प्रती आता माझ्याकडे पडून आहेत. हे भाषण अध्यक्षपदावरून देण्याची संधी मला मिळाली नाही. त्यामुळे जातीव्यवस्थेने निर्माण झालेल्या प्रश्नावर माझी

काय मते आहेत ते समजण्यास लोकांना कसला वाव नव्हता. ती मते लोकांना समजून यावीत, तसेच माझ्याकडे पडून असलेल्या छापील प्रतींची विल्हेवाट लावावी, या हेतूने या भाषणाच्या छापील प्रती बाजारात आणण्याचे मी ठरवले. या सोबतची पृष्ठे त्या भाषणाच्या हस्तलिखिताची आहेत.

परिषदेचे अध्यक्ष म्हणून झालेली माझी नेमणूक कोणत्या कारणामुळे रद्द झाली, हे जाणून घेण्यास लोक उत्सुक असतील. सुरुवातीला भाषण छापण्यावरून वाद झाला. भाषण मुंबईत छापले जावे अशी माझी इच्छा होती तर काटकसर करण्यासाठी ते लाहोर येथे छापले जावे, अशी मंडळाची इच्छा होती. त्यास मी सहमत झालो नाही. मी ते मुंबईत छापावे असा आग्रह धरला. माझी सूचना मान्य करण्याऐवजी मंडळाच्या अनेक सभासदांनी सह्या केलेले एक पत्र मला पाठवण्यात आले. त्यातून मी पुढील भाग देत आहे.

२७/३/१९३६

पूज्य डॉक्टरजी,

श्री. संतरामजीच्या नावे लिहलेले तुमचे दि. २४ चे पत्र आम्हाला दाखविण्यात आले. ते वाचून आमची थोडेसे निराशा झाली. येथे निर्माण झालेल्या परिस्थितीची कदाचित आपणास पूर्ण कल्पना नसेल. पंजाबमधील बहुतेक सर्व हिंदू आपणास या प्रांतात आमंत्रित करण्याविरुद्ध आहेत. जातपात-तोडक मंडळाला अत्यंत कटू टीकेला तोंड द्यावे लागत आहे व सर्व क्षेत्रांतून निंदाजनक शिवीगाळ होत आहे. मंडळाने घेतलेल्या या निर्णयामुळे सर्व हिंदू पुढारी-ज्यांमध्ये भाई परमानंद, एमएलए (माजी अध्यक्ष, हिंदू महासभा), महात्मा हंसराज, डॉ. गोकलचंद नारंग (स्थानिक स्वराज मंत्री), राजा नरेंद्र नाथ (एमएलसी) इत्यादींनी मंडळाशी असलेला संबंध तोडला आहे. हे सर्व असले तरी जातपात-तोडक मंडळाच्या चालकांनी (ज्यांमध्ये श्री. संत राम हे अग्रणी आहेत) येईल त्या परिस्थितीला तोंड द्यायचे ठरवले आहे. परंतु ते अध्यक्षपदाचा विचार सोडून देणार नाहीत. मंडळाची बदनामी झाली आहे.

अशा परिस्थितीत मंडळाला सहकार्य करणे, हे आपले कर्तव्य ठरते. एका बाजूस हिंदुंनी मंडळाला इतका त्रास व कष्ट सोसायला लावले आहेत व जर दुसऱ्या बाजूस तुम्हीसुद्धा त्यांच्या अडचणीत भर घालत असाल तर मंडळासाठी ही गोष्ट दुर्भाग्यपूर्ण व अत्यंत दुःखदायक ठरेल.

आपण याबाबतीत विचार करून आपणा सर्वांसाठी जे योग्य असेल ते कराल, अशी आम्हाला आशा वाटते.

या पत्राने मला अगदी कोड्यात टाकले. भाषण छापण्याच्या बाबतीत

थोड्याशा रुपयांसाठी मंडळाने मला का नाराज करावे, हे मला समजेना. दुसरी गोष्ट, सर गोकलचंद नारंग यांच्यासारख्या माणसाने, माझी अध्यक्ष म्हणून निवड झाली म्हणून, खरोखर राजीनामा दिला, यावर मी विश्वास ठेवू शकत नव्हतो. कारण मला खुद्द सर गोकलचंद यांचेच पुढील पत्र आले होते.

७/२/१९३६
५, मॉंटगोमेरी रोड, लाहोर

प्रिय डॉक्टर आंबेडकर,

ईस्टरच्या सुट्टीत लाहोर येथे भरणाऱ्या जातपात-तोडक मंडळाच्या येत्या वार्षिक सभेत आपण अध्यक्ष राहण्यास मान्यता दिल्याचे जातपात-तोडक मंडळाच्या कार्यकर्त्यांकडून समजले, त्याचा मला आनंद वाटतो. आपण लाहोर येथे असाल तेव्हा आपण जर माझ्याकडे उतरलात तर मला फार आनंद वाटेल.

भेटीअंती अधिक.

आपला
गो.चं. नारंग

यातील सत्य काहीही असो; मी या दडपणाला बळी पडलो नाही. माझे भाषण मुंबईत छापले जावे, असा माझा आग्रह आहे, हे मंडळास आढळून आले तरी, मंडळाने माझा प्रस्ताव मान्य करण्याऐवजी 'याबाबतीत व्यक्तिश: बोलणी करण्यासाठी' श्री. हर भगवान यांना मुंबईस आले. मी जेव्हा श्री. हर भगवान यांना भेटलो तेव्हा मला असे दिसून आले की, त्यांना या प्रश्नाबाबत काहीच म्हणायचे नव्हते. भाषणाच्या मुद्रणाबाबत खरोखर ते इतके अनभिज्ञ होते की, आमच्या संभाषणात त्यांनी ते मुंबईला छापावे की लाहोरला यासंबंधात वाच्यतादेखील केली नाही. त्यांना केवळ भाषणातील आशय जाणून घेण्याची उत्कंठा होती. तेव्हा लाहोर येथे भाषण छापून घेण्यामागे मंडळाचा मुख्य उद्देश पैसे वाचवण्याचा नसून भाषणातील आशय जाणून घेण्याचा होता, याची मला खात्री पटली. मी त्यांना एक प्रत दिली. त्यातील काही भाग त्यांना फारसा आवडला नाही. ते लाहोरला परतले. लाहोरवरून त्यांनी मला पुढील पत्र पाठवले.

लाहोर,
ता. १४ एप्रिल १९३६

प्रिय डॉ. साहेब,

मुंबईवरुन मी १२ तारखेला लाहोरला परत आलो, परंतु रेल्वेप्रवासात घालवलेल्या सलग पाच-सहा रात्री मला झोप येऊ न शकल्यामुळे, मी अस्वस्थ आहे. मी इकडे आल्यावर आपण अमृतसरला येऊन गेल्याचे समजले. मला जर बरे

वाटत असते तर मी आपणास तेथे भेटलो असतो. मी आपले भाषण श्री. संत राम यांच्याकडे भाषांतरासाठी दिले आहे, ते त्यांना फार आवडले. परंतु २५ च्या आधी छापण्यासाठी त्याचा भाषंतर करून होईल की नाही, याची त्यांना खात्री नाही. काहीही असो, त्याला विस्तृत प्रसिद्धी मिळेल आणि ते हिंदूंना त्यांच्या झोपेतून जागे करील, याची आम्हाला खात्री आहे.

मुंबईत मी तुमच्या निदर्शनास आणलेल्या उताऱ्यावर आमच्या काही मित्रांनी कुशंका काढली. त्यांना ही परिषद कोणताही अनुचित प्रकार न घडता पार पाडावयाची असल्याने त्यांनी तात्पुरत्या काळापुरता 'वेद' हा शब्द आपल्या भाषणातून वगळण्यात यावा असे सुचविले आहे. मी हे सर्व तुमच्या सद्‌बुद्धीवर सोपवतो. तथापि आपल्या समारोपाच्या परिच्छेदांमध्ये, या भाषणात व्यक्त झालेली मते ही तुमची स्वतःची आहेत आणि त्यांची जबाबदारी मंडळावर येत नाही हे स्पष्ट कराल, अशी मी आशा करतो. माझ्या या विधानाचे आपण वाईट वाटून घेणार नाही व आपण आपल्या भाषणाच्या एक हजार प्रती आम्हास पाठवाल अशी आशा करतो. त्या प्रतींचे अर्थातच आम्ही पैसे देऊ. यासंबंधात मी आपणास आजच तार केली आहे. त्यासोबत रु. १००/- चा धनादेश जोडलेला आहे, कृपया त्याची पोच द्यावी व तुमचे बिल आमच्याकडे सवडीने पाठवावे.

मी स्वागत समितीची एक बैठक बोलावलेली आहे. तिचा निर्णय मी आपणास तत्काळ कळवीन. मुंबईच्या वास्तव्यात आपण मला दाखवलेल्या आपुलकीबद्दल व आपले भाषण तयार करण्यास आपण घेतलेल्या प्रचंड परिश्रमांबद्दल आपले हार्दिक आभार. खरोखर आपल्या उपकाराचे आमच्यावर ओझे झाले आहे.

आपला विश्वासू

हर भगवान

ता. क. कृपया मुद्रण होताच भाषणाच्या दोन प्रती पॅसेंजर रेल्वेने पाठवाव्यात, जेणेकरून त्या वर्तमानपत्रांकडे प्रसिद्धीसाठी पाठवता येतील.

या पत्रानुसार मी मुद्रकाला माझे हस्तलिखित सुपूर्द केले व १०० प्रती छापण्याची त्याला ऑर्डर दिली. आठ दिवसांनी श्री. हर भगवान यांचे मला दुसरे पत्र आले, ते मी खाली उद्‌धृत करीत आहे.

लाहोर,

दि. २२/४/१९३६

प्रिय डॉ. आंबेडकर,

आम्हास आपली तार व पत्र मिळाले, त्याबद्दल आम्ही आभारी आहोत. आपल्या इच्छेनुसार आम्ही पुन्हा आमची परिषद पुढे ढकलली आहे, परंतु पंजाबमध्ये

दिवसानुदिवस हवेत सारखा उष्मा वाढत असल्यामुळे ती जर २५ व २६ रोजी घेतली तर अधिक चांगले होईल असे आम्हाला वाटते. मेच्या मध्यात पुष्कळ गरम होईल व दिवसा बैठकी घेणे फारसे सुखद व आरामदायक असणार नाही. तथापि जर ती मेच्या मध्यात घेण्यात आली तर ती आरामदायक असणार नाही. तथापि जर ती मेच्या मध्यात घेण्यात आली तर ती आरामदायक कशी होईल याची आम्ही सर्वतोपरी व्यवस्था करू. तथापि एक गोष्ट आपल्या लक्षात आणून देणे आम्हास भाग पडत आहे. धर्मांतराच्या तुमच्या घोषणेच्या बाबतीत आमच्यापैकी काही लोकांनी कुशंका काढल्याचे मी जेव्हा आपणास सांगितले होते तेव्हा तो मुद्दा निःसंशयपणे मंडळाच्या कार्यक्षेत्राबाहेरचा आहे आणि त्यासंबंधात आमच्या व्यासपीठावर काहीही बोलण्याची आपली इच्छा नाही, असे आपण मला म्हणाला होता, हे आपणास आठवत असेल. त्याचबरोबर, आपल्या भाषणाचे हस्तलिखित जेव्हा सुपूर्द करण्यात आले तेव्हा तोच आपल्या भाषणाचा मुख्य भाग असून समारोपाची केवळ दोन-तीन परिच्छेदांची त्यात भर घालायची राहिली आहे, असे आपण मला आश्वासन दिले होते. आपल्या भाषणाचा दुसरा भाग मिळाल्यावर आम्हाला आश्चर्य वाटते. त्यामुळे आपले भाषण एवढे लांबलचक होईल की फारच थोडे लोक ते पूर्णपणे वाचतील, अशी आम्हाला भीती वाटते. शिवाय आपण त्यामध्ये अनेक वेळा, आपण हिंदू धर्मांच्या बाहेर पडण्याचे ठरवले असल्याचे व हिंदू म्हणून ते आपले शेवटचे भाषण असल्याचे म्हटले आहे. तसेच आपण वेदांच्या व हिंदूंच्या इतर धर्मग्रंथांच्या नीतीवर व योग्यतेवर अनावश्यकपणे हल्ला चढवलेला आहे आणि हिंदू धर्माच्या तांत्रिक बाजूचा विस्तारपूर्वक समाचार घेतलेला आहे, त्याचा विवाद्य समस्येशी निखालसपणे काहीही संबंध नाही, तो इतका की काही उतारे अप्रस्तुत व मुद्दा सोडून आहेत. आपण मला जो भाषणाचा भाग तिला होता त्या भागांतुरतेच आपले भाषण मर्यादित ठेवले असते, आपण जे ब्राह्मणवादावर, इत्यादी लिहिले होते तेवढ्यापुरते ते मर्यादित ठेवले असते तर त्याचा आम्हाला फार आनंद झाला असता.

हिंदू धर्माचे पूर्ण निमूर्लन व हिंदूंच्या पवित्र ग्रंथांच्या नीतीवरील शंका यांचा परामर्श घेणारा शेवटचा भाग, तसेच हिंदू धर्म सोडण्याची आपली इच्छा दर्शविणारी इशारा मला प्रस्तुत वाटत नाही.

त्यामुळे मी परिषदेला जबाबदार असलेल्या लोकांच्या वतीने आपणास अत्यंत नम्रपणे अशी विनंती करतो की वर उल्लेख केलेले उतारे आपण वगळावेत व मला जे भाषण आधी दिले होते. भाषण संपवावे किंवा ब्राह्मण्यवादावर आणखी काही परिच्छेदांची हवी तर त्यात भर टाकावी. त्याप्रमाणे तेथेच ते भाषण संपवावे किंवा ब्राह्मण्यवादावर आणखी काही परिच्छेदांची हवी तर त्यात भर टाकावी. भाषण विनाकारण प्रक्षोभक व चिमटे काढणारे बनविण्यात काही शहाणपणा आहे, असे आम्हाला वाटत नाही. आमच्यापैकी कित्येकजण आपल्या भावनेशी सहमत आहेत

आणि हिंदू धर्माची पुनर्रचना करण्यासाठी आपल्या झेंड्याखाली येऊ इच्छित आहेत. जर आपण आपल्या विचाराची माणसे एकत्र आणावयाचे ठरवले त सुधारकांच्या आपल्या सैन्यात पंजाबमधून मोठ्या प्रमाणावर लोक सामील होतील याची मी खात्री देऊ शकतो.

वास्तविक आम्हाला असे वाटले होते की, जातीपद्धतीच्या पापाचा नाश करण्यासाठी, विशेषत: आपण या विषयाचा सखोल अभ्यास केलेला असल्यामुळे, आपण आमचे नेतृत्व कराल आणि क्रांती घडवून आणाल व या अवाढव्य कार्यात प्रेरणास्थान बनून आमचे हात बळकट कराल. परंतु आपण ज्या स्वरूपाची घोषणा केली आहे त्या घोषणेचा पुनरुच्चार करण्यात आल्यामुळे तिचे महत्त्व कमी झाले आहे व तो हास्यास्पद शब्द बनला आहे. अशा परिस्थितीत आपण सर्व बाबींचा विचार करावा व जातीपद्धतीचा नाश करण्याच्या ध्येयासाठी हिंदू जर उत्सुक असतील, मग त्यांना त्यांच्या आप्तस्वकीयांचा व धार्मिक कल्पनांचा त्याग करावा लागला तरी बेहत्तर, तर त्या कार्यात प्रमुख भूमिका बजावण्यात मला आनंदच वाटेल, असे म्हणून आपले भाषण अधिक प्रभावी बनवावे. आपण जर असे केले तर मला वाटते अशा प्रयत्नात आपणास पंजाबमधून तत्काळ प्रतिसाद मिळेल.

आम्हाला आधीच पुष्कळ खर्च झालेला आहे व आमळाला टांगलेल्या मन:स्थितीत ठेवले गेले आहे. अशा प्रसंगी आपण जर आम्हाला मदत केली व वरीलप्रमाणे आपण आपल्या भाषणाला मर्यादा घालण्यासाठी ते संक्षिप्त केले आहे असे जर आम्हाला उलटटपाली कळवले, तर मी आपला कृतज्ञ राहीन. यदाकदाचित आपण तरीही ते भाषण संपूर्णपणे छापण्याचा आग्रह धरत असाल तर मात्र ते शक्य होणार नाही. कदाचित आम्ही परिषद घेणे उचित ठरणार नाही व आम्हाला परिषद कायमची पुढे ढकलावी लागेल याचे आम्हाला फार वाईट वाटते. असे केले तर परिषद पुन:पुन: पुढे ढकलल्यामुळे आम्हाला लोकांच्या सदिच्छा गमवाव्या लागतील. तथापि आम्ही हे आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, जातीपद्धतीवर असा विलक्षण प्रबंध लिहून आपण आमच्या हृदयात स्थान कोरले आहे. हा प्रबंध आतापर्यंत लिहिल्या गेलेल्या प्रबंधांपेक्षा सरस आहे व सांगावयाचे म्हणजे, तो पुढील पिढ्यांना मौल्यवान वारसा ठरेल. तो तयार करण्यासाठी आपण घेतलेल्या परिश्रमांबद्दल आम्ही आपले कायमचे ऋणी आहोत.

आपल्या आपुलकीबद्दल व सदिच्छांबद्दल आपले अत्यंत आभारी आहोत.

आपला विश्वासू,
हर भगवान

या पत्राला मी पुढीलप्रमाणे उत्तर पाठवले,

२७ एप्रिल १९३६

प्रिय श्री. हर भगवान,

आपले दि. २२ एप्रिलचे पत्र मला मिळाले. मी जर आपले भाषण संपूर्णपणे छापण्याचा आग्रह धरला तर जातपात-तोडक मंडळाच्या स्वागत समितीला 'परिषद कायमची पुढे ढकलावी लागेल' याची मी सखेद नोंद घेतो. उत्तरादाखल मला आपणास असे कळवायचे आहे की, जर परिस्थितीला अनुरूप असे कार्य करण्यासाठी भाषणात काटछाट करण्याचा मंडळाचा आग्रह असेल तर परिषद रद्द झालेली मलादेखील चालेल. मला संदिग्ध शब्द वापरणे आवडत नाही. तुम्हाला माझा निर्णय पसंत पडणार नाही. परंतु प्रत्येक अध्यक्षाला त्याचे भाषण तयार करण्याचे जे स्वातंत्र्य असते, त्या स्वातंत्र्याचा परिषदेचा अध्यक्ष होण्याचा मान मिळवण्यासाठी मी त्याग करू शकत नाही. प्रत्येक परिषदेच्या अध्यक्षाचे, तो ज्या परिषदेचा अध्यक्ष आहे त्या परिषदेला त्याला योग्य व उचित वाटणारे नेतृत्व देण्यासाठी, त्या परिषदेप्रति काही कर्तव्य असते, त्या कर्तव्याचा परिषदेला खूष करण्यासाठी मी त्याग करू शकत नाही. हा प्रश्न सिद्धांताचा आहे आणि मी याबाबतीत कोणत्याही प्रकारे तडजोड करू इच्छित नाही.

स्वागत समितीने घेतलेल्या निर्णयाच्या औचित्यासंबंधात मी कोणत्याही प्रकारच्या विरोधात शिरलो नसतो. परंतु माझ्यावर ठपका ठेवणारी काही कारणे आपण दिली आहेत, त्यामुळे त्यास उत्तर देणे मला भाग आहे. पहिली गोष्ट, समितीने ज्यावर आक्षेप घेतलेला आहे त्या भाषणातील भागात अंतर्भूत असलेली मते पाहून मंडळाला आश्चर्य वाटले, ह्या कल्पनेचे मला निरसन केले पाहिजे. श्री. संत राम यांच्या पत्रांना उत्तर देताना मी तेव्हा म्हणालो होतो, मला खात्रीपूर्वक आठवते की, जातीपद्धती मोडण्याचा खरा मार्ग सहभोजने व आंतरजातीय विवाह घडवून आणणे हा नव्हे, तर ज्यावर जात आधारलेली आहे त्या धार्मिक कल्पनांचा नाश करणे हा होय. आणि श्री. संत राम यांनी मी जे म्हणालो तो अत्यंत नाविन्यपूर्ण दृष्टिकोण आहे असे सांगून त्याचे स्पष्टीकरण करण्याची मला उत्तरादाखल विनंती केली होती. श्री. संत राम यांच्याकडून करण्यात आलेल्या त्या मागणीस प्रतिसाद म्हणून मी त्यांना माझ्या पत्रात जे एका वाक्यात सांगितले होते त्याचा माझ्या भाषणात विस्तार करून सांगणे माझे कर्तव्य आहे, असे मला वाटते. त्यामुळे भाषणात व्यक्त झालेली मते नवीन आहेत असे तुम्ही म्हणू शकत नाही. काहीही असो, तुमच्या मंडळाचे चालते-बोलते चैतन्य आणि अग्रगामी प्रकाश असलेले श्री. संत राम यांना ती नवीन नाहीत. परंतु मी आणखी पुढे जाऊन असे म्हणतो की, माझ्या भाषणाचा हा भाग केवळ मला लिहावा वाटला म्हणून मी लिहिलेला नाही. युक्तिवाद पूर्ण करण्यासाठी मला

तो अत्यंत आवश्यक वाटल्यामुळे मी तो लिहिला. तुमची समिती ज्यास 'अप्रस्तुत व मुद्दा सोडून असलेला' म्हणून आक्षेप घेते तो भाषणातील भाग आपण दुरुस्त करू इच्छिता हे वाचून मला आश्चर्य वाटले. मी एक वकील आहे व तुमच्या समितीतील सदस्याला प्रस्तुततेचे नियम जितके कळतात तितकेच मलादेखील समजतात. मी अत्यंत ठामपणे असे नमूद करीन की, आक्षेप घेण्यात आलेला मजकूर हा केवळ अत्यंत समर्पकच नाही तर तो महत्त्वाचा देखील आहे. त्या भाषणाच्या भागात जातीपद्धती निमूर्लनच्या मार्ग व साधने यांची मी चर्चा केलेली आहे. जाती नष्ट करण्याचा उत्तम मार्ग म्हणून मी काढलेला निष्कर्ष हा हादरा देणारा व दुःखद आहे, माझे विश्लेषण चुकीचे आहे, असे म्हणण्याचा तुम्हाला हक्क आहे. परंतु जातीच्या प्रश्नाचा परामर्श घेणाऱ्या या भाषणात जात कशी नष्ट करता येऊ शकेल याची चर्चा करण्यास मला मोकळीक नाही असे तुम्ही म्हणू शकत नाही.

तुमची दुसरी तक्रार भाषणाच्या लांबलचकपणाबद्दल आहे. मी त्या आरोपाबद्दल त्या भाषणातच क्षमा मागितलेली आहे. त्यासाठी खरोखर कोण जबाबदार आहे? तुम्हाला वस्तुस्थितीची कदाचित उशीरा जाणीव झाली असावी अशी मला आशंका आहे. अन्यथा तुम्हाला माहीत असायला हवे होते की, मला विस्तृत प्रबंध तयार करण्यासाठी स्वतःला गुंतविण्यास वेळही नाही किंवा तितकी शक्तीही नाही. त्यामुळे माझ्या स्वतःच्या सोयीसाठी मी छोटे भाषण लिहिण्याचे योजले होते. मंडळाने मला या विषयाचा सांगोपांग परामर्श घेण्याची विनंती केली व मंडळानेचजातीपद्धतीशी संबंधित प्रश्नांची सूची माण्याकडे पाठवली व त्या प्रश्नांना माझ्या भाषणात उत्तर देण्याची विनंती केली. कारण ते प्रश्न मंडळ व त्याचे विरोधक यांच्यामधील विरोधात नेहमी उपस्थित केले जाणारे प्रश्न होते व त्या प्रश्नांना समाधानकारक उत्तर देणे मंडळाला कठीण जात होते. या संदर्भात मंडळाच्या इच्छांची पूर्ती करण्याच्या प्रयत्नात भाषण लांबलेले आहे. मला आता खात्री वाटते की, भाषणाच्या लांबलचकपणाबद्दलचा दोष माझा नाही ही गोष्ट तुम्हाला मान्य होईल.

हिंदू धर्म नष्ट करण्याचे मी बोलल्यामुळे तुमचे मंडळ इतके निराश होईल याची मला अपेक्षा नव्हती. मला वाटते केवळ मूर्खांनाच शब्दांची भीती वाटत असते. परंतु लोकांच्या मनात गैरसमज निर्माण होऊ नये म्हणून मी धर्म व धर्माचा नाश याचा कोणता अर्थ मला अभिप्रेत आहे, याचा खुलासा करण्यासाठी पुष्कळ श्रम घेतलेले आहेत. मला खात्री आहे की, माझे भाषण वाचल्यावर माझ्या बाबतीत कोणाचाही गैरसमज होणे शक्य नाही. तुमच्या मंडळाने 'धर्माचा नाश इत्यादी' केवळ शब्दांचीच धास्ती घेतलेली असावी. त्याबाबत मंडळ काहीही स्पष्टीकरण देवो, आता मंडळ माझ्या मनातून उतरले आहे. जे लोक सुधारकाची भूमिका घेतात व नंतर त्या भूमिकेचे तर्कसंगत परिणामदेखील पाहण्याचे नाकारतात त्या माणसांबद्दल कोणाला कसलाही आदर किंवा सद्भावना वाटू शकत नाही.

माझे भाषण तयार करताना कोणत्याही प्रकारे मला मर्यादा घालून घेण्याचे मी मान्य केलेले नव्हते आणि माझ्या भाषणात काय असावे व काय असू नये, याचीदेखील मी व मंडळ यांच्यामध्ये कधीच चर्चा झाली नव्हती हे तुम्ही मान्य कराल. या विषयावरील माझी जी मते आहेत, ती मते या भाषणात व्यक्त करण्यास मी मुक्त आहे, असे मी नेहमीच गृहित धरलेले होते. खरोखर तुम्ही ९ एप्रिल रोजी मुंबईस येईपर्यंत मी कोणत्या स्वरूपाचे भाषण तयार करीत आहे, याची मंडळाला कल्पना नव्हती. तुम्ही जेव्हा मुंबईला आला होता तेव्हा मी स्वेच्छेने तुम्हाला सांगितले होते की, दलित वर्गाच्या धर्मांतरावरील माझ्या मतांचा प्रचार करण्यासाठी मला तुमच्या व्यासपीठाचा वापर करण्याची मुळीच इच्छा नाही. मला वाटते, मी ते आश्वासन भाषण तयार करताना काटेकोरपणे पाळलेले आहे. अप्रत्यक्ष स्वरूपाच्या ओझरत्या संदर्भापलीकडे तेथे मी म्हणालो आहे की, 'मला क्षमा करा, मी येथे असणार नाही. इत्यादी' मी माझ्या भाषणात विषयासंबंधी काहीही म्हटलेले नाही. मी जेव्हा तुम्हाला अशा ओझरत्या व इत्या अप्रत्यक्ष संदर्भावरदेखील आक्षेप घेताना पाहतो तेव्हा मला विचारणे भाग आहे. तुमच्या परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारण्यास मी सहमत झालो म्हणून दलित वर्गांनी धर्मांतर करण्यासंबंधातील माझी मते रद्द करण्यास किंवा सोडून देण्यास मी सहमत होईन, असे तुम्हाला वाटले की काय? तुम्हाला जर तसे वाटले असेल तर मला तुम्हाला सांगितले पाहिजे की तुमच्याकडून झालेल्या ह्या प्रकाराच्या चुकीला मी कोणत्याही प्रकारे जबाबदार नाही. तुमच्यापैकी कोणीही मला जरा जरी सूचना दिली असती की, मला अध्यक्ष निवडून जो सन्मान तुम्ही देणार होता त्याच्या बदल्यात धर्मांतराच्या माझ्या कार्यक्रमावरील माझ्या श्रद्धेचा मला त्याग करावा लागणार आहे; तर मी तुम्हाला अगदी स्पष्ट शब्दात सांगितले असते की, तुमच्याकडून मिळणाऱ्या कोणत्याही मानसन्मानापेक्षा मी माझ्या विचारांची अधिक काळजी घेतो.

तुमच्या १४ तारखेच्या पत्रानंतर आलेल्या ह्या तुमच्या पत्राचे मला आश्चर्य वाटते. मला खात्री आहे की, जो कोणी ते वाचेल त्यालाही तसेच वाटेल. स्वागत समितीच्या बाजूने झालेल्या ह्या अचानक मतांतराची मला संगती लागूच शकत नाही. तुम्ही १४ तारखेचे पत्र लिहिले तेव्हा समितीपुढे असलेल्या कच्चा मसुद्यामध्ये व ज्याद्वारे माझे उत्तर घेण्यात आले होते त्या तुमच्या पत्रात ज्यावर मला समितीचा निर्णय कळविण्यात आला त्या अंतिम मसुद्यात आशयाच्या बाबतीत कसलाच फरक नाही. आधीच्या मसुद्यात अंतर्भूत नसलेला एकही नवीन विचार अंतिम मसुद्यात तुम्ही दर्शवू शकत नाही. विचार तेच आहेत. फरक एवढाच आहे की, अंतिम मसुद्यात ते अधिक तपशीलवार लिहून काढण्यात आले आहेत. भाषणावर जर काही आक्षेप घ्यायचा होता तर तुम्हाला १४ तारखेलाच तसे करता येऊ शकत होते. परंतु तुम्ही तसे के नाही. उलट तुम्ही सुचवलेले शाब्दिक बदल मी स्वीकारावेत की न स्वीकारावेत याचे स्वातंत्र्य माझ्यावर सोपवून तुम्ही मला १००० प्रती छापण्यास सांगितले. त्यानुसार

मी १००० प्रती छापून घेतल्या असून त्या आता माझ्याजवळ पडून आहेत. आठ दिवसांनंतर तुमचा भाषणावर आक्षेप आहे व जर भाषण दुरुस्त केले गेले नाही तर परिषद रद्द केली जाईल असे तुम्ही लिहिता भाषणात आता कसल्याही दुरुस्तीची आशा नाही, हे तुम्हाला माहीत असायला हवे होते. तुम्ही मुंबईत होता तेव्हा मी तुम्हाला म्हणालो होतो, मी स्वल्पविरामसुद्धा बदलणार नाही, म्हणजेच माझ्या भाषणावर कोणतीही सेन्सॉरशिप चालू देणार नाही. माझ्याकडून जसे येईल तसे भाषण तुम्हाला स्वीकारावे लागेल. भाषणात व्यक्त झालेली मते ही सर्वस्वी माझी आहेत आणि ती मते परिषदेला पसंत पडली नाहीत म्हणून परिषदेने जरी त्यांचा निषेध करणारा ठराव मांडला तरी मला त्याचे वाईट वाटणार नाही, असे देखील तुम्हाला सांगितले होते. माझ्या मतांची जबाबदारी स्वीकारण्यापासून मंडळाला मुक्त करण्यासाठी मी चिंतातुर होतो आणि तुमच्या परिषदेशी आलेल्य घनिष्ठ संबंधात मी अडकून पडू नये या उद्देशाने मी तुम्हाला सुचविले होते की, मी माझे भाषण अध्यक्षीय भाषण म्हणून न समजता एक प्रकारचे उद्घाटनपर भाषण म्हणून समजण्यात यावे व मंडळाने अध्यक्ष म्हणून कोणा दुसऱ्यास शोधावे आणि ठराव करावेत. समितीशिवाय तिच्या जागी दुसरे कोणीही १४ तारखेला निर्णय घेऊ शकले नसते. समिती तसे करण्यात अपयशी ठरली व दरम्यान मुद्रणाचा खर्च करण्यात आला. समितीकडून जरा अधिक ठामपणे जर निर्णय घेण्यात आला असता तर तो खर्च वाचवता आला असता.

भाषणात व्यक्त केलेल्या माझ्या मतांशी तुमच्या परिषदेच्या निर्णयाचा फारसा संबंध नाही अशी मला खात्री वाटते. अमृतसर येथे भरलेल्या शीख प्रचार परिषदेतील माझ्या उपस्थितीचा समितीच्या निर्णयाशी बराच संबंध आहे, असे वाटण्यास बरीच कारणे आहेत. १४ व २२ एप्रिल यांमध्ये समितीने दर्शवलेल्या या अचानक मतांतराचे दुसरे कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण असू शकत नाही. मी हा विरोध लांबवू इच्छित नाही. माझ्या अध्यक्षतेखाली होणारे परिषदेचे अधिवेशन रद्द करण्यात आले आहे असे तुम्ही ताबडतोब जाहीर करा, अशी मी तुम्हास विनंती करतो. सर्व शोभा निघून गेली आहे आणि आता तुमची समिती जरी माझे भाषण जसेच्या तसे संपूर्णपणे स्वीकारण्यास सहमत झाली तरी मी अध्यक्षपद स्वीकारण्याचे मान्य करणार नाही. भाषण तयार करण्यात मी घेतलेल्या परिश्रमांची आपण दखल घेतलीत त्याबद्दल आभारी आहे. जरी इतर कोणाला झाला नाही त्या परिश्रमांचा मला फायदा झाला. मला खेद वाटतो तो एवढाच की, त्यामुळे माझ्यावर जो ताण पडला तो ताण सहन करण्याजोगी माझी प्रकृती नसताना मला असे खडतर परिश्रम घ्यायला लावण्यात आले.

आपला विश्वासू,  
भी. रा. आंबेडकर

ह्या पत्रव्यवहारावरून माझी अध्यक्ष म्हणून झालेली नेमणूक मंडळाला का रद्द करावी लागली याची कारणे उघड होतील आणि नेमका कोणाकडे दोष जातो ते वाचक ठरवतील. अध्यक्षाची मते मान्य नसल्यामुळे स्वागत समितीने अध्यक्षाची नेमणूक रद्द केल्याची ही पहिलीच वेळ असेल असे मला वाटते. परंतु तसे असो अगर नसो, सवर्ण हिंदूंकडून त्यांच्या परिषदेसाठी अध्यक्ष म्हणून आमंत्रण मिळण्याची माझ्या आयुष्यातील खचितच ही पहिलीच वेळ होती. त्याचा शेवट शोकांतिकेत झाला, याचे दुःख होते. परंतु सवर्ण हिंदूंतील सुधारणावादी लोक आणि अस्पृश्यांतील स्वाभिमानी लोक यांच्यामधील अशा दुःखपर्यवसायी संबंधातून कोणाला काय अपेक्षा करता येणार? सुवर्ण हिंदूंतील सुधारणावादी लोकांना त्यांच्या रूढीवादी सहकाऱ्यांपासून अलग होण्याची इच्छा नाही तर अस्पृश्यांतील स्वाभिमानी लोकांना सुधारणा घडवून आणण्याचा आग्रह धरण्याविना कसलाही पर्याय नाही.

डॉ. भीमराव आंबेडकर

राजगृह, दादर, मुंबई-१४
१५ मे १९३६

------

# १.

मित्र हो

या परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारण्यासाठी मला अत्यंत आस्थेवाईकपणे निमंत्रण देणाऱ्या जातपात-तोडक मंडळाच्या सदस्यांबद्दल मला खरोखर वाईट वाटते. मला अध्यक्ष म्हणून निवड केल्याबद्दल त्यांना अनेक प्रश्न विचारले जातील, याची मला खात्री आहे. लाहोरमध्ये भरणाऱ्या कार्यक्रमाचे अध्यक्षपद स्वीकारण्यासाठी मंडळाने मुंबईसारख्या बाहेरच्या ठिकाणाहून माणूस का आणला, याचा खुलासा मंडळाला विचारण्यात येईल. याप्रसंगी अध्यक्षपद स्वीकारण्यासाठी माझ्यापेक्षा अधिक लायक माणूस मंडळाला सहज मिळू शकला असता, असे मला वाटते. मी हिंदूंवर टीका केलेली आहे. ते ज्याला पूज्य मानतात त्या महात्म्याच्या अधिकारावर मी प्रश्नचिन्ह ठेवले आहे. ते माझा द्वेष करतात. त्यांच्यासाठी मी त्यांच्या बागेतला एक साप आहे. असे असल्याने हे मानाचे पद भूषवण्यासाठी मंडळाने मला का बोलावले. याचा राजकीय मनोवृत्तीचे हिंदू मंडळाला खुलासा विचारतील यात शंका नाही. हे मोठ्या धाडसाचे कृत्य आहे. काही हिंदूंनी तो जर अपमान मानला तर त्याचे मला आश्चर्य वाटणार नाही. मंडळाने अध्यक्ष निवडताना शास्त्राज्ञेचे पालन का केले नाही याचा खुलासा करावा, असे मंडळास सांगण्यात येईल. शास्त्रानुसार ब्राह्मणांची तीन वर्णांसाठी गुरू म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. 'वर्णानाम् ब्राह्मणो गरुः' ही शास्त्रांची आज्ञा आहे. त्यामुळे हिंदूने कोणाकडून त्याचे नीतिपाठ घ्यावेत आणि कोणाकडून घेऊ नयेत, हे मंडळाला माहीत आहे. एखादा विद्वान आहे म्हणून हिंदूने कोणालाही त्याचा गुरू म्हणून स्वीकारण्यास शास्त्रे हिंदूला परवानगी देत नाहीत. ही गोष्ट, महाराष्ट्रातील ब्राह्मण संत, ज्याने शिवाजीला हिंदू राज्य स्थापन करण्याची प्रेरणा दिली असे म्हटले जाते, त्या रामदासाने अगदी स्पष्ट केलेली आहे. त्याच्या दासबोध या सामाजिक-राजकीय-धार्मिक अशा मराठी पद्यात हिंदूंना उद्देशून रामदास विचारतो की, एखादा अंत्यज पंडित आहे म्हणून त्याला आपण आपला गुरू म्हणून स्वीकारू शकतो काय? आणि त्याचे उत्तर तो नकारार्थी देतो. या प्रश्नांना काय उत्तरे द्यायची, ही बाब मी मंडळावर सोडून दिली पाहिजे. हिंदूंना इतका घृणास्पद वाटणारा, नकोसा असलेला माणूस ठरवण्यासाठी आणि सवर्ण श्रोत्यांपुढे भाषण देण्यासाठी इतक्या खालच्या दर्जावर उतरून एका अंत्यजाची, एका अस्पृश्याची निवड करण्याकरिता, अध्यक्ष निवडण्याकरिता मुंबईला का प्रवास करावा लागला, याची कारणे मंडळाला उत्तमरीत्या माहीत आहेत. माझ्याबद्दल सांगायचे तर तुमची क्षमा मागून मी सांगू इच्छितो की, हे आमंत्रण मी अगदी माझ्या इच्छेविरुद्ध, तसेच माझ्या अनेक अस्पृश्य अनुयायांच्या इच्छेविरुद्ध स्वीकारलेले आहे. हिंदूंना माझा वीट आलेला

आहे, हे मला माहीत आहे. त्यांच्यासाठी मी आदरणीय व्यक्ती नाही, हेही मला माहीत आहे. हे सर्व जाणूनच मी हेतुपुरस्सर त्यांच्यापासून स्वतःला दूर ठेवले आहे. माझे विचार त्यांच्यावर लादण्याची माझी इच्छा नाही. माझी मते मी माण्या स्वतःच्या व्यासपीठावरून मांडत आलो आहे. यामुळे अगोदरचा फार मोठ्या प्रमाणात त्यांच्या अंतःकरणाचा जळफळाट झालेला आहे व ते चिडलेले आहेत. त्यांच्या ऐकिवात असलेल्या ज्या गोष्टी मी करीत आलेलो आहे त्या त्यांच्या डोळ्यांदेखत करण्यासाठी हिंदूंच्या व्यासपीठावर चढण्याची माझी इच्छा नाही. मी जो इथे आहे तो तुमच्या निवडीमुळे आहे, माझ्या इच्छेमुळे नव्हे. समाज सुधारण्याचे तुमचे ध्येय आहे, ह्या ध्येयाने मला नेहमीच प्रेरित केले आहे. आणि असे असल्यामुळे या ध्येयासाठी, विशेषतः जेव्हा तुम्हाला वाटते की मी त्यासाठी काही मदत करू शकतो, तेव्हा मदत करण्याची संधी मी नाकारू नये असे मला वाटते. तुम्हाला ज्या प्रश्नाने भेडसावून सोडले आहे, तो प्रश्न सोडवण्यास आज मी जे तुमच्यासमोर सांगणार आहे त्याचा कोणत्या प्रकारे तुम्हाला उपयोग होईल की उपयोग होणार नाही, याचा निवाडा तुम्हीच करायचा आहे. या प्रश्नावरील माझी मते तुमच्यासामोर मांडावीत एवढीच माझी इच्छा आहे.

## २.

भारतातील सामाजिक सुधारणांचा मार्ग हा स्वर्गाच्या मार्गाप्रमाणे सर्वतोपरी अनेक अडचणींनी वेढलेला आहे. भारतात सामाजिक सुधारणेला मित्र थोडे व टीकाकार फार. हे टीकाकार दोन स्वतंत्र वर्गांत मोडतात. एका वर्गात राजकीय सुधारकांचा अंतर्भाव होतो तर दुसऱ्यात समाजसुधारकांचा.

एका वेळेश असे मानले जात होते की, सामाजिक कार्यक्षमतेशिवाय इतर कार्यक्षेत्रांमध्ये कोणतीही कायमची प्रगती शक्य नाही. दुष्ट चालीरीतींनी नैतिक हानी घडवून आणल्यामुळे हिंदू समाज हा अकार्यक्षम बनला आहे व हे दोष नष्ट करण्यासाठी अधिक प्रयत्न केले पाहिजेत. ही वस्तुस्थिती मान्य झाल्यामुळे जेव्हा राष्ट्रीय काँग्रेसचा जन्म झाला तेव्हा त्याच वेळी त्याबरोबरच सामाजिक परिषदेची देखील स्थापना झाली. काँग्रेसचा देशातील राजकीय संघटनातील कमकुवत दुवे स्पष्ट करण्याशी संबंध होता, तर सामाजिक परिषद हिंदू समाजाच्या सामाजिक संघटनातील कमकुवत दुवे दूर करण्यात गुंतलेली होती. काही काळ काँग्रेसने व परिषदेने एकाच सामाईक कार्याचे दोन भाग असावेत त्याप्रमाणे कार्य केले व त्यांनी त्यांची वार्षिक अधिवेशने एकाच मंडपात भरवली. परंतु लवकरच ह्या दोन भागांचे दोन पक्षांमध्ये रूपांतर झाले. एक राजकीय सुधारणावादी पक्ष आणि दुसरा सामाजिक सुधाणावादी पक्ष. त्यांच्यामध्ये भयानक विरोध उफाळून आला. राजकीय सुधारणावादी पक्षाने राष्ट्रीय

होता. परंतु सामाजिक सुधारणेच्या महत्त्वावर ज्यांचा विश्वास आहे ते श्री. बॅनर्जीसारख्यांचा युक्तिवाद अंतिम आहे काय, असे विचारल्याशिवाय राहणार नाहीत. ज्यांचे म्हणणे योग्य होते त्यांना विजय मिळाला असे त्यातून सिद्ध होते काय? यातून सामाजिक सुधारणेचा राजकीय सुधारणेशी कसलाही संबंध नाही असे निर्णायकपणे सिद्ध होते काय? मी जर या प्रकरणाची दुसरी बाजू मांडली तर ही बाब समजण्यास आपणास मदत होईल. माझ्या कथनासाठी अस्पृश्यांना देण्यात येणाऱ्या वागणुकीकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो.

महाराष्ट्रातील पेशवाईशासन काळात, रस्त्याचा वापर करण्यास अस्पृश्याला मुभा नव्हती. कारण एखादा हिंदू जर त्या रस्त्याने आला तर म्हणे अस्पृश्याच्या सावलीने त्या हिंदूला विटाळ होईल. अस्पृश्याच्या चुकून झालेल्या स्पर्शाने हिंदूंना होणारा विटाळ टाळण्यासाठी अस्पृश्याला त्याचे चिन्ह किंवा त्याची खूण म्हणून आपल्या मनगटावर अथवा गळ्यात काळा दोरा बांधावा लागत असे. पुण्यात पेशव्यांच्या राजधानीत, अस्पृश्याला तो जेथून चालला त्या रस्त्यावरची धूळ त्याच्यामागोमाग झाडली जावी म्हणून आपल्या कमरेला खराटा लटकवावा लागत असे. करण त्याच रस्त्यावरून एखादा हिंदू चालला तर त्याला विटाळ होईल ना! पुण्यात अस्पृश्याला आपली थुंकी टाकण्यासाठी तो जिकडे जाईल तिकडे आपल्या गळ्यात मडके अडकवून न्यावे लागे. कारण त्याची थुंकी जर जमिनीवर पडली आणि अनवधानाने एखादा हिंदू जर तिच्यावरून चालत गेला तर त्या हिंदूला विटाळ होईल ना ! मी अगदी आलीकडच्या घटना सांगू इच्छितो. हिंदूंनी मध्य भारतातील बलाई नावाच्या अस्पृश्य जमातीवर केलेला जुलूम माझे म्हणणे सिद्ध करील. दि. ४ जानेवारी १९२८ च्या 'टाईम्स ऑफ इंडिया' मध्ये तुम्हाला याविषयीची बातमी दिसून येईल. 'टाईम्स ऑफ इंडिया'चा वार्ताहर असे कळवितो की, उच्चजातीय हिंदू म्हणजे कालोट, राजपूत व ब्राह्मण यांच्यासह इंदोर जिल्ह्यातील (इंदोर राज्यातील) कनारिया, बिचोली-हफ्सी, बिचोली-मर्दाना या गावांतील व सुमारे इतर पंधरा गावांतील पाटील व पटवारी यांनी मिळून त्यांच्या संबंधित गावांतील बलाईंना असे कळविले की, त्यांना जर त्यांच्यात (उच्चजातीयांत) राहायचे असेल तर त्यांनी पुढील नियम पाळले पाहिजेत :

१) बलाईंनी सोनेरी रंगाच्या पट्टीची किनार असलेली पगडी घालता कामा नये.

२) त्यांनी रंगीत किनारीची किंवा टोप-पदराची धोती (धोतर) वापरता कामा नये.

३) एखादा हिंदू मरण पावल्यास त्याच्या मृत्यूचा सांगावा मृताच्या नातेवाईकांना त्यांनी कळविला पाहिजे, मग ते नातेवाईक कितीही दूर राहत असेनात.

४) हिंदूंच्या सर्व लग्नसमारंभांत बलाईंनी मिरवणुकीच्या पुढे, तसेच लग्न चालू असताना वाजंत्री वाजविली पाहिजेत.

५) बलाई स्त्रियांनी सोन्याचे किंवा चांदीचे दागिने घालता कामा नये, त्यांनी नक्षीदार झगे किंवा चोळ्या वापरता कामा नये.

६) हिंदू स्त्रिया बाळंत झाल्यास त्या सर्व बाबतीत बलाई स्त्रीने सुईणीचे काम केले पाहिजे.

७) बलाईने मोबदला न मागता सेवा दिली पाहिजे व हिंदूच्या मनाला जे काही द्यावे वाटेल ते त्याने पत्करले पाहिजे.

८) जर बलाई या अटीचे पालन करण्यास राजी नसेल तर त्याला गावातून हाकलून दिले जाईल.

बलाईंनी या नियमांचे पालन करण्यास नकार दिला, तेव्हा हिंदू त्यांच्याविरुद्ध गेले. बलाईंना गावाच्या विहिरीतून पाणी घेऊ देईनात. त्यांना त्यांची गुरे चरायला सोडू देईनात. हिंदूंच्या मालकीच्या जागेतून बलाईंना जाण्यास मनाई करण्यात आली. त्यामुळे जिथे बलाईच्या शेताभोवती हिंदूच्या मालकीची शेते असतील तिथे बलाईला त्याच्या स्वत:च्या शेतावर जाण्यासाठी कोणतीही वाट राहिली नाही. तसेच हिंदू हे बलाईच्या शेतांवर त्यांची गुरे चारू लागले. ह्या छळणुकीविरुद्ध बलाईंनी दरबारापुढे विनंती अर्ज केले, परंतु सरकारला यात लक्ष घालायला फुरसत न मिळाल्यामुळे जुलूम चालूच राहिला व त्यामुळे शेकाडो बलाईंना त्यांच्या बायका-मुलांसह, ज्या घरात त्यांचे पूर्वज पिढ्यानुपिढ्या राहिले, ती घरे सोडावी लागली व धार, देवास, बागली, भोपाळ, ग्वाल्हेर या लगतच्या संस्थानांत व इत संस्थानातील गावांमध्ये स्थलांतर करावे लागले. त्यांच्या नवीन घरी त्यांचे काय हाल झाले, हा प्रश्न सध्या आपण बाजूला ठेवू. गुजराथमधील कविठा येथील प्रसंग अगदी गेल्या वर्षीच घडला आहे. सरकारतर्फे चालविण्यात येणाऱ्या सार्वजनिक ग्रामशाळेत आपली मुले पाठवण्याचा आग्रह धरू नये अशी कविठाच्या हिंदूंनी अस्पृश्यांना आज्ञा केली. हिंदूंच्या इच्छेविरुद्ध नागरी हक्क बजावण्याचे धाडस केल्याबद्दल कविठाच्या अस्पृश्यांना कसल्या संकटातून जावे लागले, ते इतके प्रसिद्ध आहे की त्याचे तपशीलवार वर्णन करण्याची गरज नाही. दुसरा एक प्रसंग गुजराथच्या अहमदाबाद जिल्ह्यातील झनु या गावी घडला. नोव्हेंबर १९३५ मध्ये चांगल्या घरातील काही अस्पृश्य स्त्रियांनी धातूच्या भांड्यातून पाणी न्यायला सुरुवात केली. अस्पृश्यांनी धातूची भांडी वापरावीत हा आपल्या प्रतिष्ठेचा अपमान आहे असे हिंदूंना वाटले व त्यांनी त्या अस्पृश्य स्त्रियांना त्यांच्या तथाकथित उद्धटपणाबद्दल मारहाण केली. जयपूर जिल्ह्यातील चकवारा गावातील एका घटनेची अगदी अलीकडेच बातमी आली आहे. वर्तमानपत्रांत आलेल्या वृत्तावरून असे दिसून येते की, तीर्थयात्रा करून आलेल्या, चकवारा गावातील एका अस्पृश्याने एक धार्मिक कार्य म्हणून गावातील त्याच्या अस्पृश्य

भाऊबंदांना जेवण घालण्याची व्यवस्था केली होती. यजनानाची आपल्या पाहुण्यांना मोठा खर्च करून जेवण घालण्याची व जे पार्थ वाढण्यात येणार होते त्यात घी (तूप) देखील वाढण्याची इच्छा होती. परंतु अस्पश्य लोक अन्न वाढून घेण्यात गुंतले असताना शेकडो हिंदू हातात लाठ्या घेऊन त्या ठिकाणी आले व त्यांनी त्या अन्नाची नासधूस केली व त्या अस्पृश्यांना बदडून काढले. तेव्हा ते अस्पृश्य समोर वाढलेले अन्न तसेच टाकून आपला जीवन घेऊन पळून गेले. असा खुनशी घाला असुरक्षित अस्पृश्यांवर का घालण्यात आला? त्याचे कारण असे देण्यात आले की अस्पृश्य यजमान तूप वाढण्याइतका मुजोर झाला होता आणि त्याचे अस्पृश्य पाहुणे त्या तुपाची चव घेण्याइतके बेअक्कल होते ! तूप ही निश्चितपणे श्रीमंतांची चैन आहे, परंतु तुपाचा चव घेण्याइतके बेअक्कल होते ! तूप ही निश्चितपणे श्रीमंतांची चैन आहे, परंतु तुपाचा वापर ही उच्च सामाजिक दर्जाची खूण आहे असा विचार कोणीही केला नसता. परंतु तो विचार चकवाराच्या हिंदूंनी केला व त्यांनी सात्त्विक संतापाने अस्पृश्यांना केलेल्या आगळीकीचा सूड घेतला. अस्पृश्यांनी त्यांच्या अन्नातील एक पदार्थ म्हणून तूप वापरले त्यामुळे हिंदूंचा अपमान झाला. हिंदूंच्या प्रतिष्ठेचा विचार करता ते अस्पृश्यांचे अन्न असू शकत नाही हे अस्पृश्यांना कळायला हवे होते. याचा अर्थ असा की, अस्पृश्यांची तूप विकत घेण्याची ऐपत असली तरी त्याने तूप वापरता कामा नये, कारण हिंदूंच्या दृष्टीने ते मुजोरपणाचे कृत्य आहे. ही घटणा १ एप्रिल १९३६ रोजी अथवा त्या सुमारास घडली !

ही खरी घटना सांगितल्यावर मला आता सामाजिक सुधारणेची बाजू मांडली पाहिजे. असे करताना मी श्री. बॅनर्जी यांच्या विचारांचा मला शक्य होईल तितक्या बारकाईने पाठपुरावा करीन व राजकीय मनोवृत्तीच्या हिंदूंना असे विचारीन की,

'अस्पृश्यांसारख्या तुमच्या देशबांधवांना (एका मोठ्या वर्गाला) तुम्ही सार्वजनिक शाळांचा वापर करू देत नाही, तरीही तुम्ही राजकीय सत्तेसाठी पात्र आहात काय? तुम्ही त्यांना सार्वजनिक विहिरींचा वापर करू देत नाही, तरीही तुम्ही राजकीय सत्तेसाठी पात्र आहात काय? तुम्ही त्यांना सार्वजनिक रस्त्यांचा वापर करू देत नाही, तरीही तुम्ही राजकीय सत्तेसाठी पात्र आहात काय? तुम्ही त्यांना आवडतील ती वस्त्रोप्रावरणे व दागदागिने घालू देत नाही, तरीही तुम्ही राजकीय सत्तेसाठी पात्र आहात काय? तुम्ही त्यांना स्वतःला आवडेल ते अन्न खाऊ देत नाही, तरीही तुम्ही राजकीय सत्तेसाठी पात्र आहात काय?' मी अशा प्रश्नांची मालिकाच विचारू शकतो. परंतु एवढे प्रश्न पुरेसे होतील. बॅनर्जींचे काय उत्तर मिळाले असते याची मला जिज्ञासा आहे. कोणत्याही सुज्ञ माणसाला त्यांचे होकारार्थी उत्तर देण्याचे धैर्य होणार नाही, याची मला खात्री आहे. 'एक देश दुसऱ्या देशावर राज्य करण्यास अपात्र असतो' या मिलच्या तत्त्वाचा पुनरुच्चार करणाऱ्या प्रत्येक काँग्रेसवाल्याने एक वर्ग दुसऱ्या वर्गावर सत्ता गाजवण्यास अपात्र असतो हेही मान्य केलेच पाहिजे.

पण मग सामाजिक परिषदेचा पराजय झाला हे कसे? हे अचूकपणे जाणून घेण्यासाठी सुधारक ज्यांच्यासाठी चळवळ करीत होते त्या सामाजिक सुधारणांचे स्वरूप काय होते, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. या संदर्भात, हिंदू कुटुंबाची सुधारणा या अर्थाने समाजसुधारणा आणि हिंदू समाजाची पुनर्संघटना व पुनर्रचना या अर्थाने असलेली समाजसुधारणा यांच्यामध्ये फरक करणे आवश्यक आहे. पहिलीची संबंध विधवाविवाह, बालविवाह, इत्यादींशी आहे तर दुसरीचा संबंध जातीपद्धती नष्ट करण्याशी आहे. सामाजिक परिषद हा ज्याचा संबंध उच्च जातीच्या हिंदू कुटुंबाच्या सुधारणेशी होता असा गट होता. तिच्यात बहुतांश ज्ञानसंपन्न उच्चजातीय हिंदूंचा भरणा होता. त्यांना जाती नष्ट करण्यासाठी चळवळ करण्याची आवश्यकता वाटत नव्हती किंवा त्यांच्याकडे त्यासाठी चळवळ करण्याचे धैर्य नव्हते. त्यांच्यामध्ये प्रचलित असलेली आणि जे त्यांना वैयक्तिकरीत्या अनुभवास आले होते असे लादलेले वैधव्य, बालविवाह इत्यादींसारख्या दुष्ट प्रथा काढून टाकण्याची त्यांना अगदी स्वाभाविकच अधिक कळकळ होती. त्यांनी समग्र हिंदू समाजाच्या सुधारणेची दखल घेतली नाही. जी लढाई लढण्यात आली ती कुटुंबाच्या सुधारणेच्या प्रश्नाभोवतीच एकवटली होती. जातीव्यवस्था मोडून टाकण्याच्या अर्थाने समाजसुधारणेशी तिचा संबंध नव्हता. सुधारकांनी तो प्रश्न कधीच पुढे मांडला नाही. सामाजिक सुधारणावादी पक्ष हरला त्याचे कारण हेच आहे. या युक्तिवादाने, राजकीय सुधारणा वस्तुतः सामाजिक सुधारणेच्या आधी घडली ही वस्तुस्थिती बदलता येऊ शकणार नाही, याची मला जाणीव आहे. परंतु फार नाही तरी या युक्तिवादाला इतके जरूर महत्व आहे की, सामाजिक सुधारणावादी लढाई का हरले, याचा या युक्तिवादाने खुलासा होतो. राजकीय सुधारणावादी पक्षाने सामाजिक सुधारणावादी पक्षावर जो विजय मिळवला तो किती मर्यादित होता आणि सामाजिक सुधारणा ही राजकीय सुधारणेच्या आधी होण्याची गरज नाही हा दृष्टिकोण जर सामाजिक सुधारणा याचा अर्थ कुटुंबाची सुधारणा असा घेतला तरच टिकू शकणारा दृष्टिकोण आहे, हे समजून घेण्यात या युक्तिवादाची आपणास मदत होते. म्हणजे समाजाची पुनर्रचना या अर्थाने असलेल्या सामाजिक सुधारणेआधी राजकीय सुधारणा येऊ शकत नाही. हा सिद्धांत नाकारता येऊ शकत नाही याची मला खात्री आहे. राजकीय संविधाननिर्मात्यांनी सामाजिक शक्तींना विचारात घेतलेच पाहिजे ही वस्तुस्थिती आहे व ती कार्ल मार्क्सचा मित्र व सहकारी असलेल्या फर्निनंड लासेलसारख्या व्यक्तीनेही मान्य केली आहे. प्रशियन श्रोत्यांसमोर भाषण देताना १८६२ मध्ये लॅसेन असे म्हणाला-

''पहिली गोष्ट म्हणजे संविधानिक प्रश्न हे हक्काचे प्रश्न नसून बळाचे प्रश्न असतात. एखाद्या देशाचे खरे संविधान हे त्या देशात अस्तित्वात असलेल्या शक्तीच्या प्रत्यक्ष स्थितीतच केवळ अस्तित्वात असते. म्हणून राजकीय संविधाने समाजांतर्गत व्यवहारात अस्तित्वात असलेल्या त्या शक्तींच्या स्थितींना जेव्हा अचूकपणे व्यक्त

करतात तेव्हाच त्या राजकीय संविधानांना महत्त्व व स्थिरता प्राप्त होते.''

परंतु प्रशियापर्यंत जाण्याची गरज नाही. त्याचा घरीच पुरावा आहे. भिन्न वर्ग व समाज यांना स्पष्ट नेमून दिलेल्या प्रमाणात भारतीय निवाड्याने केलेले राजकीय सत्तेचे वाटप या संदर्भात जातीय निवाड्याला काय महत्त्व आहे? माझ्या मते, त्याचे महत्त्व राजकीय संविधानाने सामाजिक संघटनाची दखल घेतलीच पाहिजे यात आहे. त्यावरून असे दिसते की, ज्या राजकारण्यांनी भारतातील सामाजिक प्रश्नांचा राजकीय प्रश्नांशी असलेला संबंध नाकारला होता त्यांना संविधान तयार करताना सामाजिक प्रश्नांचा समाचार घेणे भाग पडले. अगदी शब्दशः जरी नाही तरी जातीय निवाडा हा सामाजिक सुधारणेबाबतची उदासीनता व दुर्लक्ष यांचा पाठपुरावा करणारी योग्य शिक्षा आहे. तो सामाजिक सुधारणावादी पक्षाचा विजय आहे. जरी सामाजिक सुधारणावादी पक्ष हरला तरी सामाजिक सुधारणेला महत्त्व देण्याचा आग्रह धरण्यात त्यांची बाजू सत्य आणि न्याय्य होती. अनेकजण हा निष्कर्ष मान्य करणार नाहीत, याची मला कल्पना आहे. जातीय निवाडा हा अस्वाभाविक असून तो अल्पसंख्यांक आणि नोकरशाही यांच्यामधील अपवित्र सलोख्याची फलश्रुती आहे, हा प्रचलित दृष्टिकोण असून त्यावर विश्वास ठेवणे आनंददायक आहे. जातीय निवाडा हा चांगला पुरावा नाही, असे जर कुणी म्हणत असतील तर माझ्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ पुरावा म्हणून जातीय निवाड्यावर विसंबून राहण्याची माझी इच्छा नाही. आपण आयर्लंडचे उदाहरण घेऊ. आयरिश होमरूलचा इतिहास काय सांगतो? हे अगदी सुपरिचित आहे की, अल्स्टर आणि दक्षिण आयर्लंड यांच्या प्रतिनिधींमध्ये वाटाघाटी चालू असताना, संपूर्ण आयर्लंडला सामाईक असलेल्या होमरूल संविधानात अल्स्टरला आणण्यासाठी दक्षिण आयर्लंडचे प्रतिनिधी मिस्टर रेडमंड हे अल्स्टरच्या प्रतिनिधींना म्हणाले, ''तुम्हाला वाटेल तेवढी राजकीय संरक्षणे मागा. ती तुम्हाला मिळतील.''अल्स्टरच्या लोकांनी दिलेले उत्तर काय होते? त्यांचे उत्तर होते, 'तुमच्या संरक्षणांचा धिक्कार असो. काहीही झाले तरी तुम्ही आमच्यावर राज्य करावे हेच आम्हाला नको आहे.' जे लोक भारतातील अल्पसंख्यांकांना दोष देतात त्यांनी, जर अल्पसंख्यांकानी अल्स्टरने घेतला होता तो पवित्रा घेतला असता तर बहुसंख्यांकांच्या राजकीय आकांक्षांचे काय झाले असते, याचा विचार केला पाहिजे. आयरिश होमरूल बाबतच्या अल्स्टरच्या दृष्टिकोणाने विचार केल्यास, तेथील अल्पसंख्यांकांनी बहुसंख्यांकांना आपल्यावर राज्य करण्यास सहमती दिली, यात मुत्सद्देगिरीचा फारसा शहाणपणा त्यांनी दाखवला नसला तरी त्यांच्यापासून त्यांनी काही संरक्षणे अपेक्षिली होती, असे नव्हते काय? परंतु हे केवळ प्रासंगिक आहे. मुख्य प्रश्न आहे अल्स्टरने हा दृष्टिकोण का स्वीकारला? मी त्याचे एकमेव उत्तर देऊ शकतो ते असे- अल्स्टर आणि आयर्लंड यांच्यामध्ये सामाजिक प्रश्न होता. तो कॅथॉलिक व प्रोटेस्टंट यांच्यामधील प्रश्न होता. तो मूलतः जातीचा प्रश्न होता. म्हणजे आयर्लंडमधील होमरूल हे रोमरूल

असेल या यतीवर अल्स्टर लोकांनी त्यांचे उत्तर तयार केले होते. परंतु राजकीय प्रश्नाच्या सोडवणुकीत ज्याने अडथळा आणला असा तो कॅथॉलिक व प्रोस्टेस्टंट यांच्यामधील जातीचा सामाजिक प्रश्न होता, हे सांगण्याचा हा केवळ दुसरा मार्ग आहे. ह्या पुराव्यावर खात्रीने पुन्हा आक्षेप घेण्यात येईल. येथे देखील त्यामागे साम्राज्यवाद्यांचा हात काम करीत होता, असा मुद्दा दामटण्यात येईल. परंतु माझे आधार-पुरावे पूर्णपणे संपलेले नाहीत. मी रोमच्या इतिहासातून पुरवा देईन. येथे एखादी दुष्ट बुद्धी कार्य करीत होती, असे कोणी म्हणू शकणार नाही. ज्याने कोणी रोमच्या इतिहासाचा अभ्यास केला असेल त्याला माहीत आहे की, रोमच्या प्रजासत्ताक संविधानात जातीय निवाड्याशी घनिष्ट साम्य असलेले संकेत आहेत. जेव्हा रोममधील राजेशाही नष्ट करण्यात आली तेव्हा राजाचे अधिकार अथवा राजसत्ता ही परराष्ट्र वकील आणि सर्वात मोठा पोप (पॉन्टिफेक्स मॅक्झिमस) यांच्यामध्ये विभागण्यात आली. परराष्ट्र वकिलामध्ये राजाचा धर्मनिरपेक्ष प्राधिकार निहित होता, तर सर्वोच्च पोपने राजाचा धार्मिक प्राधिकार स्वीकारला होता. या प्रजासत्ताक संविधानात अशी तरतूद करण्यात आली होती की, दोन परराष्ट्र वकिलांपैकी एक पॅट्रिशियन आणि दुसरा प्लेबियन असला पाहिजे. त्याच संविधानाने अशी देखील तरतूद केली होती की, सर्वोच्च पोपच्या अधिकाराखालील पुरोहितांपैकी अर्धे पुरोहित हे प्लेबियन व अन्य अर्धे पॅट्रिशियन असले पाहिजेत. मी म्हटल्याप्रमाणे, जातीय निवाड्याच्या तरतुदींशी इतके घनिष्ट साम्य असलेल्या ह्या तरतुदी रोमच्या प्रजासत्ताक संवधिानात का आहेत? त्याते एकमेव उत्तर मिळू शकते ते असे की, ज्याने दोन जाती निर्माण केल्या आहेत त्या प्रजासत्ताक रोमच्या संविधानाला पॅट्रिशियन व प्लेबियन यांच्यामधील सामाजिक विभाजनाला विचारात घ्यावे लागले. सारांश, राजकीय सुधारक त्यांना आवडेल त्या कोणत्याही दिशेने जावोत, घटना निर्माण करताना प्रचलित समाजव्यवस्थेतून उत्पन्न होणाऱ्या प्रश्नाकडे ते दुर्लक्ष करू शकत नाहीत, हे त्यांना दिसून येईल.

सामाजिक आणि धार्मिक समस्यांचा संबंध राजकीय घटने असतो. या प्रस्तावाच्या पृष्ट्यर्थ मी घेतलेली ही उदाहरणे अगदीच वेचक उदाहरणे आहेत असे वाटेल. कदाचित तशी ती असतीलही. परंतु त्यांचा एकाचा दुसऱ्याशी असलेला संबंध हा मर्यादित आहे अशी कल्पना करून घेऊ नये. उलटपक्षी कोणी असे म्हणू शकेल की, सर्वसाधारणपणे सांगायचे तर, राजकीय क्रांत्यांच्या आधी नेहमीच सामाजिक व धार्मिक क्रांत्या घडून आल्या आहेत, हा इतिहासाचा सिद्धांत आहे. ल्यूथरने सुरू केलेली धार्मिक सुधारणा हे युरोपियन लोकांच्या राजकीय बंधमुक्तीचे पूर्वचिन्ह होते. इंग्लंडमध्ये प्युरिटॅनिझमने राजकीय स्वातंत्र्याची प्रस्थापना घडवून आणली. प्युरिटॅनिझमने नव्या जगाचा पाया रचला. अमेरिकन स्वातंत्र्याचे युद्ध ज्याद्वारे जिंकले गेले तो प्युरिटॅनिझम होता व प्युरिटॅनिझम ही एक धार्मिक चळवळ होती.

तीच गोष्ट मुस्लिम साम्राज्याच्या बाबतीतही खरी आहे. अरबांची राजकीय सत्ता बनण्यापूर्वी त्यांना प्रेषित महंमदाने सुरू केलेल्या धार्मिक क्रांतीतून जावे लागले. इतकेच काय, भारतीय इतिहास देखील याच निष्कर्षाला पुष्टी देतो. चंद्रगुप्ताने घडवून आणलेल्या राजकीय क्रांतीच्या आधी बुद्धाची धार्मिक व सामाजिक क्रांती घडली होती. शिवाजीने घडविलेल्या राजकीय क्रांतीआधी महाराष्ट्राच्या संतांनी धार्मिक व सामाजिक सुधारणा घडवून आणल्या होत्या. शिखांच्या राजकीय क्रांतीआधी गुरु नानक यांनी धार्मिक व सामाजिक क्रांती घडवून आणली होती.

या पेक्षा अधिक दाखले देणे आवश्यक होईल. लोकांचा राजकीय विकास होण्यासाठी त्यांच्या मनाची व आत्म्याची मुक्ती होणे ही एक आवश्यक अशी प्राथमिक गोष्ट आहे, हे दर्शविण्यास एवढे पुरेसे होईल.

## ३.

आता मी समाजवाद्यांकडे वळतो. समाजव्यवस्थेतून निर्माण झालेल्या प्रश्नाकडे समाजवादी दुर्लक्ष करू शकतात का? भारतातील समाजवादी त्यांच्या युरोपियन मित्रांचे अनुकरण करून इतिहासाचे आर्थिक स्पष्टीकरण भारतातील परिस्थितीला लावू पाहत आहेत. मनुष्य हा एक आर्थिक प्राणी आहे, त्याची कृत्ये आणि आकांक्षा या आर्थिक परिस्थितीशी निगडीत आहेत, संपत्ती हेच सत्तेचे एकमेव उगमस्थान आहे, असे ते प्रतिपादन करतात. त्यामुळे ते, राजकीय व सामाजिक सुधारणा या निव्वळ भ्रम असून संपत्तीच्या समानीकरणाद्वारे इतर हरेक प्रकारच्या सुधारणेच्या आधी आर्थिक सुधारणा घडली पाहिजे असा प्रचार करतात. आर्थिक सुधारणेला इतर कोणत्याही प्रकारच्या सुधारणेपेक्षा प्राधान्य असले पाहिजे हे समाजवाद्यांचे म्हणणे ज्यावर आधारलेले आहे त्या ह्या पूर्वपक्षांपैकी प्रत्येक पूर्वपक्षाबाबत प्रश्न विचारता येईल. कोणी असे म्हणू शकेल की, ज्याद्वारे माणूस कार्यप्रवण केला जातो असा आर्थिक हेतू हे एकमेव हेतू नाही. आर्थिक शक्ती हीच एकमेव शक्ती आहे, ही गोष्ट मानवी समाजाचा कोणताही विद्यार्थी मान्य करू शकत नाही. एखाद्या व्यक्तीचा सामाजिक दर्जा पुष्कळदा आपोआप सत्ता व प्राधिकार यांचे उगमस्थान बनतो. ही गोष्ट महात्म्यांचा सामान्य लोकांवर जो पगडा असतो त्यावरून स्पष्ट होते. भारतातील लक्षाधीश हे निर्धन साधू व फकीर यांचे आज्ञापालन का करतात? भारतातील लाखो गरीबही त्यांचे असेल नसेल ते किडुकमिडुक विकून बनारसला वा मक्केला का जातात? भारताच्या इतिहासाने धर्म हे शक्तीचे उगमस्थान आहे, हे दर्शवले आहे. जेथे सामान्य माणसावर पुष्कळदा मॅजिस्ट्रेटपेक्षा पुरोहिताचा अधिक प्रभाव आहे, तेथे प्रत्येक गोष्ट, संप व निवडणुका यांसारख्या गोष्टी देखील, अगदी सहजपणे धार्मिक वळणे घेतात व अगदी सहजपणे त्यांना विपर्यस्त असा धार्मिक अर्थ लावला जातो. माणसांवरील

धर्मसत्तेच्याप्रभावाचे आणखी एक उदाहरण म्हणून रोमच्या प्लेबियनांचे उदाहरण विचारात घेतले तर या मुद्यावर अधिक प्रकाश टाकते. रोमन प्रजासत्ताकाखालील सर्वोच्च कार्यकारिणीमध्ये हिस्सा मिळण्यासाठी प्लेबियनांनी लढा दिला आणि त्यांनी 'कॉमिटीआ सेंचुरिआटा' ने (शंभर जणांच्या समितीने), जी प्लेबियन लोकांची सभा होती, स्थापन केलेल्या स्वतंत्र मतदार संघाने निवडून दिलेल्या प्लेबियन परराष्ट्र वकिलाची नेमणूक करून घेतली. पॅट्रिशियन वकील प्रशासन चालवताना प्लेबियन लोकांच्या विरुद्ध पक्षपात करीत असतात असे वाटल्यामुहे त्यांना त्यांचे स्वतःचे वकील हवे होते. त्यांनी वरवर मोठा लाभ मिळविला, कारण रोमच्या प्रजासत्ताक संविधानाखाली एका परराष्ट्र वकिलाला दुसऱ्या परराष्ट्र वकिलाच्या कृतीला मनाई करण्याचा अधिकार होता. परंतु खरोखर त्यांना एखाद्या गोष्टीचा लाभ झाला काय? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल. ज्याला प्रबळ माणूस म्हणता आले असते व जो पॅट्रिशियन परराष्ट्र-वकिलापेक्षा अधिक स्वतंत्र राहून कार्य करू शकला असता असा प्लेबियन परराष्ट्र-वकील प्लेबियनांना कधीच मिळू शकत नव्हता. प्लेबियनांच्या स्वतंत्र मतदार संघाद्वारे प्लेबियन परराष्ट्र-वकिलाची निवड झाली असती, ही वस्तुस्थिती पाहता सर्वसाधारण परिस्थिती प्लेबियनांना समर्थ प्लेबियन परराष्ट्र वकील मिळायला हवा होता. प्रश्न पडतो की, त्यांना त्यांचा परराष्ट्र वकील म्हणून काम पाहण्यासाठी एखादा समर्थ प्लेबियन मिळविण्यात ते का अपयशी ठरले? या प्रश्नाच्या उत्तरावरून माणसांच्या मनांवर धर्माचा जो पगडा आहे तो उघड होतो. संपूर्ण रोमन लोकसमुदायाने मान्य केलेले तत्त्व असे होते की, डेल्फीच्या कौलाने 'तो देवतेस स्वीकारार्ह आहे' असे जाहीर केल्याशिवाय कोणताही अधिकारी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारू शकत नव्हता. डेल्फीच्या देवतेच्या मंदिराचा ताबा असलेले पाद्री हे सर्वच्या सर्व पॅट्रिशियन होते. त्यामुळे जेव्हा केव्हा प्लेबियनांनी पॅट्रिशियनांना विरोध केलेला, अथवा भारतात प्रचलित असलेला शब्द वापरायचा तर 'जातीयवादाला' विरोध केलेला, पक्षाचा समर्थ माणूस म्हणून ओळखण्यात येणारा परराष्ट्र-वकील निवडला त्या त्यावेळी कौलाद्वारे न चुकता जाहीर केले गेले की, 'तो देवतेला स्वीकारार्ह नाही.' अशा प्रकारे प्लेबियनांना त्यांचया हक्काच्या बाबतीत फसवण्यात आले. परंतु लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, प्लेबियनांनी अशाप्रकारे स्वतःला फसू दिले, कारण त्यांनासुद्धा पॅट्रिशियन आवडत होते. एखाद्या अधिकाऱ्याने त्याचा कर्तव्यभार स्वीकारण्यापूर्वी देवतेची मान्यता मिळविणे ही अपूर्वअट होती आणि लोकांनी केलेली निवड ही पुरेशी नाही, असा त्यांचा दृढ विश्वास होता. जर प्लेबियनांनी लोकांची निवड पुरेशी असून देवतेची मान्यता आवश्यक नाही असे म्हटले असते, तर त्यांना जे प्राप्त झाले त्यापेक्षा अधिक राजकीय हक्कांचा संपूर्ण फायदा मिळवता आला असता. परंतु त्यांनी तसे केले नाही. ते आपल्यासाठी कमी योग्यतेचा परंतु देवतेसाठी अधिक योग्यतेचा, वास्तविक अर्थाने पॅट्रिशियन लोकांच्या अधिक अधीन असलेला, असा

दुय्यम दर्जाचा माणूस निवडण्यास तयार झाले. कदाचित, धर्माचा त्याग करण्यापेक्षा ज्याच्यासाठी ते एवढे निकराने लढले त्या भौतिक लाभांचा त्यांनी त्याग केला. धर्म हे पैशापेक्षा अधिक मोठे नसले तरी पैशासारखेच सत्तेचे उगमस्थान असू शकते, ही गोष्ट यावरून दर्शविली जात नाही काय? युरोपियन समाजाच्या सध्याच्या अवस्थेत सत्तेचे उगमस्थान म्हणून संपत्ती ही वर्चस्व गाजवणारी असल्यामुळे तीच गोष्ट भारतालादेखील लागू आहे किंवा तीच गोष्ट भूतकाळात युरोपलादेखील लागू होती, अशी कल्पना करून घेण्यात समाजवाद्यांची चूक झाली आहे. धर्म, सामाजिक दर्जा व संपत्ती ही सर्व सत्तेची व प्राधिकाराची उगमस्थान आहेत. ती ज्या माणसाकडे असतील तो दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर नियंत्रण आणतो. एका टप्प्यावर एकाचे वर्चस्व असते तर दुसऱ्या टप्प्यावर दुसऱ्याचे वर्चस्व असते. हाच केवळ फरक आहे. स्वातंत्र्य हा जर आदर्श असेल, जर स्वातंत्र्य याचा अर्थ, एकाच्या दुसऱ्यावर असलेल्या वर्चस्वाचा नाश असा असेल, तर उघडच जिचा पाठपुरावा करावा अशा योग्यतेच्या सुधारणेचा एक प्रकार म्हणून आर्थिक सुधारणेचा आग्रह धरता येऊ शकत नाही. एका विशिष्ट काळात आणि विशिष्ट समाजात सत्तेचे व वर्चस्वाचे उगमस्थान जर सामाजिक व धार्मिक असेल तर सामाजिक सुधारणा व धार्मिक सुधारणा या आवश्यक स्वरूपाच्या सुधारणा म्हणून स्वीकारल्याच पाहिजेत.

अशाप्रकारे भारतातील समाजवाद्यांनी स्वीकारलेल्या इतिहासाच्या आर्थिक स्पष्टीकरणाच्या सिद्धांतावर हल्ला करू शकेल; परंतु संपत्तीचे समानीकरण हीच केवळ खरीखुरी सुधारणा असून ती इतर कोणत्याही गोष्टीच्या आधी घडली पाहिजे, या समाजवादी विधानाच्या पुष्ट्यर्थ इतिहासाचे आर्थिक स्पष्टीकरण आवश्यक नाही, असे मी मानतो. तथापि मला समाजवाद्यांना विचारावेसे वाटते ते हे- प्रथम समाजरचनेत सुधारणा घडवून आणल्याशिवाय तुमची आर्थिक सुधारणा घडू शकते काय? भारतील समाजवाद्यांनी याप्रश्नाचा विचार केला असल्याचे दिसत नाही. मला त्यांच्यावर अन्याय करण्याची इच्छा नाही. एका अग्रगण्य समाजवाद्याने काही दिवसांपूर्वी माझ्या एका मित्राला लिहिलेल्या पत्रातील एक अवतरण देत आहे. त्यात त्याने म्हटले आहे, 'जोपर्यंत ही अन्याय्य वागणूक आणि एका वर्गाने दुसऱ्या वर्गाचे केलेले दमन चालू असेल तोपर्यंत भारतात आपण स्वतंत्र समाजाची उभारणी करू शकू, यावर माझा विश्वास बसत नाही. समाजवादी आदर्शांवर मी विश्वास ठेवतो. त्यानुसार, मी विविध वर्गांच्या व निश्चितच गटांच्या व्यवहारात पूर्ण समतेवर विश्वास ठेवतो. मला असे वाटते की, या आणि इतर प्रश्नांसाठी समाजवादच केवळ खरीखुरी उपाययोजना करतो.' यावर मला असा प्रश्न विचारावासा वाटतो, 'मी विविध वर्गांच्या व्यवहारात पूर्ण समतेवर निश्चितपणे विश्वास ठेवतो' एवढेच म्हणणे समाजवाद्यांसाठी पुरेसे आहे काय? असाच विश्वास पुरेसा आहे असे म्हणणे हे समाजवादात जे अंतर्भूत आहे त्याविषयी संपूर्ण अज्ञान प्रकट करणे होय. जर समाजवाद हा व्यावहारिक कार्यक्रम

असेल, जर तो केवळ अंधुक व दूरचा आदर्श नसेल तर समाजवादी माणूस समतेवर विश्वास ठेवतो की नाही हा प्रश्न नाही. एक वर्ग दुसऱ्या वर्गाला वाईट वागणूक देत आहे व त्याचे दमन करीत आहे याचा, व्यवस्थेचा एक भाग म्हणून, तत्त्वाचा एक भाग म्हणून, तो विचार करतो किंवा कसे व अशाप्रकारे एक वर्ग दुसऱ्या वर्गापासून विभक्त करण्यासाठी जुलूम व जबरदस्ती चालू देतो किंवा कसे, हा त्याच्यासाठी खरा प्रश्न आहे.

मी माझा मुद्दा पूर्णपणे स्पष्ट करण्यासाठी समाजवाद समजून घेण्यात अंतर्भूत असलेल्या घटकांचे मी विश्लेषण करू इच्छितो. आता हे उघड आहे की, समाजवाद्यांनी कल्पना केलेली आर्थिक सुधारणा सत्ता काबीज करण्यात परिणत होणारी क्रांती झाल्याशिवाय घडू शकत नाही. त्यासाठी कामगारवर्गाने सत्ता काबीज केलीच पाहिजे. माझा पहिला प्रश्न असा आहे : ही क्रांती घडविण्यासाठी भारतातील कामगारवर्ग एकत्र येईल काय? अशी कृती करण्यासाठी माणसांना कोणती गोष्ट प्रेरित करील? मला असे वाटते की, इतर गोष्टी समान असल्यामुळे, अशी कृती करण्यास माणसांना प्रेरीत करील अशी एकमेव गोष्ट म्हणजे तो ज्याच्याशी वर्तन करीत आहे त्या दुसऱ्या माणसाबरोबर समता व बंधुता, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'न्याय' या भावनेने कार्यप्रवण झालेली भावना होय. क्रांती साध्य केल्यानंतर लोकांना समानतेने वागवण्यात येईल व त्यांच्यात जात व वंश याबाबतीत कसलाही भेदभाव केला जाणार नाही, हे लोकांना माहीत झाल्याशिवाय संपत्तीच्या समानीकरणासाठी असलेल्या क्रांतीत लोक सामील होणार नाहीत. क्रांतीचे नेतृत्व करणारा समाजवादी हा जातीवर विश्वास ठेवीत नाही, एवढे आश्वासन पुरेसे ठरणार नाही याची मला खात्री आहे. ते आश्वासन अधिक खोलवर असलेल्या आधारातून, म्हणजे व्यक्तिगत समता व बंधुता ही भावना असलेली देशबांधवांची एकमेकांबाबतची मनोवृत्ती यातून आलेले असले पाहिजे. गरीब असलेला भारतातील कामगारवर्ग हा गरीब व श्रीमंत या भेदांच्याव्यतिरिक्त अन्य कोणतेही भेद मानत नाही असे खरोखर म्हणता येऊ शकेल काय? भारतातील गरीब हे जात किंवा वंश, उच्च किंवा नीच असे कोणतेच भेद मानत नाहीत, असे म्हणता येऊ शकेल काय? कामगारवर्ग जी कृती करतो ती जर वस्तुस्थिती असेल तर श्रीमंतांविरुद्धची कामगारवर्गाची कृती म्हणून अशा कामगारवर्गाकडून कसल्या आघाडीच्या ऐक्याची अपेक्षा करता येऊ शकेल? जर कामगारवर्ग सामूहिक आघाडी उभारू शकला नाही तर क्रांती कशी काय होऊ शकेल? युक्तिवादासाठी जरी अशी कल्पना केली की, काही विलक्षण योगायोगाने क्रांती घडली आणि समाजवादी सत्तेवर आले, तर भारतात प्रचलित असलेल्या विशिष्ट समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या प्रश्नांची त्यांना तड लावावी लागणार नाही काय? ज्यांनी भारतीय लोकांना उच्च आणि नीच, स्वच्छ आणि अस्वच्छ असे भेद पाळावयास लावले आहेत, त्या पूर्वग्रहांनी निर्माण केलेल्या प्रश्नांशी न झुंजता भारतातील समाजवादी राज्य एक क्षणभर तरी

कसे काय चालू शकेल, याची मी कल्पनाच करू शकत नाही. जर समाजवादी लोक तोंडाने चांगले उद्गार काढण्यापुरतेच समाधानी नसतील, समाजवाद्यांना समाजवाद स्पष्टपणे वास्तवात आणावयाचा असेल तर त्यांनी समाजसुधारणेचा प्रश्न हा मूलभूत प्रश्न आहे, हे मान्य केलेच पाहिजे. त्याशिवाय त्यांची सुटका नाही. भारतात प्रचलित असलेली समाजव्यवस्था ही अशी आहे की, तिची समाजवाद्याला व्यवस्था लावलीच पाहिजे. त्याने असे केल्याशिवाय तो क्रांती साध्य करू शकत नाही. आणि जरी नशिबाने ती त्याला साध्य करता आली तरी त्यांला जर त्याचे ध्येय प्रत्यक्षात आणण्याची इच्छा असेल तर त्यासाठी त्याला झुंज ही द्यावीच लागेल, हे माझ्या मते निर्विवाद आहे. त्याने जर क्रांतीच्या आधी जातीव्यवस्था विचारात घेतली नसेल तर त्याला क्रांतीनंतर ती विचारात घेणे भाग पडेल. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे, तुम्हाला वाटेल त्या कोणत्याही दिशेने जा, तुम्ही या राक्षसाला ठार केल्याशिवाय तुमची राजकीय सुधारणा होऊ शकणार नाही, तुमची आर्थिक सुधारणा होऊ शकणार नाही.

## ४.

जातीव्यवस्थेचे समर्थक आजदेखील आहेत, ही खेदाची गोष्ट आहे. समर्थने अनेक आहेत. जातीपद्धती हे केवळ श्रम-विभाजनाचे दुसरे नाव आहे, या सबबीवर तिचे समर्थन करण्यात येते, आणि जर श्रम-विभाजन हे प्रत्येक सुसंस्कृत समाजासाठी आवश्यक लक्षण असेल तर मग जातीपद्धतीमध्ये काहीही गैर नाही, असा युक्तिवाद करण्यात येतो. आता या मताविरुद्ध पहिली गोष्ट ठामपणे मांडली पाहिजे ती ही की, जातीपद्धती हे केवळ श्रमाचे विभाजन नाही, ते श्रमिकांचेदेखील विभाजन आहे. सुसंस्कृत समाजासाठी निःसंशयपणे श्रमाच्या विभाजनाची गरज असते. परंतु कोणत्याही सुसंस्कृत समाजात श्रमाच्या विभाजनाबरोबर जलभेद्य डब्यांप्रमाण श्रमिकांचे अस्वाभाविक विभाजन नसते. जातीपद्धती हे श्रमाच्या विभाजनाहून अगदी भिन्न असलेले केवळ श्रमिकांचे विभाजनच नाही, तर ज्यामध्ये श्रमिकांच्या विभाजनांची एकावर एक श्रेणी लावण्यात आली आहे अशी ती वंशपरंपरादेखील आहे. दुसऱ्या कोणत्याही देशात श्रमिकांचे विभाजनाबरोबर श्रमिकांचे हे श्रेणीकरण येत नाही. जातीपद्धतीच्या या मताविरुद्ध टीकेचा तिसरा एक मुद्दादेखील आहे. हे श्रमिकांचे विभाजन नैसर्गिक नाही, हे नैसर्गिक प्रवृत्तीवर आधारलेले नाही. सामाजिक आणि वैयक्तिक कार्यक्षमतेसाठी व्यवसायाची निवड करण्यास व क्षमतेच्या मुद्याला धरून तो अंगीकारण्यास व्यक्तीचा वकूब वाढविणे आपणास आवश्यक ठरते. जातीपद्धतीमध्ये या तत्त्वाचे उल्लंघन झालेले असते, कारण जातीपद्धतीमध्ये व्यक्तींना अगोदरच कामे नेमून देण्याचा प्रयत्न करण्यात येतो. त्यांची विशिष्ट वळण लावलेल्या

मूळ वकुबाच्या आधारे निवड झालेली नसते, तर ती आईवडिलांच्या सामाजिक दर्जावर झालेली असते. याकडे दुसऱ्या दृष्टिकोणातून पाहता, जातीपद्धतीचा परिणाम असलेले हे व्यवसायांचे स्तरीकरण निःसंशयप्रणे घृणास्पद आहे. उद्योग कधीच स्थिर नसतो. त्यात वेगाने व अचानक बदल घडून येत असतात. अशा बदलानुसार व्यक्तीला त्याचा व्यवसाय बदलण्यास मोकळीक असली पाहिजे. बदलत्या परिस्थितीत स्वतःला जुळवून घेण्यासाठी असे स्वातंत्र्य नसेल तर त्याला त्याची उपजीविका करणे अशक्य होईल. परंतु जातीपद्धतती हिंदूंना, त्यांना वंशपरंपरेने जो मिळालेला नसेल असा, वाटेल तो व्यवसाय करण्यास मुभा देणार नाही. एकादा हिंदू जर त्याच्या जातीने सोपवलेले नाहीत असे म्हणून नवे व्यवसाय करण्याऐवजी उपाशी मरताना दिसून आला तर त्याचे कारण जातीपद्धतीत शोधावे लागेल. परंतु व्यवसायात योग्य ते बदल करण्यास परवानगी न दिल्याने आपणास देशात मोठ्या प्रमाणात दिसून येणाऱ्या बेकारीचे 'जात' हे थेट कारण बनते. जातीपद्धती ही श्रमिकांच्या विभाजनाचा एक प्रकार असल्यामुळे तिच्यात दुसरा एक गंभीर दोष आहे. जातीपद्धतीने घडविलेले श्रमविभाजन हे निवडीवर आधारलेले विभाजन नाही. व्यक्तिगत भावना, व्यक्तिगत आवड यांना त्यात कसलेही स्थान नाही, ते दैववादाच्या तत्त्वावर आधारलेले आहे. सामाजिक क्षमतेचा विचार करता औद्योगिक पद्धतीतील सर्वात मोठा दुर्गुण केवळ गरिबी आणि त्यात अंतर्भूत असलेले दुःख नाही. कारण अनेक लोकांना, ते ज्यात गुंतले आहेत त्या धंद्याबद्दल कसलेही आकर्षणं नाही ही वस्तुस्थिती आहे, हे आपणाला मान्य करावेचं लागेल. असे धंदे एखाद्याला तिटकारा, द्वेष आणि कामाची सातत्याने टाळाटाळ करण्यास प्रवृत्त करतात. भारतात हिंदूंनी नीच मानलेले अनेक व्यवसाय आहेत. त्यामुळे जे त्यात गुंतले आहेत त्यांना त्या व्यवसायाबद्दल तिटकारा वाटू लागतो. हिंदू धर्माने अशा व्यवसायांना तुच्छ लेखल्यामुळे आणि त्यांना कलंकित मानल्यामुळे ते व्यवसाय करणाऱ्यांवार परिणाम घडून येतो. या एकमेव कारणामुळे असे व्यवसाय टाळण्याची व त्यांच्यापासून सुटका करून घेण्याची प्रबळ इच्छा निर्माण होते. ज्या व्यवस्थेत माणसांची अंतःकरणे काम करीत नाहीत किंवा त्यांची मनेही काम करीत नाहीत अशा व्यवस्थेत कसली कार्यक्षमता असू शकणार? म्हणून माणसाच्या नैसर्गिक शक्तींना आणि सामाजिक नियमांच्या निकडीविषयीच्या मनःप्रवृत्तींना जोपर्यंत जातीव्यवस्थेत गौणत्व देण्याचा प्रयत्न होतो तोपर्यंत जातीव्यवस्था ही एखाद्या आर्थिक संघटनेप्रमाणेच घातक संस्था आहे.

५.

काहींनी जातीपद्धतीच्या समर्थनार्थ जीवशास्त्राचा खंदक खोदला आहे. वंशवृद्धी व रक्तशुद्धी यांची जपणूक करणे, हा जातीचा उद्देश होता, असे म्हटले जाते. आता शुद्ध वंशाची माणसे कोठेच अस्तित्वात नाहीत व जगातील सर्व भागांमध्ये सर्व वंशांचे मिश्रण झालेले आहे, असे मानववंशशास्त्रज्ञांचे मत आहे. ही गोष्ट भारतातील लोकांना विशेष करून लागू आहे. श्री. डी. आर. भांडारकर यांनी त्यांच्या 'फॉरेन एलेमेंटस् इन हिंदू पॉप्युलेशन (हिंदू लोकांतील परकीय रक्तघटक)' या शोधनिबंधात असे म्हटले आहे की, 'ज्यामध्ये परकीय वंश नसेल असा भारतात क्वचितच एखादा वर्ग किंवा जात असू शकेल. रजपूत व मराठा यांसारख्या योद्ध्या वर्गांमध्येच परकीय रक्ताचे संमिश्रण झाले आहे असे नाही, तर सर्व परकीय घटकांपासून आपण मुक्त आहोत या गोड भ्रमात असलेल्या ब्राह्मणांमध्ये देखील ते झाले आहे.' वंशांचे मिश्रण टाळण्याचे एक साधन म्हणून किंवा रक्तशुद्धी टिकवून ठेवण्याचे एक साधन म्हणून जातीव्यवस्था निर्माण झाली, असे म्हणता येऊ शकत नाही. जातींमधील भेद किंवा वस्तुत: वंशांमधील भेद घेऊन वेगवेगळ्या जाती हे जणू काय तितके अनेक वेगवेगळे वंश आहेत, असे समजणे हा वस्तुस्थितीचा उघड उघड विपर्यास आहे. पंजाबमधील ब्राह्मण व मद्रासमधील ब्राह्मण यांच्यामध्ये कसले वांशिक साम्य आहे? बंगालच्या अस्पृश्यामध्ये व मद्रासच्या अस्पृश्यामध्ये कसले वांशिक साम्य आहे? पंजाबच्या ब्राह्मणामध्ये व पंजाबच्या चांभारामध्ये (चमार) मध्ये कोणता वांशिक फरक आहे? मद्रासच्या ब्राह्मणामध्ये व मद्रासच्या परिआमध्ये कोणता वांशिक फरक आहे? पंजाबचा ब्राह्मण वांशिकदृष्ट्या पंजाबच्या चांभाराच्या वंशाचा आहे आणि मद्रासचा ब्राह्मण हा मद्रासचा परिआ ज्या वंशाचा त्याच वंशाचा आहे. जातीपद्धती ही वांशिक विभाजनाची मर्यादा घालू देत नाही. जातीपद्धती हे एकाच वंशाच्या लोकांचे सामाजिक विभाजन आहे. तथापि जरी जातीपद्धती हे वांशिक विभाजन गृहीत धरले तरी कोणी असे विचारील : वेगवेगळ्या जातींमधील आंतरजातीय विवाहाद्वारे भारतात जर वंशाचे व रक्ताचे मिश्रण घडू दिले तर काय नुकसान होऊ शकेल? माणूस हा इतर प्राण्यांपासून इतका प्रचंड स्वरूपात वेगळा ठरला आहे की, त्यामुळे माणसे व प्राणी या दोन विभिन्न जाती आहेत, असे विज्ञान मानते यात शंकाच नाही. परंतु जे शास्त्रत्र वंशशुद्धीवर विश्वास ठेवतात ते शास्त्रज्ञदेखील, वेगवेगळे वंश हे माणसांच्या वेगवेगळ्या जाती घडवितात असे खात्रीपूर्वक सांगत नाहीत. जाती ह्या एकाच मनुष्यजातीच्या केवळ विविधता आहेत. त्यामुळे त्या जाती आंतरप्रजोत्पादन करून प्रजोत्पादनास सक्षम संतती उत्पन्न करू शकतात. जातीपद्धतीच्या समर्थनार्थ आनुवंशिकतेविषयी प्रचंड प्रमाणात निर्बुद्धपणे सांगण्यात आले आहे. जातीपद्धती जर सुप्रजननशास्त्राच्या मूलभूत तत्त्वाशी जुळती

असती तर फारच थोड्या लोकांनी जातीपद्धतीला आक्षेप घेतला असता, कारण फार थोडे लोक योग्य शरीरसंबंधाद्वारे वंशाच्या सुधारणेला आक्षेप घेऊ शकतात. परंतु जातीपद्धती ही योग्य शरीरसंबंध कशा प्रकारे प्राप्त करते हे समजून येत नाही. कारण विशिष्ट जातीमधील दोन व्यक्तींनी विवाह करावा अशी ती निवड करण्याची विधायक पद्धत नाही. जर जात ही मुळात सुप्रजननशास्त्रीय आहे, तर मग पोट-जातीची उत्पत्तीदेखील सुप्रजननशास्त्रीय असली पाहिजे. मला वाटते असा युक्तिवाद करणे विचित्र ठरू शकेल आणि त्याचे कारण अगदी उघड आहे. जर जात याचा अर्थ वंश असेल तर पोट-जातींचे भेद यांचा अर्थ वंशाचे भेद होऊ शकत नाहीत. कारण पोट-जाती या एका व त्याच वंशाचे पोट-विभाजन बनतात. अखेरीस पोट-जातींमधील आंतरजातीय विवाह व सहभोजन याविरुद्धची मनाई ही वंशाची किंवा रक्ताची शुद्धता दाखवण्याच्या हेतूने असू शकत नाही. जर पोटजाती या मुळात सुप्रजननशास्त्रीय नसतील तर जात ही मुळात सुप्रजनन शास्त्रीय आहे या म्हणण्यात काही तथ्य नाही. आणखी असे की, जर जात ही मुळात सुप्रजननशास्त्रीय असेल तर आंतरजातीय विवाहाविरुद्धची मनाई समजू शकेल; परंतु जाती व पोट-जातींमध्ये देखील सहभोजनावर तशाचा निषेधाज्ञा देण्याचे प्रयोजन काय? सहभोजनाने रक्त दूषित होऊ शकत नाही व त्यामुळे ते वंशाची सुधारणा किंवा नाश यांपैकी कोणत्याही एकाचे कारण होऊ शकत नाही. यावरून हे दर्शविले जाते की, जातीचे कोणतेही शास्त्रीय मूळ नाही व जे तिला सुप्रजननशास्त्राचा आधार देऊ पाहत आहेत ते उघड उघड अशास्त्रीय असलेल्या विचाराचा आधार देण्याचा प्रयत्न करीत आहेत. आजदेखील आनुवांशिकतेच्या नियमांबाबत स्पष्टपणे ज्ञान असल्याखेरीज सुप्रजननशास्त्र ही व्यावहारिक शक्यता बनू शकत नाही. प्रा- बेटसन हे त्यांच्या 'मेंडेल्स प्रिन्सिपल्स ऑफ हेरेडिटी' या ग्रंथामध्ये म्हणतात, 'उच्चतर मानसिक गुण संचाराच्या एखाद्या पद्धतीने मागून पुढे दिले जातात असे सुचविण्यास काहीही आधार नाही. ते आणि शारीरिक शक्तींचे अधिक लक्षणीय विकास हे दोन्ही कदाचित कोणत्यातरी एखाद्या जैविक मूलतत्त्वापासून असण्याऐवजी असंख्य घटकांच्या संयोगाचा परिणाम असणे हे अधिक संभवयनीय आहे.' जातीपद्धती ही मूलारंभापासून सुप्रजननशास्त्रीय होती असा युक्तिवाद करणे म्हणजे सांप्रतच्या हिंदूंच्या वाडवडिलांना आधुनिक शास्त्रालाही अवगत नसलेले वंशांविषयीचे ज्ञान होते असे सांगण्यासारखे आहे. एखाद्या झाडाची योग्यता तो देत असलेल्या फळांवरून ठरते. जात ही जर सुप्रजननशास्त्रीय असेल तर माणसांचा कोणत्या प्रकारचा वंश तिने उत्पन्न करायला हवा होता? शारीरिकदृष्ट्या सांगावयाचे तर हिंदू हे तिसऱ्या दर्जाचे लोक आहेत. ते खुरटलेल्या बांध्याचे, पिग्मी व ठेंगू वंशाचे लोक आहेत. त्यांच्यात खूप वेळ काम करण्याच्या शक्तीचा अभाव आहे. ज्यांच्यापैकी नऊदशांश लोक सैन्यातील सेवेसाठी अपात्र असल्याचे जाहीर करण्यात आले आहे, असे ते राष्ट्र आहे. त्यावरून जातीपद्धतीमध्ये

आधुनिक सुप्रजननशास्त्राचा अंतर्भाव होत नाही, हे दिसून येते. हे हिंदू सामाजिक दर्जामध्ये एक सामाजिक पद्धती रूढ करण्याइतपत श्रेष्ठ होते. ज्यांना त्यांच्यापेक्षा कमी दर्जा असलेल्यांवर ती पद्धती लादण्याचा अधिकार होता अशा हिंदूंच्या विकृत वर्गाचा उद्धटपणा व स्वार्थ यांचा अंतर्भाव असलेली ती एक सामाजिक पद्धती आहे.

## ६.

जातीव्यवस्थेची परिणती आर्थिक कार्यक्षमतेत होत नाही. जातीव्यवस्था वंशाची सुधारणा करू शकत नाही व तिने कधी वंशाची सुधारणा केली नाही. जातीव्यवस्थेने एक गोष्ट मात्र केली. तिने हिंदूंना पूर्णपणे विघटित केले व अनैतिक बनविले.

हिंदू समाज हा मिथ् आहे, ही गोष्ट पहिली व अग्रगण्य गोष्ट असल्याचे मानले पाहिजे. हिंदू हे नावच खुद्द परकीय नाव आहे. ते मुसलमानांनी एतद्देशीयांना, त्यांच्यापासून स्वतःला वेगळे दर्शविण्यासाठी दिले होते. मुसलमानी आक्रमणाच्या आधी कोणत्याही संस्कृत ग्रंथामध्ये ते दिसून येत नाही. हिंदूंना कधी सामूहिक नावाची आवश्यकताच भासली नाही, कारण त्यांनी त्यांचा एक समाज स्थापन केला आहे याची त्यांना कल्पनाच नव्हती. वास्तविक हिंदू समाज अशी गोष्टच अस्तित्वात नाही. तो केवळ जातींचा एक संग्रह आहे. प्रत्येक जातीला तिच्या अस्तित्वाचे भान आहे. ती जिवंत राहणे, यातच तिच्या अस्तित्वाचे सारसर्वस्व आहे. जातींनी एखादा संघदेखील तयार केला नाही. हिंदू-मुस्लिम दंगा सोडल्यास, एका जातीला ती दुसऱ्या जातीशी संबंधित असल्याची भावना नाही. इतर सर्व प्रसंगी प्रत्येक जात इतर जातींपासून स्वतःला वेगळे करण्याचा व स्वतःला वेगळे दर्शविण्याचा प्रयत्न करते. प्रत्येक जात केवळ जातीतच भोजन करते व जातीतच विवाह करते असे नाही, तर प्रत्येक जात तिचा स्वतःचा वेगळा पोषाखदेखील ठरवून देते. भारतीय स्त्री-पुरुषांनी परिधान केलेल्या, पर्यटकांची करमणूक करणाऱ्या अगणित प्रकारच्या पोषाखांचे दुसरे कोणते स्पष्टीकरण असू शकेल? खरोखर आदर्श हिंदू हा इतरांशी कोणतेही संबंध येऊ न देता आपल्या स्वतःच्या बिळात राहणाऱ्या उंदरासारखा आहे. समाजशास्त्रज्ञ जिला 'स्वकीयांविषयीची जाणीव' असे संबोधतात, तिचा हिंदूंमध्ये पूर्णपणे अभाव आहे. स्वकीयांविषयीची कोणत्याही प्रकारची हिंदू जाणीव नाही. प्रत्येक हिंदूमध्ये अस्तित्वात असलेली जाणीव ही त्याच्या जातीची जाणीव आहे. हिंदू एखादा समाज किंवा एखादे राष्ट्र तयार करू शकत नाहीत, असे म्हटले जाते, त्याचे हेच कारण आहे. तथापि भारत एक राष्ट्र नाही, तो केवळ लोकांचा एक अवाढव्य समुदाय आहे, ही गोष्ट देशभक्तीमुळे मान्य करण्यास तयार नसलेले अनेक भारतीय लोक आहेत. त्यांचा असा आग्रह आहे की, बाह्य विभिन्नतेखाली मूलभूत एकता आहे. संपूर्ण भारतवर्षामध्ये दिसून येणाऱ्या सवयी व चालीरीती, श्रद्धा व

विचार यांचा सारखेपणा जो आहे तोच हिंदूंच्या जीवनाचे विशेष लक्षण आहे. सवयी व चालीरीती, श्रद्धा व विचार यांच्यात सारखेपणा आहे. परंतु त्यामुळे हिंदूंचा एक समाज आहे, हा निष्कर्ष कोणी मान्य करू शकणार नाही. असे मान्य करणे म्हणजे समाज ज्याद्वारे घडविला जातो त्या मूलभूत गोष्टींविषयी गैरसमज करून घेण्यासारखे आहे. इतर लोकांपासून कित्येक मैल दूर राहिला म्हणून एखादा माणूस त्याच्या समाजाचा सदस्य राहत नाही असे होत नाही, तसेच माणसे शरीराने सान्निध्यात राहिल्याने त्यांचा एक समाज होत नाही. दुसरी गोष्ट सवयी व चालीरीती, श्रद्धा व विचार यांच्यातील साम्य हे माणसांचा समाज निर्माण करण्यास पुरेसे नाही. वस्तू एकाकडून दुसऱ्याकडे विटांप्रमाणे दिल्या जाऊ शकतात. त्याच पद्धतीने एका गटाच्या सवयी व चालीरीती, श्रद्धा व विचार दुसऱ्या गटाकडून उचलले जाऊ शकतात व अशा प्रकारे त्या दोहोंमध्ये साम्य दिसू शकते. संस्कृती विखरून प्रसारित होते व म्हणून तर वेगवेगळ्या प्राचीन जमातींमध्ये, त्या जरी सान्निध्यात राहत नसल्या तरी, त्यांच्या सवयी व चालीरीती, श्रद्धा व विचार यांबाबतीत कोणास साम्य दिसून येईल. परंतु त्यांच्यात हे साम्य असल्यामुळे प्राचीन जमातीचा एक समाज होता, असे कोणी म्हणू शकणार नाही. त्याचे कारण काही गोष्टींमधील निव्वळ साम्य समाज प्रस्थापित करण्यास पुरेसे नसते. माणसे समाज प्रस्थापित करतात कारण त्यांनी सामाईक गोष्टी जवळ बाळगलेल्या असतात. सारख्या गोष्टी जवळ असणे ही गोष्ट सामायिक गोष्टी जवळ बाळगणे याहून संपूर्णपणे भिन्न आहे आणि एकमेकांशी देवाणघेवाण ठेवणे, हा एकमेव मार्गानेच लोक एकमेकांजवळ सामायिक गोष्टी बाळगू शकतात. हेच केवळ दुसऱ्या प्रकारे सांगावयाचे म्हणजे, समाज देवाणघेवाणीवर, खरोखर देवाणघेवाणीवरच अस्तित्वात राहत असतो. नेमक्या शब्दांत सांगायचे तर लोकांनी इतरांच्या कृतीशी जुळेल अशा मार्गाने कृती केली म्हणजे पुरेसे नाही. समांतर कार्य जरी सारखे असले तरी लोकांना समाजामध्ये बांधावयास ते पुरेसे नाही. हिंदूंमधील वेगवेगळ्या जातींकडून पाळण्यात येणारे सण सारखे आहेत, तरीही वेगवेगळ्या जातींकडून एकसारख्या सणांच्या ह्या समांतर कार्यांनी त्यांना (एका संपूर्ण एकात्मीकृत समाजात) बांधलेले नाही, या वस्तुस्थितीने ही गोष्ट सिद्ध केलेली आहे. त्या प्रयोजनार्थ माणसाला काय आवश्यक आहे? त्याने सामूहिक कार्याचा हिस्सा होणे व भाग घेणे हे आवश्यक आहे, जेणेकरून ज्या भावना इतरांना नवचैतन्य देतात, त्याच भावना त्याच्यातदेखील उद्भवतील. व्यक्तीला संघटित कार्यातील हिस्सेदार अथवा भागीदार बनविणे, जेणेकरून त्याला त्या कार्यातील यश हे आपले यश वाटेल व त्या कार्यातील अपयश हे आपले अपयश वाटेल, यानेच माणसे बांधली जातात व त्यांचा समाज बनवतात. जातीपद्धती ही सामूहिक कृतीला प्रतिबंध करते. आणि सामूहिक कृतीला प्रतिबंध केला गेल्यामुळे तिने हिंदूंना एकात्मीकृत जीवन व स्वजनांविषयीची जाणीव असलेला एक समाज होण्यास प्रतिबंध केला.

## ७.

एखाद्या टोळीच्या किंवा एखाद्या कंपूच्या पूर्ण अलगपणाबद्दल व ती टोळी किंवा कंपू निवडक लोकांपुरताच असल्याबद्दल हिंदू नेहमी तक्रार करीत असतात व त्यांची समाजविरोधी भावना असल्याबद्दल त्यांना दोष देत असतात. परंतु ही समाजविरोधी भावना हे त्यांच्या स्वत:च्या जातीपद्धतीचे सर्वात वाईट लक्षण आहे, हे ते सोयीस्करपणे विसरतात. गेल्या युद्धात जर्मन हे इंग्रजांच्या द्वेषाने भरलेले गाणे गात होते. तशीच एक जात दुसऱ्या जातीविरुद्ध द्वेषाने गाणे गाण्यात आनंद मानते. हिंदूंचे वाङ्मय हे जातीच्या वंशावळीने भरलेले आहे, त्यात एका जातीला श्रेष्ठ उत्पत्ती देण्याचा तर दुसऱ्या जातीला कलंकित उत्पत्ती देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. 'सह्याद्री खंड' हे या प्रकारच्या वाङ्मयाचे एक कुप्रसिद्ध उदाहरण आहे. ही समाजविरोधी भावना केवळ जातीपुरतीच मर्यादित राहिली नाही. ती अधिक खोलवर रुजली व तिने पोट-जातींच्या परस्परसंबंधांमध्ये देखील विष पेरले.

माझ्या प्रांतात गोलक ब्राह्मण, देखरुखे ब्राह्मण, कऱ्हाडे ब्राह्मण, पळशे ब्राह्मण व चित्पावन ब्राह्मण हे सर्व आपण ब्राह्मण जातीच्या उपशाखा असल्याचा दावा करतात. परंतु त्यांच्यामध्ये वसत असलेली समाजविरोधी भावना ही त्यांच्यामध्ये व ब्राह्मणेतर जातींमध्ये वसत असलेल्या समाजविरोधी भावनेसारखीच अगदी ठळक दिसून येणारी आणि अगदी विषारी आहे. यात विचित्र असे काही नाही. आपणास जे मिळाले आहे त्याचे रक्षण करणे, हा ज्याचा कायमचा उद्देश्य आहे असा एक गट जेव्हा इतर गटांशी असलेले त्याचे आंतरिक संबंध पूर्णपणे तोडून टाकतो, तेव्हा अशा गटाकडे 'त्याचे स्वत:चे हितसंबंध' असतात. जेथे जेथे असे हितसंबंध असतात तेथे तेथे समाजविरोधी भावना दिसून येते. ही समाजविरोधी भावना, ही आपापले हितसंबंध जपण्याची भावना ही राष्ट्रांमधील त्यांचा अलगपणा दर्शविणाऱ्या ठळक वैशिष्ट्यांप्रमाणे वेगवेगळ्या जातींची एकमेकांपासून अलगता दर्शविणारे ठळक वैशिष्ट्य आहे. ब्राह्मणाचा मुख्य संबंध ब्राह्मणेतरांच्या हितसंबंधाविरुद्ध 'स्वत:च्या हितसंबंधाचे' रक्षण करण्यात आहे आणि ब्राह्मणेतराचा मुख्य संबंध ब्राह्मणाच्या हितसंबंधाविरुद्ध स्वत:च्या हितसंबंधाचे रक्षण करण्यात आहे. त्यामुळे हिंदू केवळ जातींचे समूह नाहीत तर ते स्वत:पुरते व स्वत:च्या स्वार्थी ध्येयापुरते जगणारे अनेक युद्धखोर गट आहेत.

जातीव्यवस्थेचे आणखी एक वैशिष्ट्य असून ते शोचनीय आहे. सद्य:कालीन इंग्रजांचे पूर्वज रोझेल आणि क्रॉमवेलच्या युद्धामध्ये या किंवा त्या बाजूने लढले. परंतु जे एका बाजूने लढले त्यांच्या वंशजांत जे दुसऱ्या बाजूने लढले त्यांच्या वंशजांच्या विरोधी कसलीही अढी नाही, शत्रुत्वाची भावना नाही, कोणतीही कुरकूर नाही. वैर विसरण्यात आले आहे. परंतु समकालीन ब्राह्मणेतर हे समकालीन ब्राह्मणांना त्यांच्या

पूर्वजांनी शिवाजीला अपमानकारक वागणूक दिल्याबद्दल खमा करू शकत नाहीत. समकालीन कायस्थ सद्य:कालीन ब्राह्मणांना ब्राह्मणांच्या पूर्वजांनी कायस्थांच्या पूर्वजांची बदनामी केल्याबद्दल क्षमा करणार नाहीत. या भेदाचे नेमके कारण कोणते? उघडच, जातीपद्धती हे त्याचे नेमके कारण आहे. जातीचे अस्तित्व आणि जातीची जाणीव हिने सध्याच्या नव्या जातींमध्ये भूतकाळातील वैराची आठवण कायम ठेवण्याचे काम केले आहे व तिने एकसंधतेला अडथळा निर्माण केला आहे.

## ८.

वगळण्यात आलेल्या व अंशत: समाविष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रांविषयीच्या अलीकडच्या चर्चेने भारतातील आदिम जमाती म्हणून संबोधल्या जाणाऱ्या आदिवासी जमातींच्या स्थितीकडे लक्ष वेधण्याचे काम केले आहे. त्यांची संख्या फार नाही तरी सुमारे तेरा लाख आहे. नवीन राज्यघटनेतून त्यांना वगळण्यात आले आहे ते योग्य आहे की अयोग्य आहे हा प्रश्न अलाहिदा. पण वस्तुस्थिती तरीही उतरतेच की, हजारो वर्षांची जुनी संस्कृती असल्याची बढाई मारणाऱ्या देशामध्ये हे आदिवासी त्यांच्या प्राचीन असंस्कृत स्थितीतच राहिले आहेत. ते केवळ सुसंस्कृत नाहीत एवढेच नाही, तर त्यांच्यापैकी काहीजण ज्यामुळे त्यांची वर्गवारी गुन्हेगार म्हणून होते असे उद्योगधंदे करीत आहेत. संस्कृतीच्या मध्यभागी जगणारे तेरा लाख लोक अद्यापि रानटी अवस्थेत आहेत आणि पारंपरिक गुन्हेगारीचे जीवन कंठत आहेत. परंतु हिंदूंना त्याची कधीच लाज वाटली नाही. हे दृश्य माझ्या मते अगदीच अद्वितीय आहे. या लाजिरवाण्या स्थितीचे कारण काय? या आदिवासींना सुसंस्कृत करण्याचा आणि त्यांना चरितार्थासाठी अधिक सन्माननीय मार्गावर आणण्याचा कोणताही प्रयत्न का झाला नाही? आदिवासींच्या या रानटी अवस्थेसाठी त्यांना जन्मजात मतिमंदपणा बहाल करून हिंदू कदाचित तेच त्याचे कारण देऊ पाहतील. हिंदूंनी त्यांना सुसंस्कृत करण्याचा, त्यांना वैद्यकीय मदत देण्याचा, त्यांची सुधारणा करण्याचा, त्यांना चांगले नागरीक बनविण्याचा कोणताही प्रयत्न न केल्यामुळे आदिवासी हे रानटी राहिले, हे कदाचित ते मान्य करणार नाहीत. परंतु समजा ह्या आदिवासींसाठी ख्रिस्ती मिशनरी जे करीत आहेत ते करण्याची हिंदूंची इच्छा असती, तर ते तसे करू शकले असते काय? मी म्हणतो, नाही. आदिवासींना सुसंस्कृत करायचे याचा अर्थ त्यांच्यामध्ये राहून, मित्रत्वाची भावना जोपासून, सारांश त्यांच्यावर प्रेम करून त्यांना आपले स्वत:चे म्हणून त्यांचा अंगीकार करावयाचा, असा आहे. असे करणे हिंदूला कसे शक्य आहे? त्याचे संपूर्ण जीवन म्हणजे त्याची जात जपण्याचा एक महत्त्वाकांक्षी प्रयत्न आहे. जात ही त्याची मौल्यवान मालमत्ता आहे. तिचा त्याने काहीही करून बचाव हा केलाच पाहिजे. वैदिक काळातील आर्यांचे तिरस्करणीय अवशेष असलेल्या

आदिवासींबरोबर संबंध प्रस्थापित करून तो जात गमावण्यास तयार होऊ शकत नाही. नाश पावलेल्या माणुसकीसाठी हिंदूला कर्तव्याची भावना शिकवली जाऊ शकत नाही असे नाही, परंतु अडचण अशी आहे की, त्याच्या जातीची जपणूक करण्याच्या त्याच्या कर्तव्यावर मात करण्यास त्याला त्याची कोणतीही कर्तव्यभावना समर्थ करू शकत नाही. त्यामुळे हिंदूने न शरमता किंवा पश्चात्तापाची किंवा अनुतापाची कोणतीही भावना न वाटू देता त्याच्या संस्कृतीमध्ये रानटी माणसाला रानटीच राहू दिले. याचे खरे स्पष्टीकरण 'जात' हे आहे. हे आदिवासी जबरदस्त धोक्याचे मूळ आहे, हे हिंदूंनी ओळखलेले नाही. जर हे रानटी लोक रानटीच राहिले तर हिंदूंची त्यामुळे हानी होणार नाही; परंतु जर त्यांची बिगर हिंदूंनी सुधारणा घडवून आणली व त्यांचे त्यांच्या धर्मात धर्मांतर घडविले तर त्यामुळे हिंदूंच्या शत्रूंच्या सैन्यांमध्ये वाढ होईल. असे जर घडले तर हिंदूने स्वतःला व त्याच्या जातीपद्धतीला धन्यवाद दिले पाहिजेत.

## ९.

रानटी लोकांना सुसंस्कृत करणे, या मानवहिताच्या कार्यासाठी हिंदूंनी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. उलट उच्चजातीय हिंदूंनी हिंदू धर्माच्या परिघात असलेल्या खालच्या जातींना उच्च जातींच्या सांस्कृतिक पातळीपर्यंत वर येण्यास हेतूपुरस्सर अडथळा केला. मी याची दोन उदाहरणे देईन : एक सोनाराचे व दुसरे पाठारे प्रभूंचे. दोन्हीही महाराष्ट्रात अगदी सुप्रसिद्ध असलेले समाज आहेत. आपला दर्जा उंचावू पाहणाऱ्या बाकीच्या समाजांप्रमाणे हे दोन समाज एके काळी ब्राह्मणांच्या काही पद्धती आणि सवयी अंगीकारण्याचा प्रयत्न करीत होते. सोनार स्वतःला दैवज्ञ ब्राह्मण समजत व घडीची 'धोतरे' नेसत व वंदन करताना 'नमस्कार' हा शब्द वापरीत. ब्राह्मणांना ही नक्कल आणि सोनारांनी ब्राह्मण म्हणून जीवन जगण्याचा हा प्रयत्न आवडला नाही. पेशव्यांच्या आधिपत्याखाली ब्राह्मणांनी सोनारांकडून ब्राह्मणांच्या पद्धती अंगीकारल्या जाण्याचा हा प्रयत्न यशस्वीपणे हाणून पाडला. मुंबईत राहणाऱ्या सोनारांविरूद्ध मनाईहुकूम काढण्यासाठी ते ईस्ट इंडिया कंपनीच्या मुंबईतील जमाबंदी कौन्सिलच्या अध्यक्षालादेखील भेटले. एके काळी पाठारे प्रभूंमध्ये त्यांच्या जातीतील एक चालरीत म्हणून विधवा-पुनर्विवाह होता. ही विधवा-पुनर्विवाहाची चाल, विशेषतः ब्राह्मणांमध्ये प्रचलीत असलेल्या चालीरीतींच्या विरोधी असल्यामुळे पाठारे प्रभू जातीच्या काही लोकांनी नंतरच्या काळात तिच्याकडे सामाजिक मागासलेपणाचे लक्षण म्हणून पाहिले. काही पाठारे प्रभूंनी त्यांच्या समाजाचा दर्जा उंचावण्याच्या उद्देशाने त्यांच्या जातीत प्रचलीत असलेली विधवा-पुनर्विवाहाची ही चाल बंद करण्याचा यत्न केला. त्यामुळे तो समाज दोन छावण्यांमध्ये विभागला गेला. एक

नवीन सुधारणेच्या बाजूची तर दुसरी तिच्याविरुद्ध असलेली. पेशव्यांनी विधवा-पुनर्विवाहाच्या बाजूने असलेल्या लोकांची बाजू घेतली आणि अशा प्रकारे खरे तर पाठारे प्रभूंना ब्राह्मणांच्या पद्धती अनुसरण्यास प्रतिबंध केला गेला. मुसलमानांनी त्यांचा धर्म तलवारीच्या जोरावर पसरवला अशी हिंदू हे मुसलमानांवर टीका करतात. पाखंडीपणाबाबतच्या आरोपांची चौकशी करणारे ख्रिस्ती न्यायालय, या सबबीवर ते ख्रिस्ती लोकांची देखील टवाळी करतात. परंतु खरे सांगायचे तर, आपल्या आदरास कोण उत्तम व अधिक पात्र आहे? ज्यांनी धर्म स्वीकारण्यास राजी नसलेल्या व्यक्तींचे गळे दाबण्याचा प्रयत्न केला व असे करणे त्यांच्या मुक्तीसाठी आवश्यक आहे असे मानले ते मुसलमान व ख्रिस्ती, की जो प्रकाश पसरवणार नाही, जो दुसऱ्यांना अंधारात ठेवण्याचा प्रयत्न करील, जो त्यांचा बौद्धिक व सामाजिक वारसा आपल्या स्वतःच्या घडणीचा एक भाग बनविण्यास तयार असलेल्या व बनवू इच्छिणाऱ्या लोकांना त्या बौद्धिक व सामाजिक वारशात सहभागी होण्यास संमती देणार नाही तो हिंदू? मला सांगायला मुळीच संकोच वाटत नाही की, जर मुसलमान क्रूर मनोवृत्तीचे असतील तर हिंदू हे नीच मनोवृत्तीचे आहेत, आणि नीच मनोवृत्ती ही क्रूरतेपेक्षा अत्यंत वाईट गोष्ट आहे.

## १०.

हिंदू धर्म हा मिशनरी धर्म होता की नव्हता, हा एक वादाचा विषय आहे. तो कधीच मिशनरी धर्म नव्हता, असे काहींचे मत आहे, तर तो तसा होता असे इतरांचे मत आहे. हिंदू धर्म हा एके काळी मिशनरी धर्म होता, हे मान्य केलेच पाहिजे. तो मिशनरी धर्म नसता तर तो भारताच्या पृष्ठभूमीवर पसरू शकला नसता. पण तो आज मिशनरी धर्म नाही ही देखील एक वस्तुस्थिती असून ती स्वीकारलीच पाहिजे. त्यामुळे हिंदू धर्म हा मिशनरी धर्म आहे की नाही, हा प्रश्न नाही. खरा प्रश्न आहे हिंदू धर्माने हा मिशनरी धर्म असण्याचे का बंद केले? माझे उत्तर असे- हिंदूंमध्ये जातीपद्धती वाढली, त्यामुळे हिंदू धर्म हा मिशनरी धर्म असण्याचे बंद झाले. जात ही धर्मांतराच्या विसंगत आहे. धर्मांतरात समाविष्ट असलेल्या श्रद्धा व धर्मतत्त्वे मनावर बिंबवणे हाच केवळ मुद्दा नाही. समाजाच्या सामायिक जीवनामध्ये धर्मांतरिताला स्थान मिळणे, हा धर्मांतराच्या संदर्भात निर्माण होणारा दुसरा व अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. तो प्रश्न म्हणजे, धर्मांतरिताला कोठे ठेवायचे, कोणत्या जातीत ठेवायचे? परक्यांना आपल्या धर्मात धर्मांतरित करू इच्छिणाऱ्या प्रत्येक हिंदूला हमखास गोंधळात टाकणारा हा प्रश्न आहे. क्लबप्रमाणे जातीचे सदस्यत्व सर्वांसाठी व किरकोळ स्वरूपात खुले नाही. जातीचा नियम त्या जातीत जन्मलेल्या व्यक्तींच्या सदस्यत्वापुरताच मर्यादित आहे. जाती ह्या स्वायत्त आहेत व एखाद्या जातीला तिच्या सामाजिक जीवनामध्ये

नवागताला प्रवेश देण्यास भाग पाडणारा कोणताही अधिकार कोठेही नाही. हिंदू समाज हा जातींचा संग्रह असल्यामुळे व त्यांपैकी प्रत्येक जात ही बंदिस्त संघटित संस्था असल्यामुळे धर्मांतरिताला तेथे कसलेही स्थान नाही. अशा प्रकारे हिंदूंना विस्तारित होण्यास व इतर धर्माच्या समाजांना सामावून घेण्यास जातीने अडथळा निर्माण केला आहे. जोपर्यंत जातीव्यवस्था आहे तोपर्यंत हिंदू धर्म हा मिशनरी धर्म बनवता येणार नाही व शुद्धी हा मूर्खपणा व फोलपणा ठरेल.

## ११.

ज्या कारणांनी हिंदूंनी 'शुद्धी' अशक्य केली तीच कारणे 'संघटना' अशक्य करण्यामागे आहेत. हिंदूंना मुसलमानांपासून व शिखांपासून असे दुःखदपणे विभक्त करणारा व ज्यामुळे हिंदूला स्वतःचे रक्षण करण्यासाठी विश्वासघाताचे नीच मार्ग अंगीकारावे लागतात तो भित्रेपणा व भ्याडपणा हिंदूच्या मनातून काढून टाकणे, हा 'संघटना' मागील विचार होय. साहजिकच प्रश्न निर्माण होतो. शीख किंवा मुसलमान हा त्याला शूर व निर्भय बनवणारे सामर्थ्य कोठून प्राप्त करतो? मला खात्री आहे की ते सामर्थ्य शारीरिक शक्तीचा सापेक्ष वरचढपणा, आहार किंवा व्यायाम यामुळे प्राप्त होत नाही. एखादा शीख जेव्हा संकटात असेल तेव्हा सर्व शीख त्याची सुटका करण्यासाठी येतील व एखाद्या मुसलमानावर हल्ला करण्यात आला तर त्याला वाचवण्यासाठी सर्व मुसलमान धावून येतील, या भावनेतून निर्माण होणाऱ्या सामर्थ्यामुळे ते सामर्थ्य प्राप्त झालेले आहे. हिंदू असे सामर्थ्य प्राप्त करू शकत नाही. त्याचे सोबती त्याच्या मदतीला धावून येतील, याची त्याला खात्री वाटू शकत नाही. एकटा असल्यामुळे व एकाकी राहणेच त्याच्या नशिबी असल्यामुळे तो सामर्थ्यहीन राहतो, त्याच्या मनात भित्रेपणा व भ्याडपणा निर्माण होऊन तो लढ्यात शरण जातो किंवा दूर पळून जातो. शीख व मुस्लिम निर्भयपणाने उभे राहतात व लढा देतात. कारण त्याला माहीत असते की, तो एक असला तरी तो एकटा असणार नाही. हा विश्वास असल्यामुळे एकाला बळ मिळण्यास मदत होते तर त्याच्या अभावी दुसऱ्याला हार पत्करावी लागते. तुम्ही जर या बाबीचा आणखी पाठपुरावा केला आणि विचारले की, शीख व मुसलमान यांना इतकी खात्री पटवणारी कोणती गोष्ट आहे आणि मदत व साहाय्य या बाबतीत हिंदू इतका निराशेने का ग्रासलेला असतो, तर तुम्हाला असे दिसून येईल की, या भेदाची कारणे त्यांच्या संघटित जीवनपद्धतीतील भेदात आहेत. शीख व मुसलमान यांच्या संघटित जीवनपद्धतीतून सह-भावना उत्पन्न होते; हिंदूंच्या संघटित जीवनपद्धतीतून ती उत्पन्न होत नाही. शीख व मुसलमान यांच्यामध्ये एक सामाजिक दुवा आहे, तो त्यांना 'भाई भाई' बनवितो. हिंदूंमध्ये असा दुवा नाही व एक हिंदू दुसऱ्या हिंदूला 'भाई' मानीत नाही. एक शीख किंवा एक खालसा इतर

सव्वा लाख लोकांच्या समान आहे असे एखादा शीख का म्हणतो किंवा एखाद्या शिखाला असे का वाटते याचा यावरून उलगडा होतो. एक मुसलमान हा हिंदूंच्या एका जमावाचा समान का आहे याचा यावरून उलगडा होतो. हा फरक निःसंशयपणे जातीमुळे झालेला फरक आहे. जोपर्यंत जात राहील तोपर्यंत कसलेही 'संघटन' होणार नाही आणि जोपर्यंत 'संघटन' होणार नाही तोपर्यंत हिंदू हा दुर्बल व बुजरा राहील. हिंदू हे आपण फार सहिष्णू लोक असल्याचे सांगतात. माझ्या मते ही चूक आहे. अनेक प्रसंगी ते असहिष्णू असू शकतात आणि जरी काही प्रसंगी ते सहिष्णू वागले तरी त्याचे कारण ते विरोध करण्यास अगदीच उदासीन असतात हेच आहे. ही हिंदूंची उदासीनता त्यांच्या स्वभावाचा इतका अविभाज्य भाग बनलेली आहे की, हिंदू एखादा अपमान तसेच अन्याय अगदी निमूटपणे सहन करील. मोरिस यांचे शब्द वापरायचे तर त्यांच्यामध्ये तुम्हाला दिसून येईल, 'मोठे लहानांना तुडवत आहेत, सबल दुर्बलांचे दमन करीत आहेत. क्रूर लोक भीत नाहीत, दयाळू लोक धाडस करीत नाहीत व सुज्ञ माणसे फिकीर करीत नाहीत.' सर्व हिंदू देव क्षमावान असल्यामुळे हिंदूंमधील ज्यांच्यावर अन्याय झाला आहे व जे दडपले गेले आहेत अशांच्या दयनीय स्थितीची कल्पना करणे कठीण नाही. उदासीनता हा एखाद्या समाजाला संसर्गदूषित करू शकणारा सर्वात मोठा रोग आहे. हिंदू असे उदासीन का आहेत? माझ्या मते, ही उदासीनता जातीव्यवस्थेचा परिणाम आहे आणि सद्हेतूसाठी देखील जातीव्यवस्थेने 'संघटन' व सहकार्य अशक्य करून टाकले आहे.

## १२.

गटाचे आदर्श, गटाचे अधिकार आणि गटाचे हितसंबंध यांच्या विरोधात जाऊन एखाद्या व्यक्तीने स्वतःची मते व श्रद्धा, स्वातंत्र्य व हितसंबंध त्यांचे त्यापेक्षा अधिक हक्क प्रतिपादन करणे, ही सर्व सुधारणेची सुरुवात आहे. परंतु ही सुधारणा तशीच चालू राहील की नाही ही गोष्ट तो गट अशा व्यक्तीच्या हक्कप्रतिपादनाला किती वाव देतो यावर अवलंबून आहे जर गट अशा व्यक्तीशी व्यवहार करताना सहिष्णू वृत्तीचा व स्वच्छ मनाचा असेल तर ते हक्कप्रतिपादन चालू ठेवतील व अखेर त्यांच्या सोबत्याचे मतपरिवर्तन करण्यात यशस्वी होतील. उलटपक्षी, गट जर असहिष्णू असेल आणि अशा व्यक्तींना दाबून टाकण्यासाठी तो अंगीकारत असलेल्या साधनाविषयी फिकीर करीत नसेल तर त्यांचा नाश होईल आणि सुधारणा नष्ट केली जाईल. जेव्हा एखाद्या जातीला त्या जातीचे नियम मोडल्याबद्दल दोषी असलेल्या कोणत्याही माणसावर बहिष्कार टाकण्याचा निर्विवाद हक्क असेल आणि बहिष्कारामध्ये सामाजिक अभिसरणाचा पूर्ण लोप अंतर्भूत आहे हे जेव्हा ओळखले जाईल तेव्हा शिक्षेचा एक प्रकार म्हणून बहिष्कार व मृत्यू यांमध्ये निवड करण्याजोगे

खरोखरच फारसे नसेल, ही गोष्ट मान्य करावीच लागेल. जातीची बंधने तोडून आपले स्वातंत्र्य ठामपणे मांडण्याचे व्यक्तिशः धैर्य हिंदूंना नव्हते, यात आश्चर्य नाही. माणूस आपल्या सोबत्यांमध्ये प्रगती करू शकत नाही हे खरे आहे, परंतु त्याचे त्यांच्याशिवाय चालू शकणार नाही हे देखील खरे आहे. त्याला स्वतःच्या शर्तीवर त्यांच्या सोबत्यांचा समाज असणे आवडेल. त्याला जर तो त्याच्या शर्तीवर मिळू शकला नाही तर तो कोणत्याही शर्तीवर, पूर्ण शरणागती पत्करूनदेखील, तो समाज स्वीकारण्यास तयार होईल. याचे कारण, त्याचे समाजाशिवाय चालू शकत नाही. जात ही माणसाच्या असहायतेचा फायदा घेण्यासाठी आणि शब्दशः व आशयतः पूर्णपणे तिच्या संहितेच्या बरहुकूम राहण्याचा आग्रह धरण्यासाठी नेहमीच सिद्ध असते. सुधारकाच्या जीवनाचा नरक बनविण्याच्या कटकारस्थानात ती स्वतःला सहजपणे संघटित करू शकते, आणि जर कट करणे हा गुन्हा आहे तर जातीच्या नियमांविरुद्ध कृती करण्याचे धाडस करणाऱ्या व्यक्तीला बहिष्कृत करण्याचा प्रयत्न म्हणून, अशा नीच कृतीला कायद्याने दंडनीय असा गुन्हा का करण्यात येऊ नये, हेच मला समजत नाही. परंतु खरोखर कायदादेखील प्रत्येक जातीला तिच्या सदस्यत्वाचे नियमन करण्याची आणि मतभेद असणाऱ्यांना बहिष्काराद्वारे शिक्षा करण्याची स्वायत्तता देतो. सुधारकांचा छळ करण्यासाठी आणि सर्व सुधारणा नष्ट करण्यासाठी जात हे सनातन्यांच्या हातातील एक सामर्थ्यशाली हत्यार आहे.

## १३.

हिंदूच्या नीतीवरील जातीचा परिणाम हा निव्वळ शोचनीय आहे. जातीने लोकभावना नष्ट करून टाकली आहे. जातीने सार्वजनिक हितबुद्धीची भावना नष्ट करून टाकली आहे. जातीने लोकमत अशक्य करून टाकले आहे. एखाद्या हिंदूची जात हीच त्याची आम जनता आहे. त्याची जबाबदारी ही केवळ त्याच्या जातीपुरती आहे. त्याची निष्ठा ही केवळ त्याच्या जातीपुरती मर्यादित आहे. सद्‌गुण हा जातीने वेढलेला आणि नीती ही जातीनिबद्ध आहे. तेथे पात्र असणारांसाठी कसलीही सहानुभूती नाही. तेथे गुणांची चाह नाही. तेथे गरजूंसाठी अनुकंपा नाही. त्यामुळे दुःखाला कसलाही प्रतिसाद मिळत नाही. तेथे अनुकंपा आहे, परंतु ती जातीत सुरू होते व जातीतच संपते. तेथे सहानुभूती आहे, पण ती इतर जातींच्या लोकांसाठी नाही. हिंदू एखाद्या महापुरुषाचे व सत्पुरुषाचे नेतृत्व मान्य करील काय व त्यास अनुसरील काय? महात्म्यांचा अपवाद करता त्याचे उत्तर हेच असले पाहिजे की, नेता जर त्याच्या जातीचा माणूस असेल तरच तो त्याचे अनुसरण करील. एखादा ब्राह्मण जर तो नेता ब्राह्मण असेल, एखादा कायस्थ जर तो नेता कायस्थ असेल तरच त्याचे अनुकरण करील, इत्यादी. आपल्या जातीबाहेरच्या माणसाचे गुण मान्य करण्याची ताकद

हिंदूंमध्ये नाही. तेथे गुणांची चाह आहे, परंतु तो माणूस त्याच्या जातीचा माणूस असला तरच. हिंदूंची संपूर्ण नीती ही टोळीच्या नीतीसारखीच वाईट आहे. सद्गुणांच्या बाजूने उभे राहणे व दुर्गुणांच्या बाजूने उभे न राहणे अशी ही बाब नाही. ही बाब जातीच्या बाजूने उभे राहणे वा न उभे राहणे, अशी आहे. हिंदूंनी आपल्या जातीच्या हितसंबंधाला महत्त्व देऊन देशद्रोह केलेला नाही काय?

## १४.

तुमच्यापैकी काहीजणांना जातीने उत्पन्न केलेल्या दुःखद परिणामांची ही रटाळ कहाणी ऐकण्याचा कंटाळा आला असल्यास मला त्याचे आश्चर्य वाटणार नाही. त्यात नवीन असे काही नाही. त्यामुळे मी या प्रश्नाच्या विधायक बाजूकडे वळतो. तुम्हाला जर जात नको असेल तर मग तुमचा आदर्श समाज कोणता, हा प्रश्न तुम्हाला विचारला जाणे स्वाभाविक आहे. तुम्ही जर तो मला विचारला तर स्वातंत्र्य, समता व बंधुतेवर आधारलेला समाज माझा आदर्श समाज असेल. आणि का नसावा? बंधुतेला कोणता आक्षेप घेतला जाऊ शकतो? एखादा आक्षेप येऊ शकेल असे मला वाटत नाही. आदर्श समाज हा गतिमान असला पाहिजे, एके ठिकाणी घडणारा बदल दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठी त्यात पुष्कळ मार्ग असावेत. आदर्श समाजात जाणीवपूर्वक आदानप्रदान केलेले व सहभाग घेतले गेलेले अनेक हितसंबंध असावेत. इतर संघटनप्रकारांशी संबंध ठेवण्यासाी अनेक आणि तेही मुक्त दुवे असावेत. दुसऱ्या शब्दांत, तेथे सामाजिक अभिसरण असलेच पाहिजे. हीच बंधुता होय. ते केवळ लोकाहीचे दुसरे नाव आहे. लोकशाही हा केवळ शासनाचा प्रकार नाही. तो प्रथमतः आदानप्रदान केलेल्या सहअनुभवांचा, सहजीवनाचा प्रकार आहे. ती मूलतः सहकाऱ्यांबाबतची आदराची व सन्मानाची मनोवृत्ती आहे. स्वातंत्र्याबद्दल काही आक्षेप आहेत काय? मुक्त हालचाल करण्याचा हक्क या अर्थाने, सहीसलामत जगण्याचा हक्क या अर्थाने, फारच थोडे लोक स्वातंत्र्यावर आक्षेप घेतात. जिवंत असणाराला आपले शरीर निकोप ठेवण्यासाठी व अर्थार्जनासाठी हत्यारे व साहित्य यांची आवश्यकता असल्याने, संपत्तीचा हक्क या अर्थाने स्वातंत्र्यावर कोणताही आक्षेप नाही. व्यक्तीच्या हक्कांच्या प्रभावी व सक्षम वापराद्वारे व्यक्तीला लाभ मिळण्यासाठी स्वातंत्र्याला वाव का असू नये?

सहीसलामत जगण्याचा व संपत्तीचा हक्क या अर्थाने स्वातंत्र्याला मुभा देणारे जातीचे समर्थक हे जिथपर्यंत स्वातंत्र्यात एखाद्याचा व्यवसाय निवडण्याचा अंतर्भाव होतो तिथपर्यंत स्वातंत्र्याला संमती देण्यास सहजासहजी तयार होणार नाहीत. परंतु अशा प्रकारच्या स्वातंत्र्यावर आक्षेप घेणे म्हणजे गुलामगिरी चिरस्थायी करणे होय. कारण केवळ पराधीनतेचे कायद्याने योग्य ठरवलेले रूप असा गुलामगिरीचा अर्थ

नाही. तिचा अर्थ, ज्या सामाजिक स्थितीत काही माणसांना त्यांच्या वर्तणुकीचे नियंत्रण करणारी प्रयोजने दुसऱ्यांपासून स्वीकारण्यास भाग पाडले जाते, अशी समाजाची स्थिती होय. ही स्थिती जिथे कायद्याच्या दृष्टीने गुलामगिरी नाही तेथे देखील प्रचारात आहे. जातीपद्धतीत आढळून येते त्याप्रमाणे, जिथे काही व्यक्तींना त्यांच्या निवडीचे नसलेले असे ठराविक उद्योगधंदे चालवण्यास भाग पाडले जाते तिथे ही स्थिती आढळून येते. समतेला एखादा आक्षेप आहे काय? हा उघडच फ्रेंच क्रांतीच्या घोषणेवरील अत्यंत विवाद्य मुद्दा आहे. समतेवरील आक्षेप विश्वसनीयही असू शकतील आणि सर्व माणसे समान नाहीत, हे कोणीही मान्य करील. पण म्हणून काय झाले? समता ही एक कल्पित गोष्ट असली तरी ती नियामक तत्त्व म्हणून स्वीकारलीच पाहिजे. माणसाची शक्ती - १) शारीरिक वंश, २) सामाजिक वारसा अथवा आईवडिलांनी घेतलेली काळजी, शिक्षण, शास्त्रीय ज्ञानाचा संचय, रानटी माणसापेक्षा त्याला अधिक कार्यक्षम बनविणारी प्रत्येक गोष्ट या स्वरूपातील नैसर्गिक देणगी आणि अखेरीस, ३) त्याचे स्वतःचे प्रयत्न यांवर अवलंबून असते. या तिन्ही बाबतीत माणसे निर्विवादपणे असमान आहेत. परंतु प्रश्न असा आहे की असमान असल्यामुळे आपण त्यांना असमान वागणूक देणार काय? या प्रश्नाचे समतेच्या विरोधकांनी उत्तर दिलेच पाहिजे. व्यक्तिवाद्यांच्या दृष्टिकोणातून माणसांचे प्रयत्न ज्याअर्थी असमान आहेत त्याअर्थी त्यांना असमानतेने वागवणे न्याय्य असेल. प्रत्येकाच्या शक्तींचा पूर्ण विकास करण्यासाठी शक्य होईल तितके प्रोत्साहन देणे इष्ट असेल. परंतु पहिल्या दोन बाबतीत माणसे असमान आहेत म्हणून त्यांना असमानतेने वागवले तर काय होईल? हे उघड आहे की, ज्या व्यक्तींच्या बाजूने जन्म, शिक्षण, कुटुंबाचे नाव (घराणे), व्यापारसंबंध आणि वारशाने आलेली संपत्ती या गोष्टीदेखील असतील त्यांची या शर्यतीत निवड केली जाईल. परंतु अशा परिस्थितीत केलेली निवड ही समर्थ असलेल्यांची निवड असेलच असे नाही, ती विशेष अधिकार मिळालेल्यांची निवड असेल. त्यामुळे जी रास्त वागणूक तिसऱ्या बाबतीत प्रयत्नांच्या संदर्भात आपण माणसांना असमान वागणूक तिसऱ्या बाबतीत प्रयत्नांच्या संदर्भात आपण माणसांना असमान वागणूक द्यावी असे मानण्यास भाग पाडते तीच पहिल्या दोन बाबतीत आपण माणसांना यथाशक्य समानतेची वागणूक द्यावी या गोष्टीची मागणी करते. उलटपक्षी असे प्रतिपादन करता येऊ शकेल की, समाजसंस्थेसाठी समाजाच्या सदस्यांपैकी बहुसंख्य सदस्य मिळविणे हे जर इष्ट असेल, तर त्या समाजसंस्थेला अगदी शर्यतीच्या प्रारंभापासूनच त्यांना यथाशक्य समान बनवून त्यांच्यामधून बहुसंख्य सदस्य मिळवता येऊ शकतील. आपण समतेपासून का सुटका करून घेऊ शकत नाही, त्याचे हे एक कारण आहे. परंतु आपण समता का स्वीकारली पाहिजे, त्याचे आणखी एक कारण आहे. एखाद्या राज्यकर्त्याचा संबंध प्रचंड संख्येने असलेल्या जनतेशी येतो. बारीकसारीक भेद काढण्यास व प्रत्येकाला समन्यायाने म्हणजे गरजेनुसार

किंवा क्षमतेनुसार वागवण्यास वेळही नसतो किंवा त्याचे ज्ञानही नसते. माणसांना दिलेली समन्याय वागणूक ही कितीही इष्ट अथवा वाजवी असो, मानवतेचे श्रेणीकरण व वर्गीकरण करण्यास ती समर्थ असणार नाही. त्यामुळे राज्यकर्त्याने काहीसा स्थूल व तयार नियम अनुसरलाच पाहिजे. आणि तो स्थूल व तयार नियम म्हणजे, सर्व लोक सारखे आहेत म्हणून नव्हे तर वर्गीकरण व श्रेणीकरण अशक्य असल्यामुळे सर्व लोकांना सारखीच वागणूक देणे हा होय. समतेचे तत्त्व हे स्पष्टपणे भ्रममूलक आहे. परंतु सर्व गोष्टी जमेस धरता एखाद्या राज्यकर्त्यास राजकारणात पुढे जाता येण्यासाठी तोच एकमेव मार्ग आहे, ती कठोर व्यावहारिक व्यवस्था आहे व तिच्यासाठी कठोर व्यावहारिक कसोटीची गरज आहे.

## १५.

परंतु ज्यांचे ध्येय वेगळे आहे, असा एक सुधारकगण आहे. त्यांना आर्य समाजवादी या नावाने ओळखले जाते आणि त्यांचा समाजसंघटनेचा आदर्श भारतात असलेल्या चार हजार जातींऐवजी ज्याला चातुर्वर्ण्य म्हणून संबोधण्यात येते त्यात अथवा चार वर्गांमधील समाजाच्या विभागणीत आहे. ती विभागणी अधिक आकर्षक बनविण्यासाठी आणि विरोधकांना नामोहरम करण्यासाठी चातुर्वर्ण्याचे पुरस्कर्ते त्यांचे चातुर्वर्ण्य हे जन्मावर आधरलेले नसून ते गुणावर (कर्तृत्वावर) आधारलेले आहे, हे दर्शविण्याची मोठी काळजी घेतात. तथापि प्रारंभीच मला हे कबूल केले पाहिजे की, गुण हा चातुर्वर्ण्याचा आधार असला तरी मी ज्याच्याशी स्वतःला जुळवून घेऊ शकत नाही, असा तो एक आदर्श आहे. पहिली गोष्ट, आर्य समाजिष्टांच्या चातुर्वर्ण्याखाली जर एखाद्या व्यक्तीला हिंदू समाजात त्याच्या गुणानुसार स्थान मिळत असेल तर आर्य समाजिष्ट हे लोकांना ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशाच वर्गांमध्ये घालण्याचा आग्रह का धरतात, हे मला समजत नाही. एखाद्या विद्वान माणसाला ब्राह्मण या वर्गामध्ये न घालता सन्मान देता आला असता. एखाद्या सैनिकाला क्षत्रिय हे नाव ने देता आदर देता आला असता. जर युरोपियन समाज त्याच्या सैनिकांना व त्याच्या सेवकांना कायमची लेबले न देता सन्मान देऊ शकतो तर हिंदू समाजाला तसे करणे अवघड का जावे, हा एक प्रश्न आहे. आर्य समाजिष्टांनी त्याचा विचार करण्याची फिकीर केलेली नाही. ही लेबले चालू ठेवण्यावर दुसरा एक आक्षेप आहे. माणसे व वस्तू यांच्याबाबतच्या लोकांच्या कल्पना, भावना व मनोवृत्ती यांच्यामध्ये बदल घडून येणे, यात सर्व सुधारणांचा अंतर्भाव होतो. माणसे व वस्तू यांच्या बाबतची व्यक्तींची मनोवृत्ती ठरविणाऱ्या विशिष्ट कल्पना व भावना यांच्याशी काही नावे जोडली जातात, हा नेहमीचा अनुभव आहे. ब्राह्मण, क्षत्रिय व शूद्र ही नावे प्रत्येक हिंदूच्या मनातील स्पष्ट व ठराविक कल्पनांशी जोडली गेलेली आहेत. ती

कल्पना जन्मावर आधारलेल्या वंशपरंपरेची आहे. ही नावे जोपर्यंत चालू राहतील तोपर्यंत हिंदू हे जन्मावर आधारलेली उच्च व नीच वंशपरंपरागत विभागणी म्हणून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असा विचार करण्याचे चालू ठेवतील व त्यानुसार वर्तन करतील. हे सर्व विसरण्यास हिंदूला तयार केले पाहिजे. परंतु जर जुनी लेबले टिकून राहिली आणि त्याच्या मनाला जुन्या कल्पनांची आठवण करून देत राहिली तर हे कसे काय घडू शकेल? जर लोकांच्या मनात नवीन कल्पना रुजवायच्या असतील तर त्यांना नवीन नाव देण्याची गरज आहे. जुनी नावे चालू ठेवणे म्हणजे सुधारणा निष्फळ करणे होय. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या घाणेरड्या लेबलांनी दर्शविण्यात येणाऱ्या जन्मावर आधारलेल्या सामाजिक विभाजनांचे निदर्शक असलेल्या ह्या चातुर्वर्ण्याला गुणांवर आधारलेले आहे असे मानणे हे एक भ्रामक जाळे आहे.

१६.

माझ्या मते, जुन्या नामभिधानासह असलेले हे चार्तुवर्ण्य, हे अत्यंत तिटकारा उत्पन्न करणारे आहे. संपूर्ण व्यक्तिमत्व त्याच्याविरुद्ध बंड करून उठते. परंतु चातुर्वर्ण्यावर असलेला माझा आक्षेप केवळ भावनात्मक पायावर आधारलेला ठेवण्याची माझी इच्छा नाही. त्याला विरोध करण्यासाठी मी ज्यावर विसंबून राहावे अशी त्याहूनही अनेक भक्कम कारणे आहेत. या आदर्शाची बारीक तपासणी केल्यावर माझी अशी खात्री पटली आहे की, समाजरचनेची एक पद्धती म्हणून चातुर्वर्ण्य हे अव्यवहार्य व हानिकारक आहे आणि ते शोचनीयरीत्या अपयशी ठरलेले आहे. व्यवहार्यतेच्या दृष्टिकोणातून पाहता, चातुर्वर्ण्य पद्धती कित्येक अडचणी निर्माण करते. त्या अडचणी चातुर्वर्ण्याच्या समर्थकांनी विचारात घेतल्याचे दिसून येत नाही. जातीच्या मुळाशी असलेले तत्त्व हे वर्णाच्या मुळाशी असलेल्या तत्त्वापेक्षा मूलत: भिन्न आहे. ती तत्त्वे मूळाची केवळ भिन्नच नाहीत तर ती मुळातच परस्परविरोधीदेखील आहेत. आधीचे जातीच्या मुळाशी असलेले तत्त्व हे गुणांवर आधारलेले आहे. ज्यांना त्यांच्या गुणांचा संबंध न येता जन्माधिष्ठित उच्च दर्जा प्राप्त झालेला आहे त्या लोकांना तो दर्जा सोडून देण्यास तुम्ही कसे काय भाग पडणार? ज्याला जन्माधिष्ठित खालचा दर्जा प्राप्त झालेला आहे, त्या माणसाला त्याच्या गुणांनुसार योग्य असलेल्या दर्जाला मान्यता देण्यासाठी तुम्ही लोकांना कसे काय भाग पाडणार? यासाठी प्रथम वर्णपद्धती प्रस्थापित करण्यास समर्थ होण्यासाठी तुम्ही जातीपद्धती मोडली पाहिजे. जन्मावर आधारलेल्या चार हजार जाती तुम्ही गुणांवर आधारलेल्या चार वर्णामध्ये कशा काय रूपांतरित करणार? चातुर्वर्ण्याच्या समर्थकांनी जिच्याशी सामना केलाच पाहिजे अशी ही पहिली अडचण आहे.

चातुर्वर्ण्याच्या समर्थकांना जर चातुर्वर्ण्याची स्थापना यशस्वीपणे करावयाची

इच्छा असेल तर त्यांना जिच्याशी सामना केलाच पाहिजे अशी एक दुसरी अडचण आहे.

तुम्ही लोकांचे चार स्पष्ट वर्गांमध्ये वर्गीकरण करू शकता, असे चातुर्वर्ण्यात गृहीत धरलेले आहे. याबाबतीत आपणास दिसून येईल की, चातुर्वर्ण्याच्या आदर्शाचा प्लेटोच्या आदर्शाशी जवळचा संबंध आहे. प्लेटोच्या मते, लोक निसर्गतःच तीन वर्गांमध्ये मोडतात. त्याचा असा विश्वास होता की काही व्यक्तींमध्ये केवळ वासनांचे वर्चस्व असते. त्याने त्यांना कामगार व व्यापारी वर्ग असे नाव दिले. शिवाय ज्यांचा स्वभाव धाडसी आहे असे लोक वासनांच्या पलीकडे असल्याचे दिसून आले. त्यांने त्यांची वर्गवारी युद्धातील संरक्षक व देशांतर्गत शांततेचे रक्षक म्हणून केली. बाकीच्यांनी वस्तूच्या तळाशी असलेले सर्वव्यापी तत्त्व जाणून घेण्याची क्षमता दर्शविली. म्हणून त्याने त्यांना जनतेचे विधिदाते बनविले. प्लेटोचे रिपब्लिक हे ज्या टीकेच्या अधीन आहे ती टीका, माणसांचे चार स्वतंत्र वर्गांमध्ये अचूक वर्गीकरण करण्याची शक्यता वर्तवणाऱ्या चातुर्वर्ण्य पद्धतीला देखील लागू केली पाहिजे अशी टीका आहे. प्लेटोच्या विरुद्ध मुख्य टीका अशी आहे की, काही थोड्या सूक्ष्मपणे आखलेल्या वर्गांमध्ये व्यक्तींचे ढीग लावून ठेवण्याची त्याची कल्पना, हा माणसांसंबंधीचा, त्यांच्या सामर्थ्यासंबंधीचा अत्यंत उथळ दृष्टिकोण आहे. प्रत्येक व्यक्तीच्या अनन्यतेची व इतरांच्या तुलनेत असलेल्या व्यक्तीच्या अपुरेपणाची, स्वतःचाच एक वर्ग बनविणाऱ्या व्यक्तीची प्लेटोला कल्पना नव्हती. त्याला कार्यक्षम मनोवृत्तींच्या अमर्याद विविधतेची आणि ज्याद्वारे एखादी व्यक्ती समर्थ असते त्या मनोवृत्तींच्या संयोगाची ओळख नव्हती. त्याच्या मते, व्यक्तीच्या मूळ स्वभावातच नैसर्गिक कार्यक्षमतेचे अथवा कुवतीचे प्रकार असतात. हे सर्व उघड उघड चुकीचे आहे. आधुनिक विज्ञानाने हे दाखवून दिले आहे की, काही थोड्या सूक्ष्मपणे आखलेल्या वर्गांमध्ये व्यक्तींचे ढीग करणे, हा माणसाविषयीचा उथळ दृष्टीकोण आहे तो गंभीरपणे विचारात न घेण्याजोगा आहे. अखेरीस व्यक्तींचे गुण हे इतके विविध आहेत की, त्यामुळे वर्गांमध्ये व्यक्तींचे स्थर बनविण्यासाठी व्यक्तींच्या गुणांचा वापर हा असंगत ठरेल. ज्या कारणाने प्लेटोचे रिपब्लिक अयशस्वी ठरले अगदी त्याच कारणामुळे चातुर्वर्ण्य अयशस्वी ठरलेच पाहिजे. ते कारण म्हणजे, माणूस या किंवा त्या वर्गाचा आहे म्हणून त्या त्या वर्गानुसार माणसांना कबुतरांच्या खुराड्यातील खणात ठेवणे शक्य नाही. मूळच्या चार वर्गांच्या चार हजार जाती बनल्या आहेत, या वस्तुस्थितीवरून लोकांचे चार निश्चित वर्गांमध्ये अचूकपणे वर्गीकरण करणे अशक्य आहे, हेच सिद्ध झाले आहे.

चातुर्वर्ण्य पद्धती प्रस्थापित करण्याच्या बाबतीत तिसरी एक अडचण येते. चातुर्वर्ण्य पद्धती प्रस्थापित झाली होती अशी कल्पना करून तुम्ही ती कशी काय प्रचलित ठेवणार? चातुर्वर्ण्याच्या यशस्वी प्रचालनासाठी एक महत्त्वाची गरज म्हणजे, त्यास आपल्या मान्यतेद्वारे प्रचलित ठेवू शकेल, अशा कायद्याची पद्धती होय. हिचे

उल्लंघन करणाऱ्यांच्या समस्येला, चार्तुर्ण्य पद्धतीला सातत्याने तोंड द्यावे लागेल. वर्ग उल्लंघनाच्या कृतीला शिक्षा ठेवल्याशिवाय माणसे आपापल्या संबंधित वर्गामध्ये राहणार नाहीत. अन्यथा मानवी प्रकृतीच्या विरुद्ध असल्यामुळे संपूर्ण व्यवस्थाच कोलमडून पडेल. चातुर्वर्ण्य त्याच्या अंगभूत चांगुलपणाने अस्तित्वात राहू शकत नाही. ते कायद्यानेच अंमलात आणावे लागेल. कायद्याची मान्यता असल्याशिवाय चातुर्वर्ण्याचा आदर्श कृतीत आणता येऊ शकत नाही. ही गोष्ट रामाने शंबूकाला ठार केले, या रामायणातील कथेवरून सिद्ध झाली आहे. रामाने यदृच्छया व अकारण शंबूकाला ठार केले म्हणून काही लोक रामाला दोष देताना दिसतात. परंतु शंबूकाला ठार केले म्हणून रामाला दोष देणे म्हणजे संपूर्ण परिस्थितीविषयी गैरसमज करून घेणे होय. रामराज्य हे चातुर्वर्ण्यावर आधारलेले राज्य होते. राजा या नात्याने चातुर्वर्ण्य टिकवून ठेवण्यास राम बांधील होता. त्यामुळे शंबूकासारख्या शूद्राने त्याच्या वर्गाचे उल्लंघन करून ब्राह्मण बनण्याचा प्रयत्न केल्यामुळे शंबूकाला ठार करणे हे त्याचे कर्तव्य होते. रामाने शंबूकाला का ठार केले, त्याचे हे कारण आहे. परंतु यावरून हे देखील दर्शविले जाते की, चातुर्वर्ण्याच्या रक्षणासाठी कायद्याच्या मान्यतेची जरूर आहे. केवळ कायद्याच्या मान्यतेचीच जरुर आहे असे नाही तर, मृत्युदंडदेखील आवश्यक आहे. म्हणून तर रामाने शंबूकाला लहानसहान शिक्षा दिली नाही. म्हणून तर मनुस्मृतीने वेदपठण केल्याबद्दल किंवा वेद ऐकल्याबद्दल शूद्रांची जीभ कापून टाकावी किंवा शूद्रांच्या कानांत शिश्याचा वितळवलेला तप्त रस ओतावा यांसारख्या मोठ्या शिक्षा सांगितल्या आहेत.

चातुर्वर्ण्याच्या समर्थकांनी, ते यशस्वीपणे माणसांचे वर्गीकरण करू शकतील व मनुस्मृतीच्या कायद्याची आज्ञा पुन्हा लागू करण्यासाठी या विसाव्या शतकात आधुनिक समाजाला प्रवृत्त करू शकतील, याची खात्री दिली पाहिजे.

चातुर्वर्ण्याच्या समर्थकांनी, त्यांच्या पद्धतीमध्ये स्त्रियांचे काय होणार याचा विचार केलेला दिसत नाही. त्यांची देखील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्गांमध्ये विभागणी होणार की त्यांना त्यांच्या पतींचा दर्जा धेण्यास मुभा दिली जाणार? विवाहाचा परिणाम म्हणून जर स्त्रीला तिचा दर्जा मिळणार असेल तर चातुर्वर्ण्याच्या मागील तत्त्वाचे म्हणजे व्यक्तीचा दर्जा त्या व्यक्तीच्या गुणांवर आधारलेला असला पाहिजे, या तत्त्वाचे काय होणार? जर त्यांच्या गुणांनसार त्यांचे वर्गीकरण होणार असेल तर ते वर्गीकरण नाममात्र असेल की खरे असेल? ते जर नाभमात्र असेल तर ते निरर्थक ठरेल व मग चातुर्वर्ण्याच्या समर्थकांना त्यांची पद्धती स्त्रियांना लागू नाही, हे मान्य करावेच लागेल. हे जर खरे असेल तर ते स्त्रियांना लागू केल्याचे तर्कसंगत परिणाम अनुसरण्याची चातुर्वर्ण्याच्या समर्थकांची तयारी आहे काय? त्यांना स्त्री पुरोहित व स्त्री सैनिक स्वीकारण्यास तयार व्हावे लागेल. स्त्री शिक्षिका व स्त्री बॅरिस्टर यांचा हिंदू समाजाला आता सराव झालेला आहेच, त्याला आता दारुभट्टीवाली व खाटीक

अशा स्त्रियांचा देखील सराव होऊन जाईल. परंतु तो स्त्री पुरोहित व स्त्री सैनिक मान्य करील असे म्हणणारी व्यक्ती ही धाडसी असली पाहिजे. पण स्त्रियांना चातुर्वर्ण्य लागू करण्यातून तीच तर्कसंगत निष्पत्ती असेल. त्यांना अडाणी ठेवून, मला वाटते एखाद्या जन्मजात मूर्खाशिवाय दुसरा कोणीही चातुर्वर्ण्याच्या यशस्वी पुनरुज्जीवनाची आशा करणार नाही किंवा त्यावर विश्वास ठेवणार नाही.

## १७.

चातुर्वर्ण्य व्यवहार्य आहे असे गृहीत धरून मी असे म्हणतो की, ती अत्यंत दुष्ट पद्धती आहे. ब्राह्मणांनी ज्ञान संपादन करावे, क्षत्रियांनी शस्त्रे धारण करावी, वैश्यांनी व्यापार करावा व शूद्रांनी सेवा करावी ही कामांची विभागणी पाहता, जणू काही ती श्रमविभाजनाची पद्धती होती असे वाटते. या सिद्धांताचा उद्देश शूद्राला इतर कामांची गरज नाही हे सांगण्याचा होता की, त्याच्याकडे इतर कामे असताच कामा नये हे मांडण्याचा होता, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. चातुर्वर्ण्याचे समर्थक त्याला पहिला अर्थ देतात. ते म्हणतात की, तीन वर्ण शूद्राला आधार द्यायला असल्यावर शूद्राने धन संपादन करण्याचा खटाटोप का करावा? ब्राह्मण शिक्षण घेत असताना शिक्षण घेण्यासाठी शूद्राला फिकीर करण्याची गरजच काय? लिहिण्या-वाचण्याचा प्रश्न येईल तेव्हा तो ब्राह्मणाकडे जाऊ शकतो. त्याचे रक्षण करायला क्षत्रिय आहे. त्यामुळे त्याने शस्त्र धारण करण्याची फिकीर करण्याची गरज काय? या अर्थाने समजून घेतल्यास चातुर्वर्ण्य सिद्धांत हा शुद्राकडे पाल्य व तीन वर्गांकडे त्याचे पालक म्हणून पाहत आहे असे म्हणता येईल. असा अर्थ काढल्यास चातुर्वर्ण्य सिद्धांत एक सरळ, साधा, उन्नतिकारी व मोहक सिद्धांत दिसतो. हा चातुर्वर्ण्यामागील संकल्पनेचा अचूक दृष्टिकोण आहे असे गृहीत धरता ही पद्धती मूर्खत्वरहित नाही किंवा लबाडीरहित नाही असे मला वाटते. ब्राह्मण, वैश्य व क्षत्रिय हे जर ज्ञानाचा पाठपुरावा करणे, आर्थिक उद्योगांमध्ये गुंतणे व सक्षम सैनिक असणे या त्यांच्या संबंधित कार्यात अपयशी ठरले तर काय होईल? याउलट त्यांनी त्यांची कार्ये पार पाडली, परंतु शूद्राच्या बाबतीत किंवा एकमेकांच्या बाबतीत त्यांचे कर्तव्य तुच्छ मानले तर काय होईल? न्याय्य शर्तींवर जर या तीन वर्गांनी शुद्राला आधार द्यायचे नाकारले किंवा जर ते त्याला खाली (खालच्या दर्जावर) ठेवण्यासाठी एक झाले तर शुद्राचे काय होईल? शूद्राच्या किंवा वैश्याच्या व क्षत्रियाच्या अज्ञानाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करणारी व्यक्ती जर ब्राह्मण असेल तर त्याबाबतीत त्यांच्या हितसंबंधाचे रक्षण कोण करणार? शूद्र, ब्राह्मण व वैश्य यांना लुटणारी व्यक्ती जर क्षत्रिय असेल तर त्याबाबतीत त्यांच्या स्वातंत्र्याचे रक्षण कोण करणार? एका वर्गाचे दुसऱ्या वर्गावरील परस्परांवर अवलंबून राहणे अटळ आहे. एका वर्गाचे दुसऱ्या वर्गावर अवलंबून राहणे देखील कधीकधी योग्य

ठरते. परंतु जीवनावश्यक गरजांच्या बाबतीत एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीवर का अवलंबून ठेवावे? शिक्षण प्रत्येकाला मिळाले पाहिजे. संरक्षणाची साधने प्रत्येकालाच मिळाली पाहिजेत. प्रत्येक माणसाच्या स्वसंरक्षणासाठी ह्या अत्यंत महत्त्वाच्या गरजा आहेत. अशिक्षित व निःशस्त्र माणसाला, शिक्षण घेतलेला व शस्त्र धारण केलेला त्याचा शेजारी आहे ही वस्तुस्थिती कशी काय उपयोगी ठरू शकेल? हा संपूर्ण सिद्धांतच विचित्र आहे. ह्या प्रश्नांनी चातुर्वर्ण्याच्या समर्थकांना अडचणीत टाकल्याचे दिसत नाही. परंतु ते अत्यंत समर्पक प्रश्न आहेत. वेगवेगळ्या वर्गांमधील संबंध हा पाल्य व पालक असा आहे ही चातुर्वर्ण्याच्या मागे असलेली खरी संकल्पना आहे, असे गृहीत धरले तरी हे मान्य केलेच पाहिजे की, पालकांच्या गैरकृत्यांपासून पाल्याच्या हितसंबंधाचे रक्षण करण्याची तिच्यात कसलीही तरतूद केलेली नाही. चातुर्वर्ण्य ज्यावर आधारलेले आहे ते पालक व पाल्य यांचे नाते ही त्यामागील खरी संकल्पना असो वा नसो, व्यवहारात ते नाते मालक व नोकर असेच होते यात शंका नाही. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे त्यांच्या परस्परांशी असलेल्या संबंधात सुखी नसले तरी त्यांनी सामोपचाराने काम करण्याची व्यवस्था निर्माण केली. ब्राह्मणाने क्षत्रियाची स्तुती केली आणि दोघांनी मिळून वैश्यासह सुरळीत उपजीविकेसाठी वैश्यालाही जगू दिले.

परंतु शूद्राला उलथून टाकण्यात तिघांचे संगनमत झाले. तो (शूद्र) तीन वर्णांपासून स्वतंत्र होईल म्हणून त्याला धन संपादन करू दिले नाही. तो त्याच्या हितसंबंधाबाबत जागृत होईल म्हणून त्याला ज्ञानसंपादनास मज्जाव करण्यात आला. त्यांच्या सत्तेविरुद्ध बंड करून उठण्यास त्याला साधने मिळतील म्हणून त्याला शस्त्र धारण करण्यास प्रतिबंध करण्यात आला. अशा प्रकारे शूद्राला त्रैवर्णिकांकडून वागणूक मिळाली. याला मनूच्या कायद्याचा आधार आहे. सामाजिक हक्कांबाबत मनूच्या कायद्याहून अधिक बदनाम अशी कोणतीही विधिसंहिता नाही. सामाजिक अन्यायाची कुठलीही व कोणतीही घटना तिच्यापुढे फिकी पडेल. बहुजन समाज ज्या सामाजिक दोषांच्या अधीन होता ते सामाजिक दोष त्याने का सहन केले? जगातील इतर देशांमध्ये सामाजिक क्रांत्या झाल्या, पण भारतात सामाजिक क्रांत्या का झाल्या नाहीत, हा प्रश्न मला सारखा अस्वस्थ करीत असतो. त्याला केवळ एकच उत्तर मी देऊ शकतो आणि ते असे की, या चातुर्वर्ण्याच्या नतद्रष्ट पद्धतीमुळे प्रत्यक्ष कृती करण्यास हिंदूंचे खालचे वर्ग पूर्णपणे असमर्थ बनविले गेले. ते शस्त्र धारण करू शकत नव्हते आणि शस्त्राशिवाय बंड करू शकत नव्हते. ते सर्व नांगरी होते. किंवा कदाचित नांगरे म्हणून त्यांचा धिक्कार करण्यात आला आणि त्यांना त्यांच्या नांगराच्या फाळाचे तलवारींमध्ये कधीच रूपांतर करू दिले गेले नाही. त्यांच्याकडे कोणत्याही संगिनी नव्हत्या व त्यामुळे ज्याला वाटेल तो त्यांच्या मानगुटीवर बसू शकत होता. चातुर्वर्ण्यामुळे त्यांना शिक्षण मिळू शकले नाही. ते त्यांच्या मुक्तीचा विचार करू

शकत नव्हते किंवा त्यांच्या मुक्तीचा मार्ग त्यांना माहीत नव्हता. त्यांचा नीच म्हणून धिक्कार करण्यात आला आणि सुटकेचा मार्ग माहीत नसल्यामुळे व सुटका करून घेण्याची साधने नसल्यामुळे त्यांनी कायमच्या दास्यत्वाबरोबर जुळवून घेतले. ते दास्य त्यांनी त्यांचे अटळ भाग्य म्हणून स्वीकारले. हे खरे आहे की, युरोपात पिळवणूक करण्यात, नव्हे दुर्बलांची लूट करण्यात सबल मागे नव्हते. परंतु भारतात हिंदूंमध्ये जसे घडले तसे इतक्या बेशरमपणे दुर्बलाला पिळवणुकीविरुद्ध निःसमर्थ करण्यासाठी युरोपात सबल असणारांनी कधीच हिकमत लढवली नाही. भारतात आतापावेतो घडलेल्या सामाजिक युद्धापेक्षा युरोपात सबल व दुर्बल यांच्यामध्ये सामाजिक युद्ध अधिक हिंस्रपणे चालू होते. युरोपातील दुर्बलाकडे सैनिकी सेवा हे त्याचे शस्त्र, हालअपेष्टांमध्ये त्याचे राजकीय शस्त्र व शिक्षणामध्ये त्याचे नैतिक शस्त्र ही शस्त्रे त्याच्याजवळ होती. बंधमुक्तीसाठी असलेली ही तीन शस्त्रे युरोपात सबलांनी दुर्बलांपासून कधीच हिरावून घेतली नाहीत. तथापि ही सर्व शस्त्रे चातुर्वर्ण्याने भारतातील बहुजन समाजाला नाकारली. सामाजिक संघटना अधिक अधोगतीस नेणारी चातुर्वर्ण्यापेक्षा दुसरी कोणतीही पद्धती असू शकत नाही. सहाय्यकारी कार्याऐवजी लोकांना मृतवत्, लुळी, लंगडी करणारी पद्धती आहे. ही अतिशयोक्ती नाही, इतिहासात त्याला भरपूर पुरावा आहे. भारतीय इतिहासात स्वातंत्र्याच्या महानतेचा व वैभवाचा एकच एक कालावधी होता. तो मौर्य साम्राज्याचा कालावधी होय. इतर सर्व काळात देशाला पराजय व अंधःकार सोसावा लागला. परंतु जेव्हा चातुर्वर्ण्य पूर्णपणे नेस्तनाबूत करण्यात आले होते, तेव्हा बहुजन समाज बनलेल्या शूद्रांना स्वत्वाची जाणीव झाली होती आणि ते देशाचे राज्यकर्ते बनले होते, असा हा मौर्य कालावधी होता. चातुर्वर्ण्य तेजीत असल्यामुळे देशातील जनतेपैकी बरीच मोठी जनता अधःपतित झाली होती, असा कालावधी म्हणजे पराजयाचा व अंधःकाराचा कालावधी होता.

## १८.

चातुर्वर्ण्य ही काही नवीन गोष्ट नाही. ती वेदांइतकीच जुनी आहे. आर्य समाजीयांचा अधिकार मानावा म्हणून त्यांच्याकडून ज्या कारणास्तव आवाहन करण्यात येते त्या कारणांपैकी हे एक कारण आहे. गतकालापासून चालत असलेली ती एक सामाजिक संघटनेची पद्धती आहे असे मानून, ती योग्य आहे की अयोग्य हे पाहता, ती अपयशी ठरल्याचे दिसून येते. ब्राह्मणांनी क्षत्रियांची संतती किती वेळा नेस्तनाबूत केली, क्षत्रियांनी ब्राह्मणांना किती वेळा नेस्तनाबूत केले, अशा ब्राह्मण-क्षत्रिय यांच्यामधील वर्गकलहाच्या घटनांनी महाभारत व पुराणे भरलेली आहेत. रस्त्यात गाठ पडल्यास प्रथम कोणी नमस्कार करावा व प्रथम कोणी वाट द्यावी, ब्राह्मणांनी

की क्षत्रियांनी यांसारख्या अगदी क्षुल्लक प्रश्नांवरून त्यांनी भांडणे केली. क्षत्रियांच्या डोळ्यांत ब्राह्मण खुपत होते, तर ब्राह्मणांच्या डोळ्यांत क्षत्रिय खुपत होते.

क्षत्रिय हे जुलुमी बनले होते, तर चातुर्वर्ण्य पद्धतीखाली बहुजन समाज हतबल झाला होता. त्यामुळे तो जुलुमापासून सुटका व्हावी म्हणून सर्वशक्तिमान ईश्वराची करुण भाकत होता. भागवत पुराणात अगदी स्पष्टपणे सांगितले आहे की, कृष्णाने एका पवित्र प्रयोजनासाठी अवतार घेतला होता आणि ते प्रयोजन म्हणजे, क्षत्रियांना नेस्तनाबूत करणे. आपल्यासमोर असलेल्या ह्या वेगवेगळ्या वर्णांमधील श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याच्या स्पर्धेच्या व शत्रुत्वाचया घटना विचारात घेता, चातुर्वर्ण्य हे ध्येय मानावे असे आदर्श आहे अथवा हिंदू समाजाची पुनर्रचना ज्यावर करण्यात यावी असा तो एक नमुना (मॉडेल) आहे, हे कोण कसे काय मान्य करील, ते मला समजत नाही.

## १९.

जे तुमच्याबरोबर नाहीत आणि ज्यांचे तुमच्या आदर्शाशी असलेले वैर अगदी उघड आहे, त्यांचा मी समाचार घेतलेला आहे. जे तुमच्याबरोबर नाहीतही वा तुमच्याबरोबर आहेतही असेही काही इतरेजन आहेत. त्यांच्या दृष्टिकोणाची मी चर्चा करावी की नको, याबाबतीत माझा निश्चय झालेला नव्हता. परंतु पुढे विचार करता मी त्यांचा परामर्श घेतलाच पाहिजे या निर्णयाप्रत येऊन पोहोचलो आहे. त्याची दोन कारणे आहेत. पहिली गोष्ट, त्यांचा जातीच्या प्रश्नावरील दृष्टिकोण केवळ तटस्थ राहण्याचा दृष्टिकोण नाही, तर तो शस्त्रसज्ज तटस्थतेचा दृष्टिकोण आहे.

दुसरी गोष्ट, ते बहुतेक बऱ्याच मोठ्या लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करतात. त्यांपैकी ज्यांना हिंदूंच्या जातीपद्धतीमध्ये कुठलीही गोष्ट चमत्कारिक किंवा किळसवाणी असल्याचे दिसून येत नाही अशा लोकांचा एक गट आहे. असे हिंदू हे मुस्लिम, शीख व ख्रिस्ती यांचे उदाहरण पुढे करतात आणि त्यांच्यामध्ये देखील जाती आहेत, ह्या वसतुस्थितीत समाधान मानतात. या प्रश्नाचा विचार करताना तुम्ही प्रारंभीच ध्यानात ठेवले पाहिजे की, मानव समाज हा कोठेच संपूर्ण एकसंध असा नाही. तो नेहमीच अनेकविध आहे. प्रत्यक्ष कृतीच्या क्षेत्रात व्यक्ती ही एक टोक आहे तर समाज हे दुसरे टोक आहे. त्यांच्यामध्ये अधिक कमी व अधिक जास्त वाव असलेल्या सर्व प्रकारच्या सहयोगी व्यवस्था, कुटुंबे, मित्रत्व, सहकारी संघटना, व्यापार मंडळे, राजकीय पक्ष, चोरांचा व दरोडेखोरांच्या टोळ्या यांचा समावेश होतो. हे सर्व गट सामान्यतः भक्कमपणे एकत्र जोडलेले असतात आणि पुष्कळदा जातींप्रमाणे ते निवडक लोकांसाठी असतात. त्यांचे अलिखित कायदे संकुचित व समाजविरोधी असतात. ही गोष्ट युरोपातील त्याचप्रमाणे आशियातील प्रत्येक समाजाला लागू आहे. एखादा समाज हा एक आदर्श

समाज आहे की नाही हे ठरवताना एक प्रश्न विचारण्यात येतो तो म्हणजे, त्या समाजात गट आहेत की नाहीत. कारण गट हे सर्वच समाजांमध्ये अस्तित्वात आहेत. आदर्श समाज म्हणजे काय, हे ठरविताना विचारले जाणारे प्रश्न म्हणजे, गटांकडून जाणीवपूर्वक भाग घेतला जाणारे हितसंबंध हे कशाप्रकारे अनेक व निरनिराळ्या प्रकारचे आहेत? इतर प्रकारच्या संघटनांशी त्यांच्या अन्योन्य प्रक्रिया किती प्रमाणात पूर्ण व मुक्त आहेत? गटांना व वर्गांना संघटित करणाऱ्या शक्तींपेक्षा त्यांना विभक्त करणाऱ्या शक्ती संख्येने अधिक आहेत काय? ह्या सामूहिक जीवनाला कोणते सामाजिक महत्त्व देण्यात आले आहे? त्या समूहजीवनाचे वेगळेपण ही चालीरीतीची व सोयीची बाब आहे की धर्माची बाब आहे? ह्या प्रश्नांच्या आधारे, बिगर हिंदूंमधील जात ही हिंदूंमधील जातीसारखीच आहे किंवा कसे हे ठरविले पाहिजे. जर एका बाजूस आपण हे विचार मुसलमान, शीख व ख्रिस्ती लोकांमधील जातींना लागू केले व दुसऱ्या बाजूस हिंदूंमधील जातींना लागू केले तर बिगर हिंदूंमधील जात ही हिंदूंमधील जातीहून मूलतः भिन्न आहे असे तुम्हास दिसून येईल. पहिली गोष्ट, हिंदूंना जाणीवपूर्वक एकत्र ठेवणारी बंधने ही अस्तित्वात नाहीत, तर बिगर हिंदूंमध्ये त्यांना एकत्र ठेवणारी बंधने अनेक आहेत. एखाद्या समाजाची ताकद ही त्यात अस्तित्वात असलेल्या वेगवेगळ्या गटांमध्ये संपर्क ठेवणाऱ्या गोष्टीची विद्यमानता व आंतरसंबंधाच्या शक्यता यांवर अवलंबून असते. त्यांनाच कार्लाईलने 'सेंद्रिय तंतू' असे संबोधले आहे. संद्रिय तंतू म्हणजे विघटनकारी घटक एकत्र आणण्यास मदत करणारे व त्यांना पुनर्संघटित करणारे लवचिक धागे. तसेच हेही ध्यानात ठेवले पाहिजे की, बिगर हिंदूंमध्ये जरी हिंदूंमध्ये आहेत तशा जाती असल्या तरी हिंदूंमध्ये जसे आहे तसे बिगर हिंदूंमध्ये जातीला सामाजिक महत्त्व नाही. एखाद्या मुसलमानाला किंवा एखाद्या शिखाला तो कोण आहे ते विचारा. यथास्थिती तो आपण मुसलमान किंवा शीख असल्याचे तुम्हाला सांगेल. त्याची जरी एखादी जात असली तरी तो तुम्हाला त्याची जात सांगत नाही आणि तुम्ही त्याच्या उत्तराने समाधान पावता. जेव्हा तुम्हाला तो मुस्लिम आहे असे सांगतो तेव्हा तुम्ही त्याला तो शिया आहे की सुन्नी आहे, शेख आहे की सय्यद आहे, खाटिक आहे की पिंजारी आहे, हे आणखी विचारत बसत नाही. जेव्हा तुम्हाला तो शीख असल्याचे सांगतो, तेव्हा तुम्ही त्याला तो जाट आहे की रोडा आहे, मधवी आहे की रामदासी आहे, हे विचारत बसत नाही. परंतु एखाद्या व्यक्तीने ती हिंदू आहे असे तुम्हाला सांगितल्यावर तुमचे समाधन होत नाही. तुम्हाला त्याच्या जातीची चौकशी करणे आवश्यक वाटते. का? कारण हिंदूंच्या बाबतीत त्याची जात इतकी आवश्यक आहे की, ती न समजून घेता तो कोणत्या प्रकारचाप्राणी आहे याची तुम्हाला खात्री पटत नाही. हिंदूंमध्ये जसे आहे तसे बिगर हिंदूंमध्ये जातीला सामाजिक महत्त्व नाही. ही गोष्ट जातीचे उल्लंघन केल्याने जे परिणाम घडून येतात ते विचारात घेतल्यास स्पष्ट होते. शीख व मुसलमान यांच्यामध्ये जाती असतील, परंतु

तो शीख वा मुसलमान जात मोडली म्हणून एखाद्या शिखाला मुसलमानाला जातीतून काढून टाकणार नाही. खरोखर बहिष्काराची कल्पनाच शीख व मुसलमान यांना अपिरिति आहे.

परंतु हिंदूंच्या बाबतीत ही गोष्ट संपूर्णपणे वेगळी आहे. त्योन जर जात मोडली तर त्याला जातीबहिष्कृत केले जाण्याची खात्री आहे. यावरून हिंदू व बिगर हिंदूंमधील जातीच्या सामाजिक महत्त्वामधील फरक दिसून येतो. हा फरकाचा दुसरा मुद्दा झाला. परंतु तिसराही एक मुद्दा असून तो अधिक महत्त्वाचा आहे. बिगर हिंदूमध्ये जातीला कोणतेही धार्मिक पावित्र्य नाही. परंतु हिंदूंमध्ये जातीला अत्यंत निःसंदिग्धपणे पावित्र्य दिलेले आहे. बिगर हिंदूमध्ये जात ही केवळ एक प्रथा आहे, ती पवित्र संस्था नाही. त्यांनी ती जन्माला घातलेली नाही. ती केवळ त्यांच्याबरोबर जिवंत आहे इतकेच. ते जात हे एक धार्मिक तत्त्व असल्याचे मानत नाहीत. हिंदूंना त्यांचा धर्म जातींचा अलगपणा आणि विभक्तपणा एक सद्‌गुण म्हणून पाळण्यास भाग पाडतो. परंतु बिगर हिंदूंना त्यांचा धर्म जातींविषयी तोच दृष्टिकोण बाळगण्यास भाग पाडत नाही. हिंदूंनी जर त्यांची जात मोडायची ठरवले तर त्यांना त्यांचा धर्म आड येईल, परंतु बिगर हिंदूंच्या बाबतीत असे घडणार नाही. त्यामुळे बिगर हिंदूंच्या जीवनात जातीला कोणते स्थान आहे आणि त्यांच्या समाजाच्या भावनापुढे जातीची भावना गौण बनविणारे इतर 'सेंद्रिय तंतू' आहेत की नाहीत, हे जाणून घेण्याची फिकीर न करता, बिगर हिंदूंमधील जातीच्या केवळ अस्तित्वावर समाधान मानणे, हा एक धोकादायक भ्रम आहे.

हिंदूंनी ज्याचा विचार करावा असा दुसरा एक लोकसमूह आहे, जो 'जात' एखादा प्रश्न निर्माण करते ही गोष्टच मुळी नाकारतो. हिंदू हे टिकून राहिले आहेत, या गोष्टीत ते समाधान मानतात आणि टिकून राहण्यास पात्र असल्याचा ते हा पुरावा मानतात. हा दृष्टिकोण प्रा. एस. राधाकृष्णन यांनी त्यांच्या 'हिंदू व्ह्यूज ऑफ लाईफ' (हिंदूंचा जीवनविषयक दृष्टिकोण) या ग्रंथात उत्तमरीत्या व्यक्त केला आहे. हिंदू धर्माचा उल्लेख करून ते असे म्हणतात- हिंदू संस्कृती ही अल्पजीवी नाही. तिचे ऐतिहासिक अभिलेख चार हजार वर्षांहून अधिक पुरातन आहेत. आणि असे असले तरी ती अशा संस्कृतीच्या अवस्थेला पोहोचली होती की तिचा अखंडित प्रवाह, ती मधूनमधून मंदगती वा स्थिर झाली तरी, सांप्रत काळपावेतो तिने चालू ठेवला आहे. ती चार वा पाच युगांहून अधिक काळापासून आध्यात्मिक विचार व अनुभव यांचा दबाव व ताण सहन करीत ठामपणे उभी आहे. इतिहासाच्या प्रारंभापासून वेगवेगळ्या वंशाच्या व संस्कृतीच्या लोकांची भारतात भर पडत आहे, तरी हिंदू धर्म त्याचे वर्चस्व टिकवण्यास समर्थ आहे; आणि जरी धर्मांतर घडवून आणणाऱ्या संप्रदायांना राजकीय सत्तेचा पाठिंबा मिळाला तरी बहुसंख्य हिंदूंना त्यांच्या मताचे बनविण्यास ते (संप्रदाय) असमर्थ होते. हिंदू संस्कृतीत एक प्रकारचे चैतन्य आहे. ते अन्य काही अधिक जोरदार

प्रवाहांना (धर्मांना) मिळाले नसावे. एखाद्या वृक्षामध्ये अद्याप जीवनरस वाहतो आहे की नाही हे पाहण्यासाठी तो वृक्षच चिरावा त्याप्रमाणे हिंदू धर्माचे विच्छेदन करण्याची काहीही आवश्यकता नाही.' प्रा. राधाकृष्णन जे काही सांगतात व त्यांच्या वाचकांच्या मनांवर जो काही प्रभाव पाडतात त्यावरून त्यांच्या ज्ञानाची अगाधता व अथांगता अगदी आवर्जून नाव घेण्याजोगी वाटते. परंतु इथे माझे स्पष्ट मत बोलून दाखवताना मी कचरणार नाही. कारण एखादे विधान टिकून राहण्याची वस्तुस्थिती हा टिकून राहण्यास पात्र असल्याचा पुरावा असते, समाज जगतो की मरतो हा खरा प्रश्न नाही. तो कोणत्या पातळीवर जगतो, हा खरा प्रश्न आहे. जगण्याच्या नाना परी आहेत. परंतु त्या सर्वच सारख्या मान्यतेच्या नाहीत. एखाद्या व्यक्तीने, त्याचप्रमाणे एखाद्या समाजाने केवळ जगणे व मानाने जगणे यामध्ये अंतर आहे. युद्धात लढून वैभवात जगणे, हा एक मार्ग आहे. माघार घेणे, शरण जाणे व बंदीवानाचे जीवन जगणे हा देखील जगण्याचा एक मार्ग आहे. एखाद्या हिंदूने तो व त्याचे लोक 'जिवंत राहिले' या गोष्टीत समाधान मानणे निरर्थक आहे. त्यांच्या टिकून राहण्याची योग्यायोग्यता काय होती, याचा त्याने विचार केला पाहिजे. त्याने जर तसा विचार केला तर मला खात्री आहे की केवळ जिवंत राहण्याच्या गोष्टीला भूषण मानण्याचे तो सोडून देईल. हिंदूंचे जीवन हे अखंड पराभवाचे जीवन आहे आणि त्याला जे चिरस्थायी जीवन वाटते ते चिरस्थायी जीवन नसून ते खरोखर चिरस्थायीपणे नाश करणारे जीवन आहे. ते अशा प्रकारचे टिकून राहणे आहे की, सत्य मान्य करण्यास न कचरणाऱ्या व अक्कल शाबूत असलेल्या प्रत्येक हिंदूला त्याची लाज वाटेल.

## २०.

माझ्या मते, तुम्ही तुमची समाजरचना बदलली नाही तर प्रगतीच्या माध्यमातून फारच थोडे प्राप्त करू शकाल. तुम्ही संरक्षणासाठी किंवा चढाईसाठी समाजाला एकत्र आणू शकत नाही. तुम्ही जातीच्या पायावर कोणतीच गोष्ट उभारू शकत नाही. तुम्ही राष्ट्र उभारू शकत नाही, तुम्ही नीती उभारू शकत नाही. जी कोणती गोष्टी तुम्ही जातीच्या पायावर उभाराल तिला तडे जातील व ती कधीच एकसंध असणार नाही.

हिंदू समाजरचनेत सुधारणा कशी घडवून आणावी, जात कशी नष्ट करावी, हेच प्रश्न आता विचारात घ्यावयाचे उरले आहे. हे अत्यंत महत्त्वाचे प्रश्न आहेत. जातीच्या सुधारणेसाठी पोट-जाती नष्ट करणे हे पहिले पाऊल उचलले पाहिजे, असा एक दृष्टिकोण आहे. जातीपेक्षा पोटजातींमध्ये चालीरीती व दर्जा यांचे फार मोठे साम्य आहे, या कल्पनेवर हा दृष्टिकोण आधारलेला आहे. ही एक चुकीची कल्पना आहे असे मला वाटते. दख्खन व दक्षिण भारतातील ब्राह्मणांच्या तुलनेत

उत्तर व मध्य भारतातील ब्राह्मण सामाजिकदृष्ट्या खालच्या दर्जाचे आहेत. पहिले केवळ खानसामे व पाणक्ये आहेत, तर नंतरचे उच्च सामाजिक दर्जा असलेले आहेत. उलटपक्षी, उत्तर भारतातील वैश्य आणि कायस्थ हे बौद्धिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या दक्षिण भारतातील ब्राह्मणांच्या बरोबरीचे आहेत. तसेच आहाराच्या बाबतीत दक्षिण भारतातील शाकाहारी असलेल्या ब्राह्मणांमध्ये आणि काश्मीरच्या व बंगालच्या मांसाहारी ब्राह्मणांमध्ये कोणतेही साम्य नाही. दुसऱ्या बाजूस दक्षिण भारतातील ब्राह्मणांचा आहाराच्या बाबतीत गुजराती, मारवाडी, बनिया व जैन यांसारख्या ब्राह्मणेतरांशी अधिक सारखेपणा आहे. एका जातीतून दुसऱ्या जातीत जाणे सुलभ करण्याच्या दृष्टिकोणातून दक्षिणेकडील ब्राह्मणांचा उत्तरेकडील ब्राह्मणांशी संकरापेक्षा उत्तर भारतातील कायस्थ व दक्षिण भारतातील ब्राह्मणेतर यांचा दख्खन व द्रविड देशातील अब्राह्मणांशी संकर अधिक व्यवहार्य आहे. परंतु पोटजातीचा संकर शक्य आहे असे गृहीत धरले, तरी पोटजातींचा नाश परिणामी जातींचा नाश घडवून आणील याची काय हमी आहे? कदाचित, असेही घडेल की ही प्रक्रिया पोटजातींचा नाश होताच थांबेल. त्याबाबतीत पोटजातींचा नाश केवळ जातींना मजबूत करण्यास उपयोगी पडेल व त्यांना तो अधिक प्रबळ व त्यामुळे अधिक अपायकारक बनवील. त्यामुळे हा उपाय व्यवहार्य नाही किंवा परिणामकारकदेखील नाही. उलट तो कदाचित चुकीचा उपाय असल्याचे सिद्ध होऊ शकेल. आंतरजातीय भोजने सुरू करणे ही जाती नष्ट करण्याची दुसरी एक योजना आहे. ही देखील माझ्या मते अपुरी योजना आहे. सहभोजनाला मुभा देणाऱ्या अनेक जाती आहेत. परंतु सहभोजनांना जातीची भावना व जातीची जाणीव ठार करण्यात यश मिळालेले नाही, हा एक सार्वत्रिक अनुभव आहे. खरा उपाय आंतरजातीय विवाह होय, अशी माझी खात्री झालेली आहे. रक्ताच्या मिश्रणाने केवळ सगेसोयरे असल्याची भावना उत्पन्न करता येऊ शकेल आणि सगेसंबंधी असल्याची, नात्याची ही भावना परमोच्च बनल्याशिवाय जातीने निर्माण केलेली वेगळेपणाची भावना-शत्रू असल्याची भावना-लोप पावणार नाही. आंतरजातीय विवाह हा बिगर हिंदूंच्या जीवनात सर्रास रूढ असेला घटक असणे जितके गरजेचे आहे त्यापेक्षा तो हिंदूंमध्ये सामाजिक जीवनात अधिक मोठ्या प्रमाणात अंमलात असलेला एक घटक अवश्य असला पाहिजे. जेथे समाज अगोदरच इतर बंधनांनी एकसंध असतो तेथे विवाह ही जीवनाची एक सर्वसाधारण घटना असते; परंतु जेथे समाजाचे तुकडे तुकडे पडलेले असतील तेथे विवाह ही एक बंधनकारक शक्ती या अर्थाने तातडीची गरज बनते.

जात मोडण्यासाठी आंतरजातीय विवाह खरा उपाय आहे. जातीपासून सुटका करण्यास दुसऱ्या कशाचाच उपयोग होणार नाही. तुमच्या जातपात-तोडक मंडळाने जातीप्रथेवर हल्ला करण्याचा मार्ग अंगीकारलेला आहे. हा सरळ आणि आघाडीचा हल्ला आहे व मी या अचूक निदानाबद्दल आणि हिंदूंना त्यांच्यात खरोखर काय वाईट

आहे ते सांगण्याचे धैर्य दाखवल्याबद्दल आपले अभिनंदन करतो. सामाजिक जुलुमाच्या तुलनेत राजकीय जुलूम काहीच नाही आणि समाजाला आव्हान देणारा सुधारक हा सरकारला आव्हान देणाऱ्या राजकारणी व्यक्तींपेक्षा किती तरी अधिक धैर्यशाली असतो. जेव्हा सहभोजन व आंतरजातीय विवाह ही सामान्य जीवनप्रणालीची बाब बनेल तेव्हाच जात ही परिणामकारक शक्ती असण्याचे थांबेल, ही आपली धारणा बरोबर आहे. तुम्ही रोगाचे मूळ शोधून काढले आहे. परंतु तुमचा उपचार या रोगासाठी योग्य उपचार आहे काय, हा प्रश्न स्वतःलाच विचारा. हिंदूंपैकी बहुसंख्य हिंदू सहभोजन करीत नाहीत व आंतरजातीय विवाह करीत नाहीत, असे का आहे? तुमचे कार्य लोकप्रिय का नाही? या प्रश्नाला एकच उत्तर असू शकेल व ते म्हणजे सहभोजन व आंतरजातीय विवाह ह्या दोन्हीही कृती हिंदू ज्यांना पवित्र म्हणून मानतात त्या श्रद्धांच्या व तत्त्वांच्या विरोधी आहेत. एकत्र मिसळण्यापासून हिंदूंना प्रतिबंध करणारी व त्यायोगे जी नेस्तनाबूत करावयाची आहे अशी जात, ही विटांच्या भिंतीप्रमाणे किंवा परिवेष्टित तारेप्रमाणे एखादी भौतिक वस्तू नाही. जात ही एक कल्पना आहे, ती एक मनाची स्थिती आहे. त्यामुळे जातीचा नाश याचा अर्थ भौतिक अडथळ्याचा नाश नव्हे. त्याचा अर्थ मनोवृत्तीमधील बदल होय. 'माणसाची माणसाप्रति असलेली अमानुषता' असे संबोधावे अशा एकूण वर्तनाकडे जात नेईल. त्याचबरोबर हेही मान्य केले पाहिजे की, हिंदू हे अमानुष किंवा बुद्धिहीन आहेत म्हणून जातीचे पालन करीत नाहीत. ते जातीचे पालन करतात त्याचे कारण ते अत्यंत धार्मिक आहेत. जातीचे पालन करण्यात लोकांची चूक नाही. माझ्या मते, चूक जर कशात असेल तर ज्या धर्माने ही जातीची कल्पना त्यांच्यात बिंबविली तो त्यांचा धर्म होय. हे जर बरोबर असेल तर उघडच तुम्हाला ज्याच्याशी सामना करावयाचा आहे तो शत्रू म्हणजे जातीचे पालन करणारे लोक नाहीत. त्यांना हा जातीचा धर्म शिकवणारी शास्त्रे आहेत. सहभोजन किंवा आंतरजातीय विवाह करीत नसल्याबद्दल किंवा निमित्तमात्र सहभोजने आयोजित करीत असल्याबद्दल व निमित्तमात्र विवाह साजरे करीत असल्याबद्दल लोकांवर टीका करणे व त्यांची थट्टा करणे, हा अपेक्षित ध्येय गाठण्याचा निष्फळ मार्ग होय. शास्त्रांच्या पावित्र्यावरील श्रद्धा नष्ट करणे, हाच खरा उपाय आहे. तुम्ही जर लोकांच्या श्रद्धा व मते घडविण्याचे काम चालू ठेवण्यास शास्त्रांना मुभा दिली तर तुम्ही यशाची अपेक्षा तरी कशी करणार? शास्त्राच्या प्रामाण्यला आव्हान न देता त्यांच्या पावित्र्यावर व त्यांच्या मान्यतांवर लोकांना श्रद्धा ठेवण्यास परवानगी द्यायची आणि त्यांची कृत्ये अविचारी व अमानुष असल्याबद्दल त्यांना दोष द्यायचा व त्यांच्यावर टीका करावयाची, हा समाजसुधारणा घडवून आणण्याचा विपर्यस्त मार्ग आहे.

अस्पृश्यता निवारण्याचे कार्य करणाऱ्या सुधारकांनी, ज्यात महात्मा गांधींचाही समावेश आहे, लोकांच्या कृती या केवळ त्यांच्या मनांवर शास्त्रांनी बिंबविलेल्या त्यांच्या श्रद्धांचा परिपाक आहे आणि ज्यावर त्यांची वर्तणूक आधारलेली आहे त्या

शास्त्रांच्या पावित्र्यावर श्रद्धा ठेवण्याचे ते जोपर्यंत थांबवीत नाहीत तोपर्यंत ते त्यांची वर्तणूक बदलणार नाहीत, ही गोष्ट ओळखल्याचे दिसत नाही. अशा प्रयत्नांतून काहीही निष्पन्न झालेले नाही, त्यात आश्चर्य नाही. तुम्ही देखील अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यासाठी झटणाऱ्या सुधारकांच्या प्रमाणेच चूक करीत असल्याचे दिसते. सहभोजने व आंतरजातीय विवाह यांच्यासाठी चळवळ करणे व ती आयोजित करणे हे कार्य कृत्रिम साधनांद्वारे जबरदस्तीने अन्न भरवण्यासारखे कार्य आहे. प्रत्येक स्त्री-पुरुषाला शास्त्राच्या दास्यातून मुक्त करा, शास्त्रांवर आधारलेल्या अपायकारक कल्पना असलेली त्यांची मने स्वच्छ करा, मग तुम्ही त्यांना सहभोजन व आंतरजातीय विवाह करण्यास न सांगताही ते सहभोजन व आंतरजातीय विवाह करतील.

शब्दच्छल करीत बसण्यात काही अर्थ नाही. व्याकरणिकदृष्ट्या वाचून व तार्किकदृष्ट्या अर्थ काढून, शास्त्रे ज्या गोष्टी सांगतात अशी लोकांची श्रद्धा आहे त्या गोष्टी शास्त्रे सांगत नाहीत असे लोकांना सांगत बसण्यात काळी मतलब नाही. लोकांनी शास्त्रे कशा प्रकारे समजून घेतली आहेत, हे महत्त्वाचे आहे. बुद्धाने जी भूमिका घेतली ती तुम्ही घेतली पाहिजे. गुरू नानकाने जी भूमिका घेतली ती तुम्ही घेतली पाहिजे. तुम्ही केवळ शास्त्रे टाळून चालणार नाही. तुम्ही बुद्ध, गुरू नानकाप्रमाणे त्यांचे प्रामाण्यदेखील नाकारले पाहिजे. हिंदूंना-त्यांच्यात जे काही वाईट आहे तो त्यांचा धर्म आहे. त्या धर्मानेच त्यांच्यात जातीच्या पावित्र्याची कल्पना जन्मास घातली आहे, हे सांगण्याचे धैर्य तुमच्यात असले पाहिजे. तुम्ही ते धैर्य दाखवाल काय?

## २१.

तुम्हाला कोणकोणते यश शक्य आहे? सामाजिक सुधारणा वेगवेगळ्या प्रकारात मोडतात. अशी एक सुधारणा असते की, ती लोकांच्या धार्मिक कल्पनेशी संबंधित नसते तर ती शुद्ध ऐहिक स्वरूपाची असते. लोकांच्या धार्मिक कल्पनांशी संबंधित असलेल्या सुधारणेचा एक प्रकार देखील असतो. सुधारणेच्या अशा प्रकारांमध्ये दोन प्रकारचे नमुने आहेत. एक म्हणजे, धर्माच्या तत्त्वांशी जुळणारी सुधारणा, ती धर्मापासून च्युत झालेल्यांना धर्माकडे परत वळवून आणण्यासाठी आणि त्याचे अनुसरण करण्यासाठी लोकांना केवळ आवाहन करते. दुसरी सुधारणा केवळ धार्मिक तत्त्वांशीच संबंधित नाही तर ती त्या तत्त्वांच्या पूर्णपणे विरोधी आहे व ती त्यांपासून परावृत्त होण्यासाठी व त्यांचे प्रामाण्य झुगारून टाकण्यासाठी व त्या तत्त्वांविरोधी वर्तन करण्यासाठी लोकांना आवाहन करते. ज्ञानाची नैसर्गिक देणगी लाभलेल्या व दैवी प्रेरणा मिळालेल्या ऋषींच्या आज्ञा ज्यात अंतर्भूत आहेत असे मानले जाते त्या शास्त्रांची मान्यता असलेल्या विशिष्ट धार्मिक श्रद्धांची नैसर्गिक फलश्रुती म्हणजे जात आहे व ह्या आज्ञा पाप केल्याशिवाय मोडता येऊ शकत नाहीत,

असा सार्वत्रिक समज आहे. जातीचा नाश ही तिसऱ्या प्रकारात मोडणारी सुधारणा आहे. लोकांना जात टाकून देण्यास सांगणे म्हणजे त्यांना त्यांच्या मूलभूत धार्मिक कल्पनांच्या विरोधी जाण्यास सांगण्यासारखे आहे. उघडच, पहिल्या व दुसऱ्या प्रकारच्या सुधारणा सोप्या आहेत. परंतु तिसऱ्या प्रकारची सुधारणा हे एक मती गुंग करील असे भव्य कार्य आहे, नव्हे ते अशक्य आहे. हिंदू हे समाजरचनेचे पावित्र्य मानतात. जातीला दैवी आधार आहे. ज्यामुळे जातीला अधिकार बहाल करण्यात आले आहेत या पावित्र्याचा व दैवीपणाचा नाश करण्याचे काम तुम्हाला केलेच पाहिजे. याचा अर्थ तुम्ही शास्त्रांच्या व वेदांच्या प्रामाण्याचा नाश केला पाहिजे.

मी जातीनाशनाच्या मार्गाच्या व साधनांच्या या प्रश्नावर जोर दिला आहे त्याचे कारण मला असे वाटते की, आदर्श जाणून घेण्यापेक्षा योग्य मार्ग व साधने जाणून घेणे, हे अधिक महत्त्वाचे आहे. तुम्हाला जर खरे मार्ग व साधने माहीत नसतील तर तुमचे सर्व नेम चुकल्याशिवाय राहणार नाहीत. माझे विश्लेषण जर बरोबर असेल तर तुमचे कार्य हे अत्यंत प्रचंड आहे. तुम्ही ते पूर्ण करण्यास समर्थ आहात की नाही, हे केवळ तुमचे तुम्हीच सांगू शकाल.

माझ्या स्वतःबद्दल सांगायचे तर, मला हे कार्य अगदी अशक्य दिसते. मला असे का वाटते हे कदाचित तुम्हाला जाणून घ्यावेसे वाटेल. असे मत बनविण्यामागील अनेक कारणांपैकी जी मला अधिक महत्त्वाची वाटतात अशा काही कारणांचा मी उल्लेख करीन. ब्राह्मणांनी या प्रश्नाबाबत दाखवलेली शत्रुत्वाची वृत्ती हे एक कारण आहे. राजकीय सुधारणेसाठी आणि काही बाबतीत सामाजिक सुधारणेसाठी देखील ब्राह्मण चळवळीची आघाडी उभारतात. परंतु ते जातीची बंधने मोडून टाकण्यासाठी उभारलेल्या सैन्यात छावणीतील सोबतीदेखील बनल्याचे दिसून येत नाहीत. याबाबतीत भावी काळात ब्राह्मण कधी तरी पुढाकार घेतील अशी आशा आहे काय? मी म्हणतो, नाही. तुम्ही विचाराल, का? तुम्ही असाही युक्तिवाद कराल की, ब्राह्मणांनी सामाजिक सुधारणा टाळण्याचे चालू ठेवावे याचे काही कारण नाही. तुम्ही असाही युक्तिवाद कराल की, हिंदू समाजाला जात हा शाप आहे, हे ब्राह्मणांना माहीत आहे आणि एक जागृत वर्ग म्हणून त्याच्या परिणामाबद्दल ते उदासीन राहतील असे म्हणता येऊ शकणार नाही. तुम्ही असा कोटीक्रम कराल की, काही निधर्मी ब्राह्मण व काही पुरोहित ब्राह्मण आहेत आणि जाती मोडू इच्छिणाऱ्यांच्या बाजूने पुरोहित ब्राह्मणांनी हाती खड्ग घेतले नाही तरी निधर्मी ब्राह्मण ते घेईल. अर्थात हे सर्व अत्यंत सुखद असे वाटते. परंतु या सर्वांमध्ये हे विसरले गेले आहे की, जातीपद्धती मोडण्याचा ब्राह्मण जातीवर प्रतिकूल परिणाम होणे अपरिहार्य आहे. याचा विचार करता, ब्राह्मण हे जिचा अंतिम परिणाम ब्राह्मण जातीची सत्ता व प्रतिष्ठा नष्ट होण्यात होईल अशी चळवळ चालविण्यास कधी संमती देईल, अशी अपेक्षा करणे रास्त ठरेल काय? पुरोहित ब्राह्मणांच्या विरुद्ध असलेल्या चळवळीत निधर्मी ब्राह्मण भाग

घेईल, अशी अपेक्षा करणेरास्त आहे काय? माझ्या न्यायबुद्धीनुसार निधर्मी ब्राह्मण व पुरोहित ब्राह्मण यांच्यात फरक करणे निरर्थक आहे. दोन्हीही एकमेकांचे सगेसोयरे आहेत. ते एकाच शरीराचे दोन हात आहेत आणि एकाला दुसऱ्याच्या अस्तित्वासाठी लढणे गरजेचे आहे. या संदर्भात प्रा. डायसी यांनी त्यांच्या 'इंग्लिश कॉन्स्टिट्युशन' मध्ये दिलेले काही अत्यंत अर्थगर्भ अभिप्राय मला आठवतात. पार्लमेंटच्या वैधानिक वर्चस्वावरील प्रत्यक्ष मर्यादांबद्दल बोलताना डायसी असे म्हणतात, 'कोणत्याही सार्वभौम राजाकडून आणि विशेषत: पार्लमेंटकडून होणारा प्राधिकारांचा प्रत्यक्ष वापर दोन मर्यादांनी बांधलेला असतो अथवा त्याला दोन मर्यादांनी नियंत्रित केलेले असते. ह्या दोन मर्यादांपैकी एक बाह्य मर्यादा असते व एक आंतरिक मर्यादा असते. एखाद्या सार्वभौम राजाच्या खऱ्या सत्तेची बाह्य मर्यादा ही त्याची प्रजा किंवा त्या प्रजेमधील बहुसंख्य लोक त्याच्या कायद्याची अवज्ञा करतील अगर त्यांना विरोध करतील, या गोष्टींची शक्यता अथवा अनिश्चितता यांमध्ये अंतर्भूत असते. सार्वभौमत्व अंमलात आणावयाची आंतरिक मर्यादा ही खुद्द सार्वभौम सत्तेच्या स्वरूपातून उदयास येते. एखादा अनियांत्रित सत्ताधीश देखील ज्या परिस्थितीत तो जगतो त्या परिस्थितीने घडविलेल्या व तो ज्या समाजात आहे त्या समाजात नैतिकतेला अनुसरून असलेल्या त्याच्या स्वभावानुसार त्याचे अधिकार अंमलात आणत असतो. सुलतानाला बदलता आला असता तरी सुलतान मुस्लिम जगताचा धर्म बदलू शकत नव्हता. परंतु जरी तो तसे करू शकला असता तरी मुसलमान धर्माचा-प्रमुख महंमद याचा धर्म टाकून देण्याची तो इचदा करील हे सर्वस्वी असंभाव्य आहे. सुलतानाच्या सत्तेच्या वापरातील आंतरिक नियंत्रण हे किमानपक्षी बाह्य मर्यादांइतके प्रबळ आहे. पोपने ही किंवा ती सुधारणा का केली नाही, असा लोक कधीकधी निरर्थक प्रश्न विचारतात. त्याचे खरे उत्तर असे आहे की, 'क्रांतिकारी' हा पोप बनणाऱ्या माणसाच्या प्रकारातील नसतो आणि जो माणूस पोप बनतो त्याला क्रांतिकारी बनण्याची इच्छा नसते.' मला वाटते हे अभिप्राय भारतातील ब्राह्मणांनादेखील तितकेच लागू आहेत. पोप बनणाऱ्या माणसाला जर क्रांतिकारक बनण्याची इच्छा नसेल तर जो माणूस म्हणून जन्माला आला आहे त्याला क्रांतिकारी बनण्याची त्याहूनही कमी इच्छा असेल हे तितकेच खरे आहे. खरोखर, सामाजिक सुधारणेच्या बाबतीत एखादा ब्राह्मण हा क्रांतिकारी होईल अशी अपेक्षा करणे हे लेस्ली स्टीफन यांनी म्हटल्यानुसार ब्रिटिश पार्लमेंट सर्व निळ्या डोळ्यांच्या छोकऱ्यांना ठार करण्यास फर्मावणारा अधिनियम पास करील अशी अपेक्षा करण्यासारखे निरर्थक आहे.

जातीविरुद्ध असलेली चळवळ पुढे नेण्यासाठी ब्राह्मण पुढाकार घेतात की नाहीत, ही बाब फारशी महत्त्वाची नाही, असे तुम्हांपैकी काही जण म्हणतील. हा दृष्टिकोण स्वीकारणे म्हणजे माझ्या मते, समाजातील बुद्धिमान वर्ग पार पाडीत असलेल्या भूमिकेकडे दुर्लक्ष करण्यासारखे आहे. थोर पुरुष इतिहासाचा निर्माता

असतो, हा सिद्धांत तुम्ही मान्य करा अथवा करू नका; परंतु प्रत्येक देशामध्ये बुद्धिमान वर्ग हा राज्यकर्ता वर्ग नसला तरी अत्यंत प्रभावी वर्ग असतो, हे तुम्हाला कबूल करावेच लागेल. बुद्धिमान वर्ग हा असा वर्ग असतो की तो दूरदृष्टीने पाहू शकतो, तो सल्ला देऊ शकतो व नेतृत्व करू शकतो. कोणत्याही देशामध्ये बहुजन समाज हा विचारशील व कृतिशील असे बुद्धिमान जीवन जगत नसतो. तो मोठ्या प्रमाणात अनुकरणप्रिय असतो व बुद्धिमान वर्गाचे अनुसरण करतो. देशाचे संपूर्ण भवितव्य बुद्धिमान वर्गावर अवलंबून असते, असे म्हणण्यात कोणतीही अतिशयोक्ती नाही. बुद्धिमान वर्ग जर प्रामाणिक, स्वतंत्र आणि निःस्वार्थी असेल तर एखादा पेचप्रसंग निर्माण झाला असता त्याने पुढाकार घ्यावा व योग्य नेतृत्व द्यावे म्हणून त्याच्यावर विश्वास ठेवता येऊ शकेल. हे खरे आहे की, बुद्धिमत्ता हा निर्विवाद सद्‌गुण ठरत नाही. बुद्धिमत्ता केवळ एक साधन आहे आणि साधनाचा वापर एखादी बुद्धिमान व्यक्ती ज्यांचा पाठपुरावा करीत असते त्या उद्दिष्टांवर अवलंबून असतो. बुद्धिमान माणूस चांगला माणूस असू शकतो, परंतु तो कधी एखादा भामटाही असू शकतो. त्याचप्रमाणे एखादा बुद्धिमान वर्ग मदत करण्यास सिद्ध असलेला मार्ग चुकलेल्या मानवतेला बंधमुक्त करण्यास सिद्ध असलेला, श्रेष्ठ मनाच्या व्यक्तींचा चमू असेल किंवा तो क्वचित कपटी लोकांची टोळी असेल किंवा त्यांच्यावर अवलंबून राहणाऱ्या एखाद्या कुटाळ कंपूची वकिली करणारा मुखिया असेल. भारतातील बुद्धिमान वर्ग हे ब्राह्मण जातीचे निव्वळ दुसरे नाव आहे, या गोष्टीची तुम्हाला कीव करावीशी वाटेल. हे दोन्हीही (वर्ग) एकच आहेत याचा आणि बुद्धिमान वर्गाच्या अस्तित्वाने देशाच्या हितसंबंधाऐवजी ब्राह्मण जातीचे हितसंबंध व आकांक्षा यांत सहभागी व्हावा याचा तुम्हाला खेद होईल. परंतु हिंदूंमधील बुद्धिमान वर्ग हा ब्राह्मणांचा बनलेला आहे, ही वस्तुस्थिती आहे. तो केवळ बुद्धिमान वर्गच नाही, तर बाकीच्या हिंदूंकडून ज्याला अत्यंत आदर दिला जातो असा तो वर्ग आहे. हिंदूंना अशी शिकवण देण्यात आली आहे. की ब्राह्मण हे भूदेव (पृथ्वीवरील देव) आहेत. वर्णानाम् ब्राह्मणो गुरुः! ब्राह्मण हेच केवळ त्यांचे गुरू होऊ शकतात अशी हिंदूंना शिकवण देण्यात आली आहे. मनू म्हणतो, ''अरे जर विचारण्यात आले की, ज्यांचा विशेष उल्लेख करण्यात आलेला नाही अशा धर्माच्या बाबींसंबंधात काय करावे, तर त्याचे उत्तर असे आहे, 'शिष्ट ब्राह्मण जे प्रतिपादन करतील (तोच धर्म) तेच कायद्याचे बळ होय.''

अनाम्ना तेषु धर्मेषु कथं स्यादिति चेद्‌भवेत् ।
यं शिष्टा ब्राह्मणा ब्रूयुः स धर्मः स्यादशीतिः ।।

ज्याने बाकीचा समाज आपल्या पकडीत ठेवला आहे असा बुद्धिमान वर्ग जेव्हा जातीची सुधारणा करण्यास विरोध करीत असेल तेव्हा जातीव्यवस्था मोडून काढण्याच्या चळवळीमध्ये यशाची शक्यता मला फार फार दूर दिसते.

तुम्ही जर जातीपद्धतीला दोन बाजू आहेत हे ध्यानात घेतले तर हे कार्य अशक्य

आहे, असे मी का म्हणतो त्याचे दुसरे कारण स्पष्ट होईल. जातीपद्धती एका बाजूने माणसांना वेगवेगळ्या समाजांमध्ये विभागले. तिच्या दुसऱ्या बाजूने ती ह्या समाजांना सामाजिक दर्जांमध्ये एकावर एक अशा श्रेणीवार पद्धतीने मांडले. प्रत्येक जात जातींच्या श्रेणीमध्ये आपण दुसऱ्या कुठल्यातरी जातीच्या वर आहोत यातच भूषण व समाधान मानते. या श्रेणीकरणाचे बाह्य चिन्ह म्हणून, अष्टाधिकार व संस्कार म्ळणून तांत्रिकदृष्ट्या संबोधण्यात येणारे सामाजिक व धार्मिक हक्कांचे श्रेणीकरण देखील आहे. जातीची श्रेणी जितकी उच्च तितकी ह्या अधिकारांची संख्या अधिक मोठी आणि खालची श्रेणी असली की अधिकारांची संख्या कमी. असे असल्याने हे जातींचे श्रेणीकरण जातीपद्धतीविरुद्ध सामूहिक आघाडी उभारणे अशक्य करून टाकते. जर एखादी जात तिच्या वर ठेवण्यात आलेल्या दुसऱ्या जातीबरोबर सहभोजन करण्याच्या व आंतरजातीय विवाह करण्याच्या अधिकाराची मागणी करीत असेल तर ती संपवण्यात येते. खोडसाळ लोकांकडून सातत्याने असे सांगितले जाते की, अशा खोडसाळ लोकांमध्ये अनेक ब्राह्मण आहेत. कोणत्याही जातीला तिच्या खाली असलेल्या जातीशी सहभोजन व आंतरजातीय विवाह यांस मान्यता द्यावी लागेल. सर्व (हिंदू) हे जातीपद्धतीचे गुलाम आहेत. परंतु सर्व गुलाम दर्जाने समान नाहीत. आर्थिक क्रांती घडवून आणण्यासाठी कामगार वर्गाला चेतविण्याकरिता कार्ल मार्क्स म्हणाला होता, 'तुम्हाला तुमच्या बेड्यांशिवाय काहीच गमवावे लागणार नाही.' परंतु काहींना अधिक तर काहींना कमी असे वेगवेगळ्या जातींमध्ये सामाजिक व धार्मिक अधिकार अशा कौशल्यपूर्णरीत्या चेतवण्यास अगदी निरुपयोगी ठरते. जाती उच्च व नीच अशा सत्तांची श्रेणीबद्ध पद्धती निर्माण करतात. या सत्ता त्यांच्या दर्जाच्या बाबतीत मत्सरी असतात. त्यांना माहीत असते की, जर सर्वसाधारण संकर घडला, तर त्यांच्यापैकी काही जातींना इतर जातींपेक्षा स्वतःची प्रतिष्ठा व सत्ता अधिक गमवावी लागेल. त्यामुळे सैनिकी शब्द वापरायचे झाल्यास, जातीपद्धतीवर हल्ला करण्यासाठी तुम्ही हिंदूंमध्ये सामुदायिक उठाव करू शकत नाही.

## २२.

जात ही तर्कबुद्धीच्या विरोधी असल्यामुळे तर्कबुद्धीला आवाहन करून हिंदूंना तिचा त्याग करण्यास तुम्ही सांगू शकता काय? यातून असा प्रश्न निर्माण होतो : हिंदू त्याच्या तर्कबुद्धीनुसार चालण्यास मुक्त आहे काय? प्रत्येक हिंदूने आपल्या वर्तणुकीच्या बाबतीत ज्यांच्याशी जुळवून घेतले पाहिजे अशा तीन आज्ञा मनूने मांडलेल्या आहेत. वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः। येथे तर्कबुद्धीला कसलाही वाव नाही. हिंदूने वेद, स्मृती किंवा सदाचार यांपैकी एकाचे अनुसरण केलेच पाहिजे. तो अन्य कशाचेही अनुसरण करू शकत नाही. पहिली गोष्ट, वेद व स्मृती यांच्या संहितांच्या

अर्थाबाबत जेव्हा कधी एखादी शंका निर्माण होते तेव्हा त्यांचा कशा प्रकारे अर्थ काढण्यात येतो? या महत्त्वाच्या प्रश्नावरील मनूचा दृष्टिकोण अगदी स्पष्ट आहे. तो म्हणतो :

योऽवमन्येत ते मूले हेतुशास्त्राश्रयात् द्विजः।
स साधुभिर्बहिष्कार्यो नास्तिको वदनिन्दकः ॥

हाच नियम महाभारतामध्ये मांडण्यात आला आहे–

पुराणं मानवो धर्मः सांगो वेदश्चिकित्सितं।
आज्ञासिद्धानि चत्वारि न हन्तव्यानि हेतुभिः ॥

या नियमानुसार वेद व स्मृतींचा अर्थ लावण्याचे एक साधन म्हणून बुद्धिवादाचा पूर्णपणे धिक्कार करण्यात आला आहे. ती गोष्ट नास्तिकवादाइतकीच त्याज्य मानण्यात आली आहे आणि तिला दिलेली शिक्षा बहिष्काराची आहे. अशा प्रकारे एखादी बाब वेद किंवा स्मृतींच्या अखत्यारीत येत असेल तेथे हिंदू बुद्धिवादी विचारसरणीचा आश्रय घेऊ शकत नाही. ज्या बाबींवर वेद व स्मृती यांनी स्पष्ट आज्ञा दिल्या आहेत त्या बाबींवर वेद व स्मृतींमध्ये विरोध असला तरी, त्याचे उत्तर तर्कबुद्धीवर सोडून दिलेले नाही. जेव्हा दोन स्मृतींमध्ये विरोध असेल तेव्हा दोहोंनाही समान प्रमाण मानावे लागेल. दोहोंपैकी कोणत्याही एकीचे अनुसरण करता येईल. त्या दोहोंपैकी कोणती स्मृती तर्कबुद्धीशी सुसंगत आहे, हे शोधण्याचा प्रयत्नही करण्यात येणार नाही. ही गोष्ट मनूने स्पष्ट केली आहे :

श्रुतिद्वैधं तु यत्र स्यात्तत्र धर्मावुभौ स्मृतौ।

श्रुती व स्मृतीमध्यें विरोध असेल तेव्हा श्रुतींना मान मिळाला पाहिजे. पण येथे देखील त्या दोहोंपैकी कोणती तर्कबुद्धीशी सुसंगत आहे हे शोधण्याचा प्रयत्न होता कामा नये. ही गोष्ट मनूने पुढील श्लोकात मांडली आहे–

या वेदबाह्याः स्मृतयो याश्च काश्च कुदृष्टयः।
सर्वास्ता निष्फलाः प्रेत्य तमोनिष्ठा हि ताः स्मृताः ॥

तसेच जेव्हा कधी दोन स्मृतींमध्ये विरोध असेल तेव्हा मनुस्मृतीला मान दिला पाहिजे, परंतु या दोहोंपैकी कोणती तर्कबुद्धीशी सुसंगत आहे हे शोधण्याचा प्रयत्न होता कामा नये. हाच नियम बृहस्पतीने केला आहे–

वेदार्थत्वोपनिबंधृत्वात् प्रामाण्यं हि मनोः स्मृतं।
मन्वर्थविपरीता तु या स्मृतिः सा न शस्यते ॥

त्यामुळे हे स्पष्ट आहे की, ज्यावर श्रुतींनी व स्मृतींनी आज्ञा दिल्या आहेत अशा कोणत्याही बाबतीत, हिंदू त्याची तर्कशक्ती वापरण्यास मोकळा नाही.

त्याने त्यांच्या आज्ञांचे पालन केलेच पाहिजे. वेदांनी आणि स्मृतींनी जात आणि वर्ग या विषयांचा परामर्श घेतलेला आहे, असे असता तर्कबुद्धीला आवाहन करण्याचा हिंदूंवर काहीही परिणाम होणार नाही. जिथपर्यंत जात व वर्ण यांचा संबंध

पोहोचतो तिथपर्यंत या प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी हिंदूने स्वतःची तर्कबुद्धी वापरायला वेद व स्मृती परवानगी देणार नाहीत. एवढेच नाही, तर जात व वर्ण यांमध्ये असलेल्या त्यांच्या श्रद्धेचा पाया बुद्धिवादी मार्गाने तपासण्यास कोणतीही संधी राहू नये, हे पाहण्याची त्यांनी काळजी घेतलेली आहे. रेल्वे प्रवास व परदेशपर्यटन यांसारख्या काही प्रसंगी शेकडो, हजारो हिंदू जात मोडत आहेत आणि तरीही त्यांच्या उर्वरित आयुष्यात ते जात टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करीत आहेत, हे पाहून अनेक बिगरहिंदूंना तो गप्प राहून पाहण्याचा एक करमणुकीचा विषय झाला आहे. ही परिस्थिती पाहता हिंदूंच्या तर्कबुद्धीच्या सामर्थ्यावरील दुसरे एक बंधन उघड होते.

माणसाचे सामान्य जीवन हे सवयींनी घडलेले व इतरांचा त्यावर प्रभाव पडू देण्यास फारसे उत्सुक नसलेले असे असते. क्रियाशील, टिकाऊ आणि सावधपणे केलेला, निष्कर्षाप्रत नेणारा विचार या अर्थाने चिंतनशील विचार हा अगदी दुर्मिळ आहे, आणि तो जणू एक शृंगापत्ती-एक निर्वाणीचा क्षण-निर्माण करणाऱ्या परिस्थितीतच उगम पावतो.

रेल्वे प्रवास व परदेशपर्यटन (देशाटन) हे एखाद्या हिंदूंच्या जीवनातील खरोखरीचे पेचप्रसंग असतात. आपण जर सर्व काळ जात पाळूच शकत नाही तर मग जात पाळावीच का, असा हिंदूने स्वतःला प्रश्न विचारावा, अशी एखाद्या हिंदूकडून अपेक्षा करणे स्वाभाविक आहे. परंतु तो स्वतःला तसा प्रश्न विचारीत नाही. तो एका पावलावर जात मोडतो व त्याच्याच पुढच्या पावलावर कोणताही प्रश्न उपस्थित न करता तिचे पालन करण्यासाठी पुढे सरसावतो. ह्या अत्यंत आश्चर्यकारक वर्तणुकीचे कारण शास्त्रांच्या नियमांमध्ये दिसून येते. ती शास्त्रे त्याला शक्य तितके जातीचे पालन करण्याची व तो तसे पालन करू शकत नसेल तेव्हा प्रायश्चित्त घेण्याची मुभा देतात. या प्रायश्चित्ताच्या सिद्धांताद्वारे ही तडजोडीची भावना अनुसरून शास्त्रांनी जातीला जीवनात सक्रिय भाग घेण्याची संधी दिली आहे आणि ज्याने अन्यथा जातीची कल्पना नष्ट करण्याकडे नेले असते तो चिंतनशील विचार दाबून टाकलेला आहे.

जात व अस्पृश्यता नष्ट करण्याचे कार्य अनेकांनी केले आहे. त्यांपैकी ज्यांचा उल्लेख करता येऊ शकेल ते म्हणजे रामानुज, कबीर इत्यादी अग्रगण्य आहेत. ह्या सुधारकांच्या कृतींचा गौरव करून त्यांना अनुसरण्यास तुम्ही हिंदूंना आग्रहाने विनवू शकता काय? मनूने श्रुती व स्मृती यांच्याबरोबर एक आज्ञा म्हणून सदाचाराचा समावेश केलेला आहे, हे खरे आहे. सदाचाराला शास्त्रांपेक्षाही उच्च स्थान देण्यात आलेले आहे.

यद्दाचर्यते येन धर्म्यं वाऽधर्म्यमेव वा।
देशस्याचरणं नित्यं चरित्रं तद्धिकीर्तितम्॥

यानुसार, सदाचार मग तो धर्म्य असो अगर अधर्म्य असो, तो शास्त्राच्या अनुसार असो अगर शास्त्राच्या विरोधी असो, त्याचे पालन केले पाहिजे. परंतु सदाचाराचा अर्थ काय आहे? जर कोणी सदाचाराचा अर्थ योग्य कृत्ये किंवा सत्कृत्ये म्हणजे सद्गृहस्थाची व न्यायी गृहस्थाची कृत्ये असा घेतला तर ती मोठी चूक केल्याचे त्याला स्वत:लाच कळून येईल. सदाचाराचा अर्थ सत्कृत्ये किंवा सद्गृहस्थाची कृत्ये असा होत नाही. सदाचर म्हणजे प्राचीन चालरीत, मग ती चांगली असो वा वाईट. पुढील श्लोकावरून ही गोष्ट स्पष्ट होते-

यस्मिन् देशे य आचारः पारंपर्यक्रमागतः ।
वर्णानां किल सर्वेषां स सदाचार उच्यते ॥

जणू काही सदाचार याचा अर्थ सत्कृत्ये अथवा सद्गृहस्थाची कृत्ये या दृष्टिकोणाविरुद्ध लोकांना ताकीद देण्यासाठी आणि त्याप्रकारे लोक तो अर्थ समजून घेतील व सद्गृहस्थांची कृत्ये अनुसरतील या भीतीने स्मृतींनी हिंदूंना नि:संदिग्ध शब्दांत आज्ञा केली आहे की, देव जर श्रुती, स्मृती व सदाचार याविरोधी असतील तर त्यांची सत्कृत्येदेखील अनुसरू नयेत. ही अत्यंत विचित्र, अत्यंत वाईट गोष्ट वाटेल. परंतु 'न देवचरितं चरेत्' ही हिंदूंना त्यांच्या शास्त्रांनी दिलेली धर्माज्ञा आहे, ही वस्तुस्थिती आहे. तर्क आणि नीती ही सुधारकाच्या शस्त्रागारातील दोन अत्यंत जबरदस्त हत्यारे आहेत. ह्या हत्यारांचा वापर त्याच्यापासून हिरावून घेणे म्हणजे त्याला कृतीसाठी असमर्थ बनविणे होय. जात ही तर्कबुद्धीशी सुसंगत आहे की नाही याचा विचार करण्यास लोक जर मुक्त नसतील तर तुम्ही जात कशी काय मोडणार? जातीभोवती बांधलेली भिंत अभेद्य आहे व ती ज्या मालापासून बांधली आहे त्या मालात तर्कबुद्धी व नीती यांचा कसलाच ज्यालाग्राही पदार्थ अंतर्भूत नाही. यात भर म्हणजे या भिंतीच्या आतील बाजूस ब्राह्मणांचे सैन्य उभे आहे. त्याचा बुद्धिवादी वर्ग बनला आहे. ते तेथे असले हिंदूंचे निसर्गदत्त अग्रणी ब्राह्मण निव्वळ भाडोत्री सैनिक म्हणून नाहीत, तर ते आपल्या मायदेशासाठी लढणारे सैन्य म्हणून आहेत. हिंदूंमधील जाती मोडून काढणे हे सर्वथा अशक्य ओ असे मला का वाटते, याची यावरून तुम्हाला कल्पना येईल. काही झाले तरी शास्त्राज्ञेचा भंग करण्यासाठी मने तयार करण्यात काही शकते जातील. परंतु हे कृत्य करण्यात कितीही वेळ जावो, तुम्ही हे विसरता कामा नये की, तुम्हाला जर या पद्धतीमध्ये (शास्त्राज्ञेचा) भंग घडवून आणण्याची इच्छा असेल तर तुम्हाला जे वेद व जी शास्त्रे तर्कबुद्धी अजिबात नाकारतात त्या वेदांना व शास्त्रांना सुरुंग लावला पाहिजे. तुम्ही श्रुती व स्मृती यांचा धर्म नष्ट केला पाहिजे. इतर कशाचाही उपयोग होणार नाही. या बाबतीत माझे हे विचारांती बनलेले मत आहे.

## २३.

धर्माचा नाश याचा मी काय अर्थ घेतो हे काहींना समजणार नाही; काहींना ही कल्पना बंडखोर वाटेल तर काहींना ती क्रांतिकारी वाटेल. त्यामुळे मला माझी भूमिका स्पष्ट केली पाहिजे. तुम्ही तत्त्वे व नियम यांमध्ये फरक करता की नाही हे मला माहीत नाही, परंतु मी फरक करतो. मी केवळ फरकच करत नाही तर मी हा खराखुरा व महत्त्वाचा फरक आहे असे म्हणतो. नियम हे व्यवहार्य असतात. योजनेनुसार गोष्टी करण्याचे ते सवयीचे नेहमीचे मार्ग आहेत. परंतु तत्त्वे ही बौद्धिक असतात, ती न्यायनिवाडा करण्याच्या उपयुक्त पद्धती आहेत. नियम हे व्यक्तीने कोणती कार्यप्रणाली अनुसरावी हे सांगण्यासाठी केवळ प्रयत्न करतात. तत्त्वे विशिष्ट कार्यप्रणाली विहित करीत नाहीत. नियम हे पाककृतीप्रमाणे केवळ काय करावे व ते कसे करावे ते सांगतात. तत्त्वे न्यायाप्रमाणे, ज्या संदर्भाने माणसाने आपल्या इच्छांच्या व प्रयोजनांच्या संबंधांचा विचार करावा त्या संदर्भाचे मुख्य स्रोत पुरवतात, त्याने आपल्या मनात कोणता महत्त्वाचा विचार बाळगावा हे सुचवून त्याच्या विचार करण्याच्या कार्यात त्याला मार्गदर्शन करतात. नियमांमधील व तत्त्वांमधील ह्या फरकामुळे त्यांना अनुसरून केलेली कृत्ये गुणांमध्ये व आशयांमध्ये वेगवेगळी बनतात. नियमानुसार ज्याला चांगले म्हणतात ते करणे आणि तत्त्वाच्या दृष्टीने चांगले करणे या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. तत्त्व चूक असू शकेल, परंतु त्यानुसार केलेली कृती ही जाणीवपूर्वक केलेली कृती व जबाबदार कृती असते. नियम योग्य असू शकेल, परंतु त्यानुसार केलेली कृती ही यांत्रिक कृती असते. धार्मिक कृती अचूक कृती नसेलही, परंतु किमान ती जबाबदार कृती असलीच पाहिजे. ह्या जबाबदारीला अनुज्ञा देण्यासाठी, धर्म ही मुख्यत्वे केवळ तत्त्वांची बाब असली पाहिजे, ती नियमांची बाब असता कामा नये. ज्याक्षणी धर्म नियमांमध्ये बुडून जातो त्याक्षणी तो धर्म असण्याचे थांबतो. कारण खऱ्याखुऱ्या धार्मिक कृत्याचे सार असलेली जबाबदारी तो नष्ट करतो. हा हिंदू धर्म काय आहे? तो तत्त्वांचा समुच्चय आहे की तो नियमांची संहिता आहे? वेद आणि स्मृतींमध्ये सांगितल्याप्रमाणे यज्ञविषयक, सामाजिक, राजकीय व शुद्धीविषयक नियमांची ती एक गोळाबेरीज आहे. हिंदुद्वारे संबोधण्यात येणारा धर्म हा अन्य काही नसून तो आदेश व निषेधाज्ञा यांचे भरताड आहे. आध्यात्मिक तत्त्वे या अर्थाने खरोखर वैश्विक असलेला, सर्व वंशांना, सर्व देशांना, सर्व काळाला लागू होण्याजोगा असा धर्म त्यांच्यात (हिंदूंत) दिसून येत नाही. तो असला तरी तो हिंदूंच्या जीवनात नियामक भाग बनत नाही. त्यामुळे वेदांमध्ये व स्मृतींमध्ये ज्याप्रकारे धर्म शब्द वापरलेला आहे आणि भाष्यकारांनी ज्याप्रकारे धर्माचा अर्थ घेतला आहे त्यावरून हे स्पष्ट होते की हिंदूंसाठी धर्म याचा अर्थ आज्ञा व निषेधाज्ञा हाच आहे.

वेदांमध्ये अनेक ठिकाणी धर्म हा शब्द वापरला आहे तो धार्मिक आज्ञा किंवा विधी या अर्थाने वापरलेला आहे. जैमिनीदेखील त्याच्या पूर्वमीमांसेमध्ये धर्माची

व्याख्या आज्ञाकारी (वैदिक) उताऱ्यांमध्ये दर्शविलेले इष्ट ध्येय अथवा परिणाम अशी देतो. स्पष्ट शब्दांत सांगावयाचे म्हणजे, हिंदू ज्याला धर्म म्हणतात तो खरोखर कायदा अथवा कायद्याचे स्वरूप दिलेली वर्ग-नीती होय. अर्थातच, मी या आज्ञांच्या संहितेला धर्म म्हणण्यास नकार देतो. लोकांच्या समोर धर्म म्हणून विपर्यस्तपणे मांडण्यात आलेल्या अशा आज्ञांच्या संहितेचे पहिले दुष्कर्म म्हणजे अशा आज्ञांच्या संहितेचा स्वातंत्र्याच्या व स्वाभाविकतेच्या नैतिक जीवनाचा नाश घडवून आणण्याकडे आणि त्या नैतिक जीवनाला बाहेरून लादलेल्या नियमांशी जुळवून घेतलेल्या व वाटेल ते झाले तरी तरी विवेकी व्यक्तींसाठी जवळजवळ उद्वेगजनक व गुलामासमान असलेल्या परिस्थितीत लोटण्याकडे कल असतो. तिच्यात आदर्शाशी एकनिष्ठता नसते, तेथे केवळ आदेशांशी तडजोड असते. परंतु तिच्यात समाविष्ट असलेले कायदे हे काल जसे होते तसेच आज व पुढेही कायमचेच असले पाहिजेत ही गोष्ट या आज्ञांच्या संहितेचा सर्वात मोठा दुर्गुण आहे. ते कायदे विषम आहेत. कारण ते जसे एका वर्गाला लागू आहेत तसे दुसऱ्या वर्गाला लागू नाहीत. परंतु ही विषमता कायम करण्यात आली आहे, कारण ते सर्व पिढ्यांसाठी तसेच तसे ठरवून देण्यात आलेले आहेत. अशा योजनेचा आक्षेपार्ह भाग, ते प्रेषित अथवा विधिदाता म्हणून संबोधण्यात आलेल्या विशिष्ट व्यक्तींनी तयार केले आहेत, हा नाही. आक्षेपार्ह भाग हा आहे की, ही संहिता अंतिम व कायम रूपात मांडण्यात आली आहे. व्यक्तीच्या स्थिती व परिस्थितीनुसार, त्यंचप्रमाणे वेगवेगळ्या लोकांच्या गरजानुसार व काळानुसार सुखाची कल्पना बदलत असते हे कुविख्यात आहे. अशी परिस्थिती असल्याने, मानवता वेडीवाकडी होऊन लुळी पडल्याशिवाय या शाश्वत कायद्यांची संहिता कशी काय टिकून राहू शकेल? त्यामुळे मला सांगायला मुळीच संकोच वाटत नाही की, असा धर्म नष्ट केलाच पाहिजे व मी म्हणतो, असा धर्म नष्ट करण्यासाठी केलेली कोणतीही कृती अधार्मिक नाही. खरोखर माझी अशी धारणा आहे की, धर्म म्हणून या कायद्याला चुकीचे नाव दिले गेले असल्यामुळे निर्माण झालेल्या विपर्यासाला दूर करणे, त्याचा बुरखा फाडणे हे तुमचे अंगीकृत कर्तव्य आहे. हे पाऊल तुम्ही अवश्य उचलले पाहिजे. तुम्ही या चुकीच्या कल्पनेपासून एकदा का लोकांची मने स्वच्छ केली आणि ते ज्याला धर्म म्हणतात तो धर्म नसून तो खरोखर कायदा आहे हे ओळखायला त्यांना समर्थ केले तर तुम्ही सुधारणेसाठी अथवा धर्माच्या निरासासाठी लोकांना उद्युक्त करण्याच्या स्थितीत याल. जोपर्यंत लोक त्याच्याकडे धर्म म्हणून पाहत आहेत तोपर्यंत ते बदलास तयार होणार नाहीत. कारण सर्वसाधारणपणे सांगायचे तर धर्माची कल्पना ही बदलाच्या कल्पनेशी संबद्ध नसते. परंतु कायद्याची कल्पना ही बदलाच्या कल्पनेशी जोडलेली असते. आणि लोक ज्याला धर्म म्हणतात तो खरोखर जुना व प्राचीन कायदा आहे असे जेव्हा ते जाणतील तेव्हाच ते बदलास तयार होतील, कारण कायदा बदलू शकाते ही गोष्ट लोक जाणतात व मान्य करतात.

## २४.

मी नियमबद्ध धर्माचा निषेध करतो याचा अर्थ धर्माची आवश्यकता नाही असे माझे मत आहे असे समजू नये. उलटपक्षी, मी बर्कच्या म्हणण्याशी सहमत आहे. तो म्हणतो की, 'खरा धर्म हा समाजाचा पाया आहे. ज्यावर सर्व नागरी शासन आणि त्याची मान्यता या गोष्टी आधारलेल्या असतात, असा तो आधार आहे.' अखेरीस मी जेव्हा हे जीवनविषयक प्राचीन नियम नष्टमूल करावेत असे आवाहन करतो तेव्हा त्याची जागा तत्त्वांच्या धर्माने घेतल्याचे पाहण्यास मी उत्सुक आहे. त्यालाच फक्त खरा धर्म म्हणून हक्क सांगता येऊ शकेल. खरोखर धर्माच्या आवश्यकतेबाबत माझी अशी खात्री झाली आहे की, ह्या धार्मिक सुधारणेमध्ये मला कोणत्या बाबी आवश्यक वाटतात ते तुम्हाला मी सांगायलाच हवे. माझ्या मते या सुधारणेमध्ये पुढील मुख्य बाबी असाव्यात-

१) सर्व हिंदूंना स्वीकारार्ह असलेला आणि सर्व हिंदूंनी मान्यता दिलेला एकच एक प्रमाणग्रंथ असावा. अर्थातच पवित्र व प्रमाण म्हणून मानण्यात येणारे वेद, शास्त्रे व पुराणे यांसारखे हिंदू धर्माचे इतर सर्व ग्रंथ कायद्याने बंद झाले पाहिजेत आणि या ग्रंथांमध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही धार्मिक वा सामाजिक धर्मतत्त्वांचा प्रचार केल्यास शिक्षा करण्यात यावी.

२) हिंदूंमधील पुरोहितशाही नष्ट केली तर उत्तमच. परंतु हे अशक्य वाटत असल्याने, कमीत कमी वारसाहक्काची पुरोहितशाही तरी बंद व्हावी. हिंदू म्हणून अनुष्ठान करणारी प्रत्येक व्यक्ती पुरोहित बनण्यास पात्र असली पाहिजे. राज्याने विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण झाल्याखेरीज व पुरोहिताचा धंदा करण्याची परवानगी देणारी सनद राज्याकडून मिळाल्याखेरीज कोणीही हिंदू हा पुरोहित असल्यास पात्र असणार नाही, अशी कायद्याने तरतूद करण्यात यावी.

३) ज्याच्याकडे सनद नसेल तो पुरोहित कोणताही समारंभ करू शकणार नाही, ही गोष्ट कायद्यात विधिग्राह्य मानण्यात यावी, आणि सनद नसलेल्या व्यक्तीने पुरोहित म्हणून अनुष्ठान केल्यास त्या व्यक्तीला शिक्षा करण्यात यावी.

४) पुरोहित हा राज्याचा नोकर असावा आणि देशातील इतर नागरिकांप्रमाणे सर्वसाधारण कायद्याच्या अधीन असण्याबरोबरच तो त्याच्या नीतिकल्पना, श्रद्धा व उपासना या बाबतीत राज्याच्या शिस्तभंगाच्या कारवाईच्याही अधीन असावा.

५) आय. सी. एस. च्या बाबतीत जसे केले जाते त्याप्रमाणे राज्याच्या गरजांनुसार पुरोहितांची संख्या मर्यादित असावी. काहींना ही गोष्ट अत्यंत पुरोगामी वाटेल. परंतु माझ्या मते यात फारसे काही पुरोगामी नाही. भारतातील प्रत्येक व्यवसाय हा विनियमित आहे. आपापला व्यवसाय सुरू करण्यापूर्वी अभियंत्याने त्याचे प्राविण्य दाखवीलेच पाहिजे, डॉक्टरने आपले प्राविण्य दाखवलेच पाहिजे, वकिलाने आपले

प्राविण्य दाखवलेच पाहिजे. त्यांच्या संपूर्ण कारकीर्दीच्या कालावधीत त्यांनी देशातील नागरी त्याचप्रमाणे फौजदारी कायद्याचेच केवळ पालन करता कामा नये, तर त्यांनी त्यांच्या संबंधित व्यवसायांनी विहित केलेल्या नीतीच्या विशेष संहितेचेदेखील पालन केले पाहिजे. जेथे प्राविण्याची गरज नाही, असा पुरोहितशाही हा एकमेव व्यवसाय आहे. हिंदू पुरोहिताचा व्यवसाय हा कोणत्याही कायद्याच्या अधीन नसलेला एकमेव व्यवसाय आहे. मानसिकदृष्ट्या एखादा पुरोहित मूर्ख असेल, शारीरिकदृष्ट्या एखादा पुरोहित उपदेश किंवा गरमी यांसारख्या किळसवाण्या रोगांनी आजारी असेल, नैतिकदृष्ट्या तो अधोगतीला गेलेला असेल, तरीही तो विधियुक्त गांभीर्याने पार पाडल्या जाणाऱ्या समारंभात अनुष्ठान करण्यास, हिंदू देवळांच्या पवित्र गाभाऱ्यात प्रवेश करण्यास आणि हिंदू देवाची उपासना करण्यास पात्र असतो.

हिंदूंमध्ये हे सर्व शक्य होते त्याचे कारण पुरोहिताच्या कामासाठी केवळ पुरोहिताच्या जातीत जन्माला येणे पुरेसे आहे. हे सर्वच निंद्य आहे. आणि त्याचे कारण हिंदूंमधील पुरोहित वर्ग, कायद्याच्या किंवा नीतीच्या अधीन नाही ही वस्तुस्थिती
हिंदूंमधील पुरोहित वर्ग, कायद्याच्या किंवा नीतीच्या अधीन नाही ही वस्तुस्थिती
आहे. तो कसलीही कर्तव्ये जाणत नाही. त्याला फक्त हक्क व विशेषाधिकार माहीत आहेत. नियतीने बहुजन समाजात त्यांच्या मानसिक व नैतिक अध:पतनासाठी सोडलेली ती एक कीड आहे, असे मला वाटते. मी वर उल्लेख केल्याप्रमाणे पुरोहित वर्ग हा अशा काही विधिविधानांच्या नियंत्रणाखाली आणला पाहिजे. ते नियंत्रण नैतिक अपाय करण्यापासून व लोकांची दिशाभूल करण्यापासून त्याला प्रतिबंध करील. ते (विधिविधान) तो व्यवसाय प्रत्येकासाठी खुला करून त्याचे लोकशाहीकरण करील. ते (विधिविधान) निश्चितच ब्राह्मणवाद ठार करण्यास मदत करील आणि ब्राह्मणवादाचा अवतार जी जात ती ठार करण्यासदेखील मदत करील.

ब्राह्मणवाद हे विष असून त्याने हिंदू धर्म बिघडवून टाकला आहे. तुम्ही जर ब्राह्मणवादाला ठार केले तरच तुम्ही हिंदू धर्म वाचवण्यात यशस्वी व्हाल. या सुधारणेला कोणत्याही स्तरातून कसलाही विरोध असू नये. तिचे आर्य समाजाच्या लोकांनी देखील स्वागत केले पाहिजे. कारण हे केवळ त्यांची स्वत:ची तत्त्वे गुणकर्मसिद्धांताला लागू करणेच आहे. तुम्ही तसे केले काय किंवा न केले काय, तुम्ही तुमच्या धर्माला नवीन तात्त्विक आधार दिलाच पाहिजे-तो आधार स्वातंत्र्य, समता व बंधुता यांच्याशी, थोडक्यात लोकशाहीशी, अनुरूप असेल. मी या विषयावरील अधिकारी पुरुष नाही. परंतु मला असे सांगण्यात आले की स्वातंत्र्य, समता व बंधुतेशी अनुरूप अशा धर्मतत्त्वासाठी बाहेरच्या मार्गांनी उसनवारी करण्याची आवश्यकता नसून ती तत्त्वे तुम्ही उपनिषदांतून काढू शकाल. त्यात अंतर्भूत असलेल्या गाभ्याचे पूर्णपणे पुनर्घटन न करता, बराचसा नको असलेला भाग व ढलपे न काढता तुम्ही तसे करू शकता किंवा कसे हे मी सांगण्याची गरज नाही. ब्राह्मणवादाला ठार

करणे याचा अर्थ जीवनाच्या मूलभूत कल्पनांमधील संपूर्ण परिवर्तन म्हणजे माणसांच्या व वस्तूंच्या बाबतच्या दृष्टिकोणात व मनोवृत्तीत संपूर्ण म्हणजे परिवर्तन धर्मांतर. परंतु तुम्हाला जर तो शब्द आवडत नसेल तर मी त्याचा अर्थ नवजीवन आहे, असे म्हणेन. परंतु नवजीवन मृत शरीरात प्रविष्ट होऊ शकत नाही. नवजीवन हे केवळ नवीन शरीरातच प्रविष्ट होऊ शकते. नवीन शरीर अस्तित्वात येणापूर्वी व त्यात नवजीवन प्रविष्ट होण्यापूर्वी जुने शरीर नष्ट झालेच पाहिजे. हेच साध्या शब्दात सांगायचे तर, नवीन चैतन्य उत्पन्न करण्यासाठी आणि हृदयाची कंपने सुरू होऊ लागण्यापूर्वी जुने सर्व कार्यप्रवण असण्याचे थांबेलच पाहिजे. मी जेव्हा शास्त्रांचा अधिकार टाकून दिला पाहिजे आणि शास्त्रांचा धर्म नष्ट केला पाहिजे असे म्हणालो तेव्हा मला हेच अभिप्रेत होते.

## २५.

मी तुम्हाला बराच वेळ तिष्ठत ठेवले. आता मी हे भाषण संपविले पाहिजे, अशी ही वेळ आहे. भाषण थांबवणे ही गोष्ट माझ्यासाठी सोयीस्कर ठरली असती. परंतु हिंदूंशी अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध असलेल्या विषयावरील, हिंदू श्रोत्यांपुढील माझे हे बहुधा शेवशटचेच भाषण असेल. त्यामुळे हे भाषण संपवण्यापूर्वी मला जे अत्यंत महत्त्वाचे वाटतात असे काही प्रश्न मी हिंदूंसमोर, त्यांनी मुभा दिली तर, मांडावेत व त्यांना त्यावर गंभीरपणे विचार करण्यास आवाहन करावे, असे मला वाटते.

पहिली गोष्ट, जगातील वेगवेगळ्या लोकांमध्ये दिसून येणाऱ्या श्रद्धा, सवयी, नीतितत्त्वे व जीवनविषयक दृष्टिकोण नेहमी भिन्न असतात. याव्यतिरिक्त त्यांच्याबद्दल सांगण्यासारखे काहीही नाही, हा मानववंशशास्त्रज्ञांचा दृष्टिकोण स्वीकारणे पुरेसे आहे की नाही, अथवा कोणत्या प्रकारची नीतिमत्ता, श्रद्धा, सवयी व दृष्टीकोण उत्तम असल्याचे दिसून आले आणि ते ज्यांच्याजवळ होते त्यांची भरभराट करण्यास, त्यांना प्रबळ करण्यास, पृथ्वीवर वस्ती करण्यास आणि तिच्यावर आपले अधिराज्य प्रस्थापित करण्यास त्यांना कसे समर्थ केले, हे शोधून काढण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे की नाही याचा हिंदूंनी विचार केला पाहिजे. प्रा. कार्व्हर यांच्या मतानुसार 'नैतिक मान्यता व अमान्यता यांच्या एकत्रित अभिव्यक्तीनुसार नीती व धर्म ह्या गोष्टी, दात व पंजे, शिंगे व खूर, लोकर व पिसे यांसारख्या आक्रमण व संरक्षण यांसाठी असलेल्या हत्यारांसारख्याच खरोखर अस्तित्वाच्या लढ्यातील घटक मानल्या पाहिजेत. जो सामाजिक गट, जो समाज, जी टोळी किंवा जे राष्ट्र नीतिमत्तेची अव्यवहार्य योजना राबवते किंवा ज्या स्वत: टिकून राहण्यासाठी त्यास कमजोर व अपात्र बनवतात त्या सामाजिक कृती साहजिकपणे मान्यतेची भावना उत्पन्न करतात, तर (ज्या सामाजिक कृती) त्यास बलशाली करतात व त्यास विस्तार पावण्यास सक्षम करतात (त्या सामाजिक कृती) अमान्यतेची भावना उत्पन्न करतात, तो सामाजिक गट, तो समाज,

ती टोळी किंवा ते राष्ट्र अखेरीस लयाला जाईल. मान्यता किंवा अमान्यतेच्या (धर्म व नीतीचा परिणाम असलेल्या ह्या) सवयी, ज्यास दोन पंख एका बाजूस आहेत व दुसऱ्या बाजूस एकही (पंख) नाही अशी अवस्था असलेल्या मधमाशांच्या पोळ्याप्रमाणे, (या सवयी) त्यांस हानिप्रद आहेत. एक पद्धती दुसऱ्या पद्धती इतकीच चांगली असते असा युक्तिवाद करणे हे जसे निरर्थक ठरेल, अगदी तसेच ते अन्य बाबतीतही निरर्थक ठरेल.' यामुळे नीती व धर्म या केवळ पसंतीच्या वा नापसंतीच्या गोष्टी नाहीत. ती नीतीची योजना एखाद्या राष्ट्रांतर्गत प्रचलित करण्यात आल्यास ते राष्ट्र पृथ्वीच्या पाठीवरील सर्वांत प्रबळ राष्ट्र होईल जी नीतीची योजना तुम्हाला कदाचित अत्यंत नापसंतही असेल. परंतु तुमची नापसंती असली तरी ते राष्ट्र प्रबळ होईल. जी नीतीची योजना व जो न्यायाचा आदर्श राष्ट्रांतर्गत सार्वत्रिकरीत्या प्रचलित करण्यास आल्यास ते राष्ट्र इतर राष्ट्रांशी झालेल्या लढ्यात टिकाव धरून राहू शकणार नाही, ती नीतीची योजना व तो न्यायाचा आदर्श कदाचित तुम्हाला अत्यंत पसंतही असेल, परंतु तुमची पसंती असूनदेखील राष्ट्र अखेरीस लयास जाईल. त्यामुळे हिंदूंनी त्यांचा धर्म व नीती कोणत्या मूल्यांवर टिकून राहिली आहे, याची तपासणी केली पाहिजे.

दुसरी गोष्ट, हिंदूंनी त्यांचा संपूर्ण सामाजिक वारसा जतन करून ठेवावा की उपयोगी असेल तेवढाच वारसा भावी पिढ्यांकडे सोपवावा याचा विचार केला पाहिजे. मी ज्यांचा अत्यंत ऋणी आहे ते माझे शिक्षक प्रा. जॉन ड्युई यांनी म्हटले होते–

'भूतकालीन, कालबाह्य आधार असलेल्या नि ज्या उघड उघड भ्रष्ट आहेत अशा क्षुल्लक गोष्टी प्रत्येक समाजावर लादल्या गेलेल्या असतात. जसजसे समाजाचे अधिकाधिक प्रबोधन होत जाते तसतशी त्याला जाणीव येत जाते की, त्याच्या विद्यमान साधनांपैकी सर्वच्या सर्व साधने जतन करून ती पुढच्या पिढीला सोपवण्यास तो जबाबदार नसतो, तर तो केवळ जी अधिक चांगली आहेत तेवढीच साधने जतन करून ती भावी समाजाकडे सोपवण्यास जबाबदार असतो.' फ्रेंच क्रांतीत अंतर्भूत असलेल्या परिवर्तनाच्या तत्त्वांला जोरदार विरोध करणाऱ्या बर्कलादेखील हे मान्य करावे लागले की, 'जो देश परिवर्तनाच्या साधनांशिवाय असतो, तो देश त्याचे स्वतःचे जतन करणाऱ्या साधनांशिवाय असतो. त्याने जतन करू इच्छिलेल्या संविधानाचा तो भाग, जो त्याने अत्यंत धार्मिकदृष्ट्या जतन करावयाचे ठरवले असेल, अशी साधने नसतील तर तो गमावून बसेल.' बर्कने जे देशाबद्दल म्हटले ते समाजालाही तितकेच लागू आहे.

तिसरी गोष्ट, हिंदूंनी त्यांना त्यांच्या आदर्शाचा पुरवठा करणाऱ्या भूतकाळाची पूजा करण्याचे थांबविले पाहिजे की नको, याचा विचार केलाच पाहिजे. या भूतकाळाच्या पूजेचा परिणाम सांगताना प्रा. ड्युई शेवटी म्हणतात-

'व्यक्ती केवळ वर्तमानकाळात जगू शकते. वर्तमानकाळ ही केवळ

भूतकाळातून येते असी एखादी गोष्ट नाही, तर ती बरीचशी भूतकाळाने उन्नत केलेली गोष्ट असते. जे भूतकाळ पाठीमागे सोडते तेच जीवन असते. भूतकाळ जेव्हा वर्तमानकाळात परिवर्तित होतो तेव्हा भूतकाळाचे ज्ञान आणि त्याचा वारसा याला मोठे महत्त्व येते, परंतु त्याच्या उलट होत नसते. त्यामुळे भूतकाळ आणि भूतकाळातील अभिलेख व अवशेष हे शिक्षणाचे मुख्य साधन बनविण्यात चूक होते ती अशी की, त्यामुळे भूतकाळ हा वर्तमान काळाचा प्रतिस्पर्धी बनविण्याकडे आणि वर्तमानकाळ हा भूतकाळाचे जवळजवळ निष्फळ अनुकरण बनविण्याकडे कल होतो.'

तत्त्व हे जगण्याच्या व विकासाच्या वर्तमानकालीन कृतीला कमी महत्त्व देते. स्वाभाविकच वर्तमानकाळ हा पोकळ व भविष्यकाळ दूरस्थ असतो. असे तत्त्व हे प्रगतीला मारक असते आणि प्रबळ व धीम्या जीवनप्रवाहाला तो एक अडथळा बनतो.

चौथी गोष्ट, कोणतीच गोष्ट कायम नाही, कोणतीच गोष्ट शाश्वत नाही, कोणतीच गोष्ट सनातन नाही. प्रत्येक गोष्ट परिवर्तन पावते आहे. व्यक्तीसाठी त्याचप्रमाणे समाजासाठी परिवर्तन हा एक जीवनाचा नियम आहे, हे हिंदूंनी जाणून घेण्याची वेळ आलेली आहे की नाही, याचा हिंदूंनी विचार केलाच पाहिजे. बदलत्या समाजात जुन्या मूल्यांमध्ये सातत्याने क्रांती झालीच पाहिजे. आणि जर माणसांच्या कृतींचे मूल्यमापन करण्यासाठी मानदंड असलेच पाहिजेत असे असेल तर ते मानदंड सुधारण्याची तयारीदेखील असली पाहिजे, हे हिंदूंनी ओळखले पाहिजे.

## २६.

हे भाषण फारच लांबले हे मला कबूल केले पाहिजे. ह्या दोषाची त्याच्या व्याप्तीने किंवा खोलीने काही प्रमाणात उणीव भरून निघाली आहे की नाही हे तुम्ही ठरवायचे आहे. तुम्हाला प्रांजळपणे माझी मते सांगावीत एवढीच माझी इच्छा आहे. मला त्यांची शिफारस मुळीच करावयाची नाही. माझा थोडासा अभ्यास आहे व तुमच्या भवितव्याबाबतची तीव्र चिंता आहे. तुम्ही जर मला सांगण्यास मुभा दिली तर मी असे म्हणेन की, ही मते, ज्याच्याकडे कसलेही सत्तेचे हत्यार नाही, ज्याचा कोणीही मोठेपणाचा खुशामतगार नाही अशा माणसाची मते आहेत. ज्याचे बहुतेक संपूर्ण सर्वाजनिक कार्य हा गरिबांच्या व शोषितांच्या स्वातंत्र्याकरिता केलेला अखंड लढा आहे व ज्याचे एकमेव बक्षीस राष्ट्रीय वृत्तपत्रे व राष्ट्रीय पुढाऱ्यांकडून निंदा व शिव्यांची अखंड लाखोली आहे, अशा माणसाचे हे विचार आहेत. जुलूम करणाऱ्यांच्या सोन्याने पीडितांना बंधमुक्त करण्याची आणि श्रीमंतांच्या पैशाने गरिबांची उन्नती करण्याची जादू करण्यात मी त्याला हातचलाखी म्हणणार नाही. मी त्यांच्यात सामील होण्यास नकार दिला, याशिवाय त्या लाखोलीचे दुसरे कोणतेही

कारण नाही. माझ्या मतांचा तुमच्या मनावर चांगला परिणाम घडवून आणण्यासाठी हे सर्व पुरेसे नाही. मला वाटते, माझ्या मतांमुळे तुमची मते बदलण्याचाही संभव नाही. परंतु ते संभव असो अगर नसो, ही जबाबदारी संपूर्णपणे तुमची आहे. माझ्या मार्गाने नाही तर तुमच्या मार्गाने का होईना, तुम्ही जात मुळासकट उपटून टाकण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. मला वाईट वाटते, मी तुमच्याबरोबर असणार नाही, मी धर्मांतर करण्याचे ठरविलेले आहे त्याची कारणे देण्याची ही जागा नाही. परंतु मी जरी तुमच्या धर्मातून बाहेर गेलो असलो तरी मी सक्रिय सहानुभूतीने तुमच्या चळवळीकडे लक्ष ठेवीन आणि जी काही योग्य असेल ती माझी तुम्हाला मदत राहील. तुमची समस्या ही राष्ट्रीय समस्या आहे. पहिली गोष्ट, जात ही हिंदूंचा श्वास आहे यात शंका नाही. परंतु हिंदूंनी सर्वत्र हवा दूषित करून टाकली आहे आणि त्याचा प्रत्येकजणाला-शीख, मुस्लिम, ख्रिस्ती यांना-संसर्ग झाला आहे. त्यामुळे या संसर्गाने आजारी असलेल्या शीख, मुस्लिम, ख्रिस्ती या सर्वांकडून पाठिंबा मिळण्यास तुम्ही पात्र आहात. स्वराज्य नामक दुसऱ्या राष्ट्रीय समस्येपेक्षा तुमची समस्या ही अधिक बिकट आहे. स्वराज्यासाठी केलेल्या लढाईत तुमच्या बाजूने सर्व राष्ट्र घेऊन तुम्ही लढत असता. जातीविरुद्धच्या या लढाईत मात्र तुम्हाला सर्व राष्ट्रांशी व तेसुद्धा तुमच्या स्वतःच्या राष्ट्राशी लढावे लागते. परंतु हे स्वराज्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. स्वराज्याचे संरक्षण करण्याच्या प्रश्नापेक्षा स्वराज्यातील हिंदूंचे संरक्षण करण्याचा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. माझ्या मते, हिंदू समाज हा जेव्हा जातीरहित समाज बनेल तेव्हाच त्याला त्याचे स्वतःचे संरक्षण करण्याइतपत समार्थ्य प्राप्त होण्याची आशा करता येऊ शकेल. अशा आंतरिक शक्तीवाचून हिंदूंसाठी 'स्वराज्य' हे गुलामगिरीकडे टाकलेले एक पाऊल ठरेल.

धन्यवाद ! तुम्हाला यश येवो ही सदिच्छा !

# परिशिष्ट - एक

## महात्मा गांधींकडून जातीव्यवस्थेचे प्रतिसमर्थन (‘हरिजन’ मधील त्यांच्या लेखाचे पुनर्मुद्रण)

### १.

लाहोरच्या जातपात-तोडक मंडळाच्या वार्षिक परिषदेत गेल्या मेमध्ये डॉ. आंबेडकर अध्यक्षपद स्वीकारणार होते ही गोष्ट वाचकांना स्मरत असेलच. परंतु स्वागत समितीला डॉ. आंबेडकर यांचे भाषण अस्वीकारार्ह दिसून आल्यामुळे खुद्द परिषदच रद्द करण्यात आली. आपल्या निवडीच्या अध्यक्ष असताना त्याचे भाषण, ते आक्षेपार्हही असेल, नाकारण्यामध्ये स्वागत समितीने किती न्यायोचित भूमिका बजावली हा एक प्रकट प्रश्न आहे. समितीला डॉ. आंबेडकरांची जातीव्यवस्थेवरील व हिंदू धर्मशास्त्रांवरील मते माहीत होती. त्यांनी हिंदू धर्माचा त्याग करण्याचे निःसंदिग्ध शब्दांत ठरविले आहे हे देखील त्यांना माहीत होते. डॉ. आंबेडकरांनी तयार केलेल्या भाषणापेक्षा आणखी काहीही त्यांच्याकडून अपेक्षा ठेवण्यासारखे नव्हते. ज्याने समाजामध्ये स्वतःसाठी एक एकमेवाद्वितीय स्थान कोरून ठेवले आहे अशा माणसाची मूळ मते ऐकण्याच्या संधीपासून समितीने लोकांना वंचित केले असल्याचे दिसते. ते भविष्यकाळात कोणतेही लेबल लावून घेवोत, डॉ. आंबेडकर ही स्वतःला विसरू देणारी व्यक्ती नाही.

डॉ. आंबेडकरांवर स्वागत समितीच्या या निर्णयाचा काहीही परिणाम होणार नाही. त्यांनी स्वतःच्या खर्चाने ते भाषण छापून त्यांना दिलेल्या त्यांच्या नकाराला उत्तर दिलेले आहे. त्याची किंमत ८ आणे ठेवली आहे. मी २ आणे किंवा किमान ४ आणेपर्यंत ती कमी करावी अशी त्यांना सूचना करीन.

कोणताही सुधारक या भाषणाकडे दुर्लक्ष करू शकत नाही. रूढीवाद्यांचा हे (भाषण) वाचून फायदा होईल. याचा अर्थ या भाषणात आक्षेपार्ह काही नाही असा नाही. ते भाषण गंभीर आक्षेप घेण्याजोगे आहे म्हणूनच ते वाचले पाहिजे. डॉ. आंबेडकर हे हिंदू धर्माला एक आव्हान आहे. हिंदू म्हणून ते वाढले, हिंदू राजांकडून त्यांनी शिक्षण घेतले. पण तथाकथित सवर्ण हिंदूंच्या हातून त्यांना व त्यांच्या लोकांना मिळालेल्या वागणुकीमुळे त्यांना हिंदूंबद्दल इतकी घृणा वाटते की, त्यांनी केवळ त्या लोकांचाच त्याग करण्याचे ठरविलेले नसून त्यांचा सामाजिक वारसा असलेल्या धर्माचा देखील त्याग करण्याचे ठरविले आहे. त्यांनी त्या धर्माचे परिवर्तन केले आहे,

कारण त्यांना त्याच्या काही प्रचारकांचा उबग आलेला आहे.

परंतु आश्चर्य वाटावे असे यात काहीही नाही. अखेर कोणीही एखाद्या पद्धतीचे किंवा संस्थेचे केवळ तिच्या प्रतिनिधींच्या वर्तणुकीद्वारेच परीक्षण करू शकतो. आणखी काय हवे? डॉ. आंबेडकरांना असे दिसून आले की, प्रचंड संख्येने असलेले सवर्ण हिंदू हे त्यांच्या सहधर्मीयांच्या विरुद्ध, ज्यांना त्यांनी अस्पृश्य या वर्गात टाकले आहे. केवळ अमानुषपणेच वागलेले नाहीत, तर त्यांची वर्तणूक त्यांच्या धर्मशास्त्रांच्या प्रामाण्यावर आधारलेली आहे. आणि जेव्हा त्यांनी धर्मशास्त्रांचा पडताळा घेण्यास सुरुवात केली तेव्हा त्यांना धर्मशास्त्रे ही अस्पृश्यतेवर व तिच्या सर्व संबंधित गोष्टींवर श्रद्धा ठेवत असल्याचा मुबलक पुरावा आढळून आला. त्या भाषणाच्या लेखकाने त्याच्या त्रिविध आरोपांचा- खुद्द अमानुष वागणूक, ती देणाऱ्यांच्या वतीने करण्यात येणारे बेशरम समर्थन आणि हे समर्थन त्यांच्या धर्मग्रंथांनी केले आहेत हा त्यानंतरचा शोध-यांचा पुरावा म्हणून अध्याय व श्लोक उद्‌धृ केले आहेत.

जो हिंदू आपल्या जिवापाड आपल्या धर्माला महत्त्व देतो तो कोणताही हिंदू हा आरोप सहन करणार नाही. अशी घृणा करणारे केवळ डॉ. आंबेडकरच नाहीत. अशी घृणा करणारांचे ते एक अत्यंत कट्टर प्रतिनिधी असून त्यांच्यामधील ते सर्वांत समर्थ असे प्रतिनिधी आहेत. त्यामुळे ते खचितच समेट घडवून आणण्यास सर्वांत जास्त अवघड असे आहेत. सुदैवाने पुढाऱ्यांच्या पहिल्या फळीमध्ये ते एकुलते एक आहेत आणि काहीही झाले तरी अत्यंत लहान अल्पसंख्यांक समाजाचे ते प्रतिनिधी आहेत. परंतु ते जे काही बोलतात ते दलित वर्गाच्या अनेक पुढाऱ्यांच्या भाषणातून कमी-जास्त प्रमाणात जोरदारपणे बोलले जाते. फरक एवढाच की दुसरे पुढारी, उदाहरणार्थ रावबहादूर एम.सी. राजा व दिवाण बहादूर श्रीनिवासन हे हिंदू धर्म सोडून देण्याची धमकी देत नाहीत. ज्या छळणुकीस हरिजनांचा मोठा जनसमूह बळी पडलेला आहे त्या लज्जास्पद छळणुकीची भरपाई करण्यासाठी त्यांना हिंदू धर्मामध्ये पुरेशी धुगधुगी देखील दिसून येते.

परंतु हिंदू धर्मात मागे राहणाऱ्या अनेक पुढाऱ्यांकडे पाहून डॉ. आंबेडकरांना जे सांगावयाचे आहे त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सवर्णांना त्यांची श्रद्धा व त्यांची वर्तणूक दुरूस्त करावीच लागेल. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सवर्णांमध्ये जे त्यांच्या बुद्धिमत्तेमुळे व प्रभावामुळे उठून दिसतात, त्यांना धर्माशास्त्रांची अधिकृत अर्थउकल दिली पाहिजे. डॉ. आंबेडकरांच्या आरोपातून सूचित केले जाणारे प्रश्न असे आहेत–

१) धर्मशास्त्रे काय आहेत?

२) सर्व मुद्रित संहितांना धर्मशास्त्रांचा अविभाज्य भाग मानता येईल काय किंवा त्यांच्यापैकी कोणता एखादा भाग अनधिकृत प्रक्षेप म्हणून नाकारता येईल काय?

३) अस्पृश्यता, जात, समान दर्जा, सहभोजन व आंतरजातीय विवाह यांवर अशा स्वीकारलेल्या व शुद्ध केलेल्या धर्मशास्त्रांचे काय उत्तर आहे?

(या सर्व प्रश्नांची डॉ. आंबेडकर यांनी त्यांच्या भाषणात तपासणी केलेली आहे)

या प्रश्नांना असलेले माझे स्वत:चे उत्तर आणि डॉ. आंबेडकरांच्या प्रमेयातील (किमानपक्षी काही) प्रकट दोषांचे विवेचन मी पुढील अंकासाठी राखून ठेवले आहे.

(हरिजन, ११ जुलै १९३६)

## २.

वेद, उपनिषदे, स्मृती व पुराणे, त्यात रामायण व महाभारत यांचाही समावेश आहे, ही हिंदू धर्मशास्त्रे होत. ही काही परिपूर्ण संपूर्ण यादी नाही. प्रत्येक युगाने अथवा पिढीने सुद्धा या यादीत भर टाकली आहे. त्यामुळे त्यावर असा निष्कर्ष निघतो की, छापण्यात आलेली किंवा हस्तलिखितात असलेली प्रत्येक गोष्ट काही धर्मशास्त्र नाही. उदाहरणार्थ, 'स्मृती' मध्ये ईश्वराचा शब्द म्हणून कधीच स्वीकारता येणार नाही असा बराच मजकूर आहे. अशा प्रकारे डॉ. आंबेडकर यांनी उद्धृत केलेल्या संहितांपैकी अनेक संहिता या स्मृतींपासून उद्धृत केलेल्या असूनही त्या विश्वसनीय म्हणून स्वीकारता येऊ शकत नाहीत. खऱ्या अर्थाने तथाकथित धर्मशास्त्रांचा संबंध केवळ शाश्वत विविधतेशीच असू शकतो. त्या धर्मशास्त्रांनी प्रत्येक सदसद्विवेक बुद्धीला, म्हणजे ज्यांचे समजून घेण्यासाठी डोळे उघडे आहेत अशा प्रत्येक हृदयाला, आवाहन केले पाहिजे. जी तर्काने तपासता येऊ शकत नाही किंवा जी आध्यात्मिकरीत्या अनुभव घेण्याजोगी नाही अशी कोणतीही गोष्ट ईश्वराचा शब्द म्हणून स्वीकारता येऊ शकत नाही. आणि जरी तुमच्याकडे धर्मशास्त्रांची परिशुद्ध केलेली आवृत्ती असली तरी तुम्हाला त्या धर्मशास्त्रांची अर्थउकल करून देण्याची गरज भासेल. उत्तम अर्थउकल करणारा कोण आहे? विद्वान माणसे निश्चितच नाहीत. विद्वत्ता पाहिजेच, परंतु धर्म केवळ विद्वत्तेवर जगत नसतो. तो संतांच्या व द्रष्टांच्या अनुभवावर, त्यांच्या जीवनांवर व उपदेशांवर जगत असतो. जेव्हा धर्मशास्त्राच्या अत्यंत विद्वान भाष्यकारांचा पूर्णपणे विसरपडतो, तेव्हा ऋषींचा व संतांचा संचित अनुभव उरतो व तोच येणाऱ्या युगांसाठी प्रेरणा असतो.

जातीचा धर्माशी काहीही संबंध नाही. ती एक प्रथा आहे. तिचे मूळ मला माहीत नाही व माझी आध्यात्मिक भूक भागवण्यासाठी मला ते जाणून घेण्याची गरज नाही. परंतु मला हे माहीत आहे की, ती प्रथा आध्यात्मिक वा राष्ट्रीय या दोन्ही प्रगतींना हानिकारक आहे. वर्ण व आश्रम या संस्था असून त्यांचा जातींशी काहीही सबंध नाही. वर्णाचा नियम आपणाला असे शिकवतो की, आपल्यापैकी प्रत्येकाने

आपल्या पूर्वजांचा व्यवसाय करून आपली भाकरी मिळवली पाहिजे. तो (वर्ण) आपले हक्क सांगत नाही तर आपली कर्तव्ये सांगतो. त्याचा अटळपणे मानवतेच्या कल्याणास साधक असलेल्या व्यवसायांशीच संबंध येतो व इतर कशाशीही नाही. त्यावरून असाही निष्कर्ष निघतो की, कोणताही व्यवसाय अगदी नीच किंवा अगदी उच्च असा नसतो. सर्व (व्यवसाय) चांगले, वैध व निखळपणे दर्जाने समान आहेत. ब्राह्मणाचा माध्यात्मिक गुरुचा व्यवसाय आणि भंग्याचा व्यवसाय दोन्ही समान आहेत आणि त्यांच्या योग्य कर्माचे ईश्वरासमोर समान पुण्य मिळते. आणि कधी असे वाटते की त्यामुळे माणसाला एकसारखे फळ मिळते. दोघेही आपापल्या उपजीविकेसाठी हक्कदार आहेत. खरोखर एखाद्याला आजदेखील खेड्यांमध्ये धर्माच्या ह्या निरोगी प्रचलनाच्या पुसट रेषा सापडतील. ६०० लोकसंख्या असलेल्या शेगावला राहत असताना, वेगवेगळ्या कारागीरांच्या, त्यांमध्ये ब्राह्मणांचाही समावेश आहे, उपार्जनांमध्ये मला फार मोठी तफावत दिसून आली नाही. मला असे देखील दिसून आले की, या वाईट दिवसांतही माधुकरीवर जगणारे आणि त्यांच्याकडे असलेला आध्यात्मिक खजिना मुक्तपणे वाटणारे खरे ब्राह्मण दिसून येतात. जे एखाद्या वर्णाचे असल्याचे सांगतात अशा माणसांच्या जीवनात वर्णाचा नियम त्याच्या वैशिष्ट्यांसह ठरवणे हे उघडपणे, त्याच्या केवळ कार्यात्मक नियमाचा भंग करीत असल्याने, चुकीचे व अनुचित ठरले असते. वर्णाच्या श्रेष्ठतम दर्जाद्वारे एका वर्णाची दुसऱ्या वर्णावरील कुरघोडी हा धर्माला नकार आहे. वर्णाश्रमधर्मात अस्पृश्यतेवर श्रद्धा दर्शवणारी कोणतीही गोष्ट नाही. (सत्य हा एकच ईश्वर आहे या हिंदू धर्माच्या घोषणेमध्ये आणि कुटुंबाचा मानवतावादी धर्म म्हणून त्याने केलेल्या अहिंसेच्या धीट स्वीकारामध्ये धर्माचे सार सामावलेले आहे.)

हिंदू धर्माच्या माझ्या आकलनाबाबत डॉ. आंबेडकरांच्या व्यतिरिक्त अनेकजण वाद करतील याची मला जाणीव आहे. त्याचा माझ्या सामाजिक दर्जावर परिणाम होत नाही. ज्याच्या आधारे मी जवळजवळ अर्धशतक जगलो व ज्यानुसार माझ्या जीवनाचे नियमन करण्यासाठी माझ्या सर्व शक्तीनुसार मी प्रयत्न केला असे ते आकलन आहे.

माझ्या मते, डॉ. आंबेडकरांनी आपल्या भाषणात, शंकास्पद आधिकार व मूल्य असलेल्या संहिता, तसेच हिंदू धर्माचा विपर्यास करतात अशा योग्य उदाहरणे नसलेल्या अधःपतित हिंदूंची स्थिती निवडण्यामध्ये फार मोठी चूक केली आहे. डॉ. आंबेडकरांनी लागू केलेल्या निकषाद्वारे मूल्यमापन केल्यास प्रत्येक ज्ञात विद्यमान धर्म हा बहुधा चूक ठरेल. आपल्या समर्थ भाषणात विद्वान डॉक्टरांनी आपली बाजू प्रभावीपणे सिद्ध केलेली आहे. चैतन्य, ज्ञानदेव, तुकाराम, तिरुवल्लूवर, रामकृष्ण परमहंस, राजा राममोहन रॉय, महर्षी देवेंद्रनाथ टागोर, विवेकानंद व ज्यांचा सहज

उल्लेख करता येईल असे इतर अनेकजण यांनी सांगितलेला धर्म, डॉ. आंबेडकराच्या भाषणात दाखवल्याप्रमाणे, निव्वळ सद्गुणशून्य आहे काय? धर्माचे मूल्यमापन त्यांच्या सर्वांत वाईट उदाहरणांनी होता कामा नये, तर त्याने उत्पन्न केलेल्या उत्कृष्ट उदाहरणांनी व्हावे. कारण धर्माची सुधारणा करण्याचा उद्देश म्हणून नसला तरी सुधारणेविषयी उत्कट इच्छा असलेला आदर्श म्हणून त्याचा आणि केवळ त्याचाच उपयोग करता येऊ शकेल.

(हरिजन, १८ जुलै १९३६)

३.

## वर्ण विरुद्ध जात

लाहोर येथील जातपात-तोडक मंडळाचे संत रामजी हे पुढील गोष्ट मी प्रसिद्ध करावी, असे इच्छितात-

मी आपले डॉ. आंबेडकर व जातपात-तोडक मंडळ, लाहोर यांविषयीचे शेरे वाचले. त्या संदर्भात मी पुढील गोष्टी सादर करू इच्छितो-

डॉ. आंबेडकर हे दलित वर्गापैकी आहेत म्हणून आम्ही त्यांना आमच्या परिषदेत अध्यक्ष म्हणून आमंत्रण दिलेले नव्हते, कारण आम्ही स्पृश्य व अस्पृश्य हिंदूंमध्ये भेद करीत नाही. उलटपक्षी, आम्ही त्यांची निवड केली याचे साधे कारण म्हणजे, हिंदू समाजाच्या प्राणघातक रोगाचे त्यांचे निदान हे बरेचसे आमच्या निदानासारखे होते. उदा. हिंदूंच्या बेबनावाचे आणि पाडावाचे मूळ कारण ही जातीव्यवस्था आहे असेच त्यांचेही मत होते. डॉक्टरांचा डॉक्टरेटसाठी असलेला प्रबंध जातीव्यवस्था हाच असल्यामुळे त्यांनी ह्या विषयाचा सखोल अभ्यास केलेला आहे. आमच्या परिषदेचा उद्देश जातीनाशासाठी हिंदूंचे मन वळविणे असा होता. परंतु सामाजिक व धार्मिक बाबतीत अहिंदूंच्या सल्ल्याचा हिंदूंवर काहीही परिणाम होऊ शकत नाही. डॉक्टर आपल्या भाषणाच्या पुरवणी भागामध्ये हिंदू म्हणून असलेले आपले शेवटचे भाषण आहे असे सांगण्याचा आग्रह धरतात. ही गोष्ट परिषदेच्या ध्येयधारणास विसंगत त्याचप्रमाणे विघातक होती. म्हणून आम्ही त्यांना ते वाक्य वगळण्याची विनंती केली. कारण ते इतर कोणत्याही प्रसंगी ते वाक्य वापरू शकले असते. परंतु त्यांना तसे करण्यास नकार दिला आणि आम्हाला केवळ आमच्या कार्याचा देखावा करण्यात काहीच हशील नाही असे दिसून आले. हे सर्व असले तरी मला त्यांच्या भाषणाची प्रशंसा केल्याशिवाय राहवत नाही. माझ्या माहितीप्रमाणे ते भाषण हा या विषयावरील अत्यंत विद्वत्ताप्रचुर ग्रंथ आहे आणि तो भारताच्या प्रत्येक भाषेमध्ये अनुवाद करण्यायोग्य आहे.

तथापि मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, जात व वर्ण यांच्यामधील तुमचा तात्त्विक मतभेद इतका सूक्ष्म आहे की तो सामान्य लोकांना समजणे कठीण आहे. कारण हिंदू समाजातील सर्व व्यवहार्य प्रयोजनांसाठी जात व वर्ण ही एकच गोष्ट आहे. कारण त्या दोहोंचे कार्य एकच आहे. ते म्हणजे आंतरजातीय विवाहांना व सहभोजनाला प्रतिबंध करणे. या काळात तुमचा वर्णव्यवस्थेचा सिद्धांत अव्यवहार्य आहे आणि लगतच्या भविष्यकाळात त्याचे पुनरुज्जीवन होण्याची सुतराम शक्यता नाही. परंतु हिंदू हे जातीचे गुलाम आहेत व ते ती नष्ट करू इच्छित नाहीत. त्यामुळे तुम्ही जेव्हा तुमच्या काल्पनिक वर्णव्यवस्थेचा आदर्श प्रतिपादन करता तेव्हा त्यांना जातीशी चिकटून राहण्यासाठी समर्थन मिळते. अशा प्रकारे वर्णाच्या विभाजनाची आपली काल्पनिक उपयुक्तता प्रतिपादन करण्याने आपण सामाजिक सुधारणेचे मोठे नुकसान करीत आहात. कारण त्यामुळे आमच्या मार्गात अडथळा निर्माण होतो. वर्णव्यवस्थेच्या मुळावर घाव न घालता अस्पृश्यता हटवण्याचा प्रयत्न करणे म्हणजे केवळ रोगाच्या बाह्य लक्षणांवर उपचार करण्यासारखे आहे किंवा पाण्याच्या पृष्ठभागावर रेषा ओढण्यासारखे आहे. द्विज हे त्यांच्या मनोमनी तथाकथित स्पृश्य व अस्पृश्य शूद्रांना सामाजिक समता देऊ इच्छित नाहीत. म्हणून ते जात तोडण्यास नकार देतात आणि केवळ हा प्रश्न टाळण्यासाठी अस्पृश्यता निवारण्यासाठी उदार देणग्या देतात. अस्पृश्यतेचे व जातीचे निवारण करण्यासाठी पैशांची मदत घेणे म्हणजे केवळ चिखलाने चिल धुण्यासारखे आहे.'

या पत्रातील शेवटचा परिच्छेद खचितच पहिला परिच्छेद रद्द करतो. जर मंडळ शास्त्रांची मदत अव्हेरत असेल तर डॉ. आंबेडकर जे करत आहेत अगदी तेच करण्याचे म्हणजेच हिंदू असण्याचे बंद होत आहे असे म्हणता येईल. तर मग डॉ. आंबेडकरांनी हिंदू म्हणून असलेले हे माझे शेवटचे भाषण आहे असे केवळ म्हटले म्हणून डॉ. आंबेडकरांच्या भाषणावर ते कसा काय आक्षेप घेऊ शकतात? मंडळाच्या वतीने बोलणाऱ्या श्री. संत राम यांच्या म्हणण्यातील दावा डॉ. आंबेडकरांच्या भाषणातील संपूर्ण युक्तिवादाची प्रशंसा केल्यावरही कसा काय टिकून राहील?

परंतु मंडळ जर शास्त्रांना नाकारत असेल तर ते कशावर विश्वास ठेवते असे विचारणे उचित ठरेल. मुसलमान जर कुराण नाकारत असेल तर तो मुसलमान कसा काय राहू शकेल? किंवा ख्रिस्ती जर बायबल नाकारत असेल तर तो ख्रिस्ती कसा काय राहू शकेल? जर जात व वर्ण या परिवर्तनीय संकल्पना असतील आणि जर हिंदू धर्माची व्याख्या करणाऱ्या शास्त्रांचा वर्ण हा अविभाज्य भाग असेल तर जो जात, म्हणजेच वर्ण नाकारतो, तो स्वतःला हिंदू कसा काय म्हणवू शकतो, हे काही मला समजत नाही.

श्री. संत राम यांना शास्त्रे ही चिखलासारखी वाटतात. डॉ. आंबेडकरांनी,

माझ्या माहितीप्रमाणे, शास्त्रांना असले विचित्र नाव दिलेले नाही. मी जेव्हा म्हणालो की, शास्त्रे जर विद्यमान अस्पृश्यतेला पुष्टी देत असतील तर मी स्वतःला हिंदू संबोधण्याचे सोडून देईन, तेव्हा मला तेच अभिप्रेत होते. त्याचप्रमाणे शास्त्रे जर आज आपण समजतो त्याप्रकारे अगदी हिडीसपणे जातीला अनुमोदन देत असतील तर मी स्वतःला हिंदू म्हणवणार नाही किंवा मी हिंदू राहणार नाही. मला सहभोजन व आंतरजातीय विवाह यांच्याविषयी कसलीही अढी नाही. श्री. संत राम यांना सुचविण्याचे मी धाडस करतो की, हीच केवळ बुद्धिवादी, अचूक व नैतिकदृष्ट्या समर्थनीय अशी भूमिका असून हिंदू परंपरेत तिच्या बाजूने मुबलक पुरावे आहेत.

(हरिजन, १५ ऑगस्ट १९३६)

# परिशिष्ट - दोन

## डॉ. भी. रा. आंबेडकर यांचे महात्माजींस उत्तर

१.

जातपात-तोडक मंडहासाठी मी जातीप्रथा या विषयावर जे भाषण तयार केले होते त्यांची महात्माजींनी त्यांच्या 'हरिजन' मध्ये दखल घेऊन मला जो सन्मान दिला त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. माझ्या भाषणावरील त्यांचे परीक्षण बारकाईने वाचल्यावर, मी जातीप्रथा या विषयावर व्यक्त केलेल्या मतांशी महात्माजी पूर्णपणे सहमत आहेत, हे स्पष्ट होते. माझ्या विरोधकांबरोबर वादविवादात उतरण्याची मला सवय नाही. विशेष कारणे असतील तरच मला वादविवादात उतरणे भाग पडते. माझा विरोधक जर कोणी सामान्य व अप्रसिद्ध व्यक्ती असती तर मी तिचा फारसा विचार केला नसता. परंतु माझा विरोधक खुद्द महात्माच असल्यामुळे त्यांनी पुढे मांडलेल्या विरोधी विचारांना उत्तर देण्याचा मी प्रयत्न केलाच पाहिजे असे मला वाटते. त्यांनी मला दिलेला मान स्वीकारीत असताना मी हे देखील कबूल केलेच पाहिजे की, प्रसिद्धी मिळविण्याची इच्छा असल्याचा महात्म्यासारख्यांनी माझ्यावर आरोप करावा, हे पाहून मला आश्चर्य वाटते. न दिलेले भाषण छापण्यामागे 'मी विसरला जाऊ नये' हे पाहण्याचा माझा उद्देश असल्याचे जेव्हा ते 'सुचवतात' तेव्हा ते असा 'आरोप' करीत असल्याचे दिसते. महात्माजी काहीही म्हणोत, हे भाषण छापण्यामागे माझा उद्देश हिंदूंना विचार करण्यासाठी आणि त्यांना त्यांच्या स्थितीची जाणीव करून देण्यासाठी त्यांना प्रेरित करणे हाच होता. मी प्रसिद्धीची कधीच हाव धरली नाही. मी असेही म्हणेन की, माझ्या अपेक्षेपेक्षा अथवा गरजेपेक्षा मला अधिक प्रसिद्धी मिळाली आहे. परंतु जरी प्रसिद्धी मिळवण्याच्या हेतूपोटी मी हे भाषण छापले असले तरी माझ्यावर कोणी दगड टाकावा? निश्चितच, काचेच्या घरात राहण्याऱ्या महात्म्यासारख्या लोकांनी टाकू नये.

२.

माझा उद्देश सोडला तर या भाषणात मी उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत महात्माजींना काय म्हणावयाचे आहे? सर्वांत पहिली गोष्ट म्हणजे, माझे भाषण जो कोणी वाचीत त्याला असे दिसून येईल की, मी उपस्थिती केलेले प्रश्न महात्माजींनी

पूर्णपणे दुर्लक्षिले आहेत आणि त्यांनी जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत व ज्यांना ते हिंदूंविषयीचे माझे आरोपपत्र असे संबोधण्यात आनंद मानतात, ते प्रश्न त्यातून निर्माण होणारे प्रश्नच नाहीत. माझ्या भाषणात मी जे मुख्य मुद्दे मांडण्याचा केला आहे त्यांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल–

१) जातीव्यवस्थेने हिंदूंचा नाश केला आहे.

२) चातुर्वर्ण्याच्या आधारे हिंदू समाजाचे पुनर्संघटन करणे अशक्य आहे. कारण वर्णव्यवस्था ही गळक्या भांड्याप्रमाणे अथवा नाकासमोर पाहत धावणाऱ्या माणसाप्रमाणे आहे. ती स्वगुणांनी स्वतःच्या बळावर टिकून राहण्यास असमर्थ आहे. वर्णाचे उल्लंघन करणाऱ्या प्रत्येकाविरुद्ध लागू करता येईल अशी कायद्याची मान्यता तिच्यामागे नसल्याने जातीव्यवस्थेत अवनत होण्याची तिची अंगभूत प्रवृत्ती आहे.

३) हिंदू समाजाचे चातुर्वर्ण्याच्या आधारे पुनर्संघटन करणे हानिकारक आहे, कारण ज्ञानसंपादनाची संधी नाकारून लोकांना अवनत करणे आणि त्यांना शस्त्र धारण करण्याचा अधिकार नाकारून त्यांची मुस्कटदाबी करणे हा वर्णव्यवस्थेचा उद्देश आहे.

४) स्वातंत्र्य, समता व सहभाग या तत्त्वांना मान्यता देईल अशा धार्मिक पायावर हिंदू समाजाचे पुनर्संघटन झाले पाहिजे.

५) हा उद्देश साध्य करण्यासाठी जात व धर्म यांच्यामागे असलेली धार्मिक पावित्र्याची भावना नष्ट झाली पाहिजे.

६) शास्त्रांचे ईश्वरी प्रामाण्य टाकून दिले तरच जात व वर्ण यांचे पावित्र्य नष्ट करता येईल.

यावरून महात्माजींनी उपस्थित केलेले प्रश्न हे पूर्णपणे मुद्दा सोडून आहेत असे दिसून येईल. या भाषणातील मुख्य युक्तिवाद हे हरवून बसले आहेत हे स्पष्ट होते.

## ३.

महात्माजींनी मांडलेल्या मुद्द्यांमध्ये किती तथ्य आहे ते मी आता तपासतो. मी उद्धृत केलेले उतारे हे विश्वसनीय नाहीत, हा महात्माजींनी मांडलेला पहिला मुद्दा आहे. मी या बाबतीत अधिकारी व्यक्ती नाही, हे मी कबूल करतो. परंतु मला हे सांगितले पाहिजे की, मी उद्धृत केलेले सर्व उतारे हे संस्कृत भाषा व हिंदू शास्त्रे यांवरील अधिकारी व्यक्ती म्हणून मान्यता पावलेल्या दिवंगत श्री. टिळक यांच्या लिखाणातून घेतलेले आहेत. त्यांचा दुसरा मुद्दा असा आहे की, या शास्त्रांचा विद्वानांनी अर्थ लावू नये, तो संतांनी लावावा. आणि संतांनी समजून घेतल्यानुसार ती शास्त्रे

जातीप्रथा व अस्पृश्यता यांना मान्यता देत नाहीत. पहिल्या मुद्याच्या बाबतीत महात्माजींना मला असे विचारावयाचे आहे की, जर ग्रंथ हे प्रक्षिप्त असतील आणि जर त्यांचा संतांनी वेगळ्या प्रकारे अर्थ लावला असेल तर त्याचा कोणास काय उपयोग होणार? लोक कोणते ग्रंथ खरे आहेत व कोणते ग्रंथ प्रक्षिप्त आहेत हे पाहून त्यामध्ये कोणताही फरक करीत नाहीत. लोकांना ग्रंथ कोणते आहेत तेही माहीत नसते. त्यांना जे सांगण्यात येते ते हे की, शास्त्रांनी धार्मिक कर्तव्य म्हणून जातीप्रथा व अस्पृश्यता यांचे पालन करण्याची आज्ञा घालून दिली आहे.

संतांच्या बाबतीत हे मान्य केले पाहिजे की, केवळ विद्वान असलेल्यांच्या शिकवणींशी तुलना करता त्यांच्या शिकवणी कितीही वेगळ्या व उन्नती करणाऱ्या असोत, त्या शोचनीयपणे परिणामशून्य ठरल्या आहेत. त्या दोन कारणांमुळे परिणामशून्य आहेत. पहिली गोष्ट, संतांपैकी कोणीही जातीव्यवस्थेवर कधीच हल्ला केला नाही. उलटपक्षी, ते जातीव्यवस्थेचे कट्टर अनुयायी होते. त्यांच्यापैकी बहुतेक संत आपापल्या जातीतच जगले व आपापल्या जातीतच मरण पावले. ज्ञानदेव त्याच्या ब्राह्मण जातीवर भावनिकरीत्या इतके प्रेम करीत होता की, पैठणचे ब्राह्मण जेव्हा त्याला त्यांच्या समाजात घ्यायला तयार नव्हते, तेव्हा ब्रह्मवृंदाकडून त्याला ब्राह्मण दर्जाची मान्यता मिळावी यासाठी त्याने आकाशपाताळ एक केले. संत एकनाथाने अस्पृश्यांना स्पर्श करण्याचे व त्यांच्याबरोबर सहभोजन करण्याचे धैर्य दाखवले म्हणून त्याला 'धर्मात्मा' ह्या चित्रपटात नायक दाखवला आहे. पण संत एकनाथ तसे का वागला याचे कारण, तो जात व अस्पृश्यता यांच्याविरोधी होता म्हणून नव्हे, तर होणारा विटाळ गंगा नदीच्या पवित्र पाण्यात स्नान केल्याने धुऊन काढला जाऊ शकतो, असे त्याला वाटले म्हणून. (अंत्यजाचा विटाळ ज्यासी। गंगास्नाने शुद्धत्व त्यासी ॥- एकनाथी भागवत, अध्याय २८, ओवी १९१) माझ्या माहितीनुसार संतांनी जातीप्रथा व अस्पृश्यता यांच्या विरोधात कधीच चळवळ उभारली नाही. त्यांचा माणसांमधील भांडणाशी संबंध नव्हता. त्यांचा माणूस व देव यांच्यामधील नात्याशी संबंध होता. सर्व माणसे समान आहेत, असा त्यांनी उपदेश केला नाही. त्यांनी सर्व माणसे देवाच्या दृष्टीने समान आहेत, असा उपदेश केला. हा अत्यंत वेगळा व अत्यंत निरुपद्रवी विरोध होता. तसा उपदेश करण्यात कसलीच अडचण नव्हती किंवा त्यावर विश्वास ठेवण्यात कोणाला कसलाच धोका नव्हता. संतांचा उपदेश परिणामशून्य झाला याचे दुसरे कारण म्हणजे, लोकांना अशी शिकवण देण्यात आली की, संत जातीचे उल्लंघन करू शकतात, परंतु सामान्य माणसाने जातीचे उल्लंघन करता कामा नये. त्यामुळे कोणताही संत कधीच अनुकरणीय उदाहरण बनला नाही. तो नेहमीच ज्याला आदर दिला जावा असा एक धार्मिक माणूस राहिला. लोक जातीप्रथा व अस्पृश्यता यांचे कट्टर अनुयायी

राहिले, ही गोष्ट असे दर्शविते की, संतांचे पवित्र जीवन व उदात्त प्रवचने यांचा लोकांच्या जीवनावर व वर्तणुकीवर शास्त्रांच्या विरोधात काहीच प्रभाव पडला नाही. त्यामुळे थोड्याबहुत विद्वानांपेक्षा किंवा अनेक अज्ञानी लोकांपेक्षा वेगळ्या प्रकारे शास्त्रांना समजून घेणारे कोणी संत होते वा कोणी महात्मा आहे, ही काही समाधानाची बाब नाही. लोक शास्त्रांचा वेगळा अर्थ घेतात ही वस्तुस्थिती आहे. ती मान्य करावी लागेल व मानलीच पाहिजे. ज्या शास्त्रांनी लोकांच्या आचरणाचे नियमन करण्याचे कार्य चालू ठेवले आहे त्या शास्त्रांच्या प्रमाण्याचा धिक्कार केल्याशिवाय ह्या वस्तुस्थितीची कशाप्रकारे व्यवस्था लावता येईल, हा प्रश्न असून त्याचा महात्म्याने विचार केलेला नाही. शास्त्रांच्या शिकवणीपासून जनतेला मुक्त करण्याची प्रभावी साधने म्हणून महात्म्याने काहीही योजना मांडलेली असो, त्याला ही गोष्ट मान्य केलीच पाहिजे की, एखाद्या संताने व्यतीत केलेले धर्मनिष्ठ जीवन त्याची स्वतःची उन्नती घडवीत असले तरी भारतात सामान्य माणसाचा संतांबाबतचा व महात्म्यांबाबतचा दृष्टिकोण असा आहे की, संतांचा आदर करावा, परंतु त्यांचे अनुसरण करू नये. (तसे करणे व्यवहार्य नसते.) त्यामुळे हा दृष्टिकोण महत्त्वाचा मानता येऊ शकत नाही. त्यामुळे या युक्तिवादाचा कोणाला लाभ होऊ शकत नाही.

## ४.

महात्माजींनी मांडलेला तिसारा मुद्दा हा आहे की, चैतन्य, ज्ञानदेव, तुकाराम, तिरुवल्लूर, रामकृष्ण परमहंस इत्यादींनी सांगितलेला धर्म हा मी अर्थ लावल्याप्रमाणे सद्‌गुणशून्य असू शकत नाही आणि धर्माचे मूल्यमापन त्याच्या सर्वात वाईट उदाहरणांवरून नव्हे तर त्याने निर्माण केलेल्या उत्तम उदाहरणांवरून केले पाहिजे. मी या विधानातील प्रत्येक शब्दाशी सहमत आहे. परंतु त्याद्वारे महात्माजींना काय सिद्ध करावयाची इच्छा आहे, हे मला बिलकूल समजत नाही. धर्माचे मूल्यमापन त्याच्या सर्वात वाईट उदाहरणांवरून नव्हे तर त्याच्या उत्तम उदाहरणांवरून केले पाहिजे हे खरे आहे. परंतु एवढ्याने ही बाब निकालात निघते काय? मी म्हणतो, ती निकालात निघत नाही. सर्वात वाईट उदाहरणांची संख्या इतकी मोठी व उत्तम उदाहरणांची इतकी थोडी, असे का? - प्रश्न तरीही उरतोच. मला वाटते या प्रश्नाला दोन संभाव्य उत्तरे आहेत-

१) सर्वात वाईट असलेली उदाहरणे (माणसे) ही, त्यांच्यात मुळातच काही विकृती असल्याकारणाने नैतिक शिक्षण देता येण्याजोगी नसतात व त्यामुळे धार्मिक आदर्शाचा सर्वात दूरचा पल्ला गाठण्यास ती असमर्थ असतात, किंवा

२) धार्मिक आदर्श हा संपूर्णपणे चुकीचा आदर्श असून त्याने अनेकांच्या

जीवनाला नैतिकदृष्ट्या चुकीचे वळण लावले आहे आणि चुकीचा आदर्श असतानादेखील वास्तविक, या चुकीच्या वळणांना योग्य दिशेने वळण देऊन उत्तम असलेली उदाहरणे (माणसे) ही उत्तमच राहिली आहेत.

या दोन स्पष्टीकरणांपैकी पहिले स्पष्टीकरण स्वीकारण्यास मी तयार नाही आणि मला खात्री आहे की, महात्माजीसुद्धा माझ्या मताच्या विरोधी असणार नाहीत. सर्वांत वाईट उदाहरणे संख्येने इतकी मोठी व उत्तम उदाहरणे इतकी थोडी का आहेत याचे स्पष्टीकरण करण्यासाठी महात्माजींकडे तिसरा पर्याय नसेल तर माझ्या मते दुसरे स्पष्टीकरण हेच एकमेव स्पष्टीकरण असेल तर धर्माचे मूल्यमापन त्याचे पालन करणाऱ्या त्याच्या उत्तम अनुयायांवरून करावे, ह्या महात्माजींच्या युक्तीवादातून उघडच काहीच निष्पन्न होत नाही. चुकीच्या आदर्शांची अनेकांनी पूजा केल्यामुळे ते कुमार्गाला गेले याची आपण कीव करू. यापेक्षा आणखी काय करणार?

## ५.

अनेकांनी संतांचे उदाहरण अनुसरले तरच हिंदू धर्म सहिष्णु राहील हा महात्म्याचा युक्तिवाद दुसऱ्या एका कारणास्तव चुकीचा आहे. (या संदर्भात श्री. एच. एन. ब्रेल्सफोर्ड यांचा एप्रिल १९३६ च्या 'आर्यन पाथ' मधील 'नीती आणि समाजरचना' (मोरॅलिटी अँड दि सोशल स्ट्रक्चर) हा उद्‌बोधक लेख पाहावा.) चैतन्य इत्यादींसारख्या ठळक व्यक्तींची नावे उद्‌धृत करून महात्मा मला अत्यंत विस्ताराने आणि साध्या स्वरूपात असे सुचवू इच्छित असल्याचे दिसते की, जर सर्व उच्चजातीय हिंदूंनी खालच्या जातीतील हिंदूंशी असलेल्या त्यांच्या व्यवहारात उच्च दर्जाची नीती अनुसरावी म्हणून उच्च जातीच्या हिंदूंचे मन वळवता येऊ शकले तर हिंदू समाजाच्या रचनेत कोणताही मूलभूत बदल न घडवता हिंदू समाज सहिष्णू व सुखी देखील बनवता येऊ शकेल. मी या प्रकारच्या विचारसरणीच्या पूर्णपणे विरोधी आहे. उच्च जातीय हिंदूंपैकी जे आपल्या जीवनात उच्च सामाजिक आदर्श उतरवण्याचा प्रयत्न करतात त्यांच्याविषयी मी आदर दाखवू शकतो. अशा माणसांवाचून भारत हा आता आहे त्यापेक्षा अधिक ओंगळ व राहण्यास अगदी दुःखदायक झाला असता. परंतु असे असले तरी जे कोणी उच्चजातीय हिंदूंचे वैयक्तिक चारित्र्य सुधारून त्यांचे उत्तम पुरुषांमध्ये रूपांतर करण्याच्या प्रयत्नावर विसंबून असतील ते माझ्या मते आपला वेळ वाया घालवीत असून भ्रमाला कवटाळत आहेत. वैयक्तिक चारित्र्य युद्धसामग्री बनविणाऱ्यास चांगला माणूस बनवू शकतो काय? म्हणजे बॉम्बगोळा विकणारा माणूस विकेल तो बॉम्बगोळा फुटणार नाही आणि फुटलाच तर बिनविषारी असा गॅस त्यातून बाहेर येईल असे करू शकेल काय? जर असे होऊ शकत नसेल तर ज्या

माणसाचे वैयक्तिक चारित्र्य जातीच्या जाणिवेने ठासून भरलेले आहे तो माणूस त्याच्या सहकाऱ्यांशी व त्याच्या मित्रांशी समानतेने वागेल, हे तुम्ही कसे काय मान्य करू शकता? त्याने स्वत:शी प्रामाणिक राहण्यासाठी त्याच्या सहकाऱ्यांबरोबर, वरिष्ठ किंवा कनिष्ठ म्हणून, कोणत्याही परिस्थितीत त्याच्या स्वत:च्या जातभाईपेक्षा, वेगळ्या प्रकारे व्यवहार केलाच पाहिजे. तो त्याच्या सहकाऱ्यांशी त्याचे नातेवाईक मंडळी म्हणून समानतेचा व्यवहार करील अशी त्याच्याकडून कधीच अपेक्षा करता येऊ शकणार नाही. वास्तविक हिंदू हा, जे त्याच्या जातीचे नाहीत त्या सर्वांशी, ज्यांच्याविरुद्ध बेफिकीरपणे भेदभाव करता येऊ शकेल आणि ज्यांच्याविरुद्ध बेशरमपणे कोणतेही कपट केले जाईल किंवा चाल खेळली जाईल असे ते जणू त्याचे शत्रू असावेत, त्याप्रमाणे वागतो. दुसऱ्या शब्दांत, बरा किंवा वाईट हिंदू असू शकतो, परंतु चांगला हिंदू असू शकत नाही. त्याच्या वैयक्तिक चारित्र्यामध्ये दोष असल्याकारणाने हे होते असे नाही. जर उत्तम पुरुषांमधील व त्यांच्या सोबत्यांमधील नात्याचा आधार मूलत: चुकीचे नातेसंबंध हा असेल तर उत्तम पुरुष हे नीतिमान असू शकत नाहीत. असे असण्याचे कारण त्यांच्या वैयक्तिक चारित्र्यात काही तरी दोष आहे असे नव्हे. गुलामासाठी त्याचा मालक बरा किंवा वाईट असू शकेल, परंतु चांगला मालक असू शकत नाही. सद्गृहस्थ मालक असू शकत नाही आणि मालक सद्गृहस्थ असू शकत नाही. हीच गोष्ट वरिष्ठ जाती व कनिष्ठ जाती यांच्यामधील संबंधाला लागू आहे. कनिष्ठ जातीच्या माणसासाठी वरिष्ठ जातीचा माणूस इतर वरिष्ठ जातीच्या माणसांशी तुलना करता अधिक बरा किंवा अधिक वाईट असू शकेल. वरिष्ठ जातीच्या माणूस चांगला सद्गृहस्थ असू शकत नाही. कारण स्वत:ला वरिष्ठ जातीचा माणूस चांगला सद्गृहस्थ असू शकत नाही. कारण स्वत:ला वरिष्ठ जातीचा माणूस म्हणून वेगळेपणाने दाखवण्यासाठी त्याला कनिष्ठ जातीच्या माणसाची आवश्यकता आहे. कनिष्ठ जातीच्या माणसाला त्याच्यावर वरिष्ठ जातीचा माणूस असल्याची जाणीव असणे ही गौरवाची गोष्ट असू शकत नाही. मी माझ्या भाषणात असा युक्तिवाद केला आहे की, वर्ण किंवा जात यावर आधारलेला समाज हा चुकीच्या नातेसंबंधावर आधारलेला समाज आहे. महात्माजी माझा युक्तिवाद खोडून टाकण्याचा प्रयत्न करतील अशी मला आशा होती. परंतु तसे करण्याऐवजी, ज्यावर चातुर्वर्ण्य आधारलेला आहे ती भूमिका उघड करण्याऐवजी, त्यांनी केवळ चातुर्वर्ण्यावरील त्यांच्या श्रद्धेचा पुनरुच्चार केला आहे.

## ६.

एखादा महात्मा जो उपदेश करतो तो स्वत: आचरणात आणतो काय? सर्वसाधारणपणे लागू असलेल्या युक्तिवादात वैयक्तिक संदर्भ येणे कोणाला आवडणार नाही. परंतु जेव्हा कोणी एखाद्या सिद्धांताचा उपदेश करतो आणि तो ते एखादे धर्मतत्त्व म्हणून मानतो तेव्हा तो जो उपदेश करतो तो उपदेश तो स्वत: कितपत आचरणात आणतो, हे जाणून घेण्याची उत्सुकता असते. असेही असेल की, आदर्श हा प्राप्त करण्यास फारच उच्च असल्यामुळे तो आचरणात आणण्यात त्याला अपयश आले असेल. असेही असेल की, त्याच्या मनातील ढोंगामुळे तो आदर्श आचरणात आणण्यास त्याला अपयश आले असेल. काही असो, महात्माजींची वर्तणूक त्यांनी परीक्षणासाठी जुली ठेवली असल्याने स्वत:च्या बाबतीत त्यांच्या आदर्श प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी कितपत प्रयत्न केला असे जर मी विचारले, तर मला दोष दिला जाऊ नये. महात्माजी जन्माने बनिया आहेत. उपाध्यायत्व हा तर ब्राह्मणांचा व्यवसाय आहे, त्याच्यासाठी त्यांच्या पूर्वजांनी व्यापाराचा त्याग केला. त्यांच्या स्वत:च्या आयुष्यात महात्मा बनण्यापूर्वी त्यांना स्वत:चा जीवनमार्ग निवडण्याचा प्रसंग आला तेव्हा त्यांनी कायद्याचा व्यवसाय पत्करला. पुढे कायद्याचा त्याग करून अर्धा संत व अर्धा राजकारणी बनले. त्यांच्या पूर्वजांचा व्यवसाय असलेल्या व्यापाराला ते कधीच शिवले नाहीत. त्यांचा सर्वात लहान मुलगा- जो आपल्या पित्याचा भक्त तसेच अनुयायी आहे- जन्माने वैश्य आहे, त्याने ब्राह्मणाच्या मुलीशी विवाह केला आहे व तो वृत्तपत्र व्यवसायातील एका बड्या असामीकडे नोकरीला आहे. पूर्वजांचा व्यवसाय न अनुसरल्याबद्दल महात्म्याजींनी स्वत:चा धिक्कार केल्याचे ज्ञात नाही. आदर्शाचे त्याच्या सर्वात वाईट उदाहरणांनी मूल्यांकन करणे हे चुकीचे व अनुदारपणाचे असेलही. परंतु खात्रीने महात्माजींच्या उदाहरणाहून अधिक चांगले उदाहरण असणार नाही आणि असे असूनही जर तो आदर्श प्रत्यक्षात आणण्यास अशक्य ठरत असेल तर तो आदर्शच अशक्य आदर्श असला पाहिजे व तो मानवाच्या व्यावहारिक प्रेरणांच्या अगदी विरुद्ध असला पाहिजे. कार्लईलच्या विद्यार्थ्यांना माहीत आहे की, तो नेहमी एखाद्या विषयावर विचार करण्याआधीच बोलत असे. जात या विषयाबाबतीत महात्माजींची देखील तीच गत झालेली नाही ना, अशी मला शंका वाटते. अन्यथा जे प्रश्न मला पडले ते विशिष्ट प्रश्न त्यांच्या नजरेतून सुटले नसते. एखादा व्यवसाय हा पूर्वजांचा व्यवसाय आहे म्हणून तो त्या माणसाला बंधनकारक आहे, असे कधी समजता येऊ शकेल? माणसाने त्याच्या पूर्वजांचा व्यवसाय त्याच्या स्वभावाशी जुळत नसला, तो व्यवसाय आज कायदेशीर नसला तरी अनुसरलाच पाहिजे काय? पूर्वजांचा व्यवसाय

अनैतिक आहे असे त्याला दिसून आले तरी त्याने तो केलाच पाहिजे काय? जर प्रत्येकाने त्याच्या पूर्वजांचा व्यवसाय केलाच पाहिजे असे असेल तर त्यावरून असा निष्कर्ष निघतो की एखाद्या माणसाने त्याचा आजोबा कुंटणखाना चालवणारा होता म्हणून त्यानेही तोच व्यवसाय चालू ठेवला पाहिजे व एखाद्या स्त्रीची आजी वेश्या होती म्हणून तिनेही वेश्या राहणे चालू ठेवले पाहिजे. महात्माजी त्यांच्या तत्त्वाचा हा तार्किक निष्कर्ष मान्य करण्यास तयार आहे काय? माझ्या मते, एखाद्याने त्याच्या पूर्वजांचा व्यवसाय केला पाहिजे हा आदर्श केवळ अशक्य व अव्यवहार्य आदर्शच नसून तो नैतिकदृष्ट्या एक अक्षम्य आदर्श आहे.

## ७.

महात्माजींनी ब्राह्मणाने आयुष्यभर ब्राह्मण म्हणून राहण्यात मोठा सद्‌गुण दिसतो. असे अनेक ब्राह्मण आहेत की त्यांना आयुष्यभर ब्राह्मण म्हणून राहणे आवडत नाही, ही वस्तुस्थिती बाजूला ठेवल्यास, जे ब्राह्मण आपल्या पूर्वजांच्या पुरोहिताच्या व्यवसायाला चिकटून राहिले आहेत, त्यांच्याविषयी आपण काय म्हणू शकतो? ते पूर्वजांच्या व्यवसायाच्या चांगुलपणावरील श्रद्धेमुळे तसे करतात की ते पैसे मिळविण्याच्या हेतूने तसे करतात? महात्माजींचा स्वतःचा अशा प्रश्नांशी काहीही संबंध असल्याचे दिसत नाही. ते एवढ्यावरच समाधानी आहेत की, 'खरे ब्राह्मण ते आहेत जे माधुकरीवर जगतात आणि त्यांच्याकडे असलेला आध्यात्मिक खजिना मुक्तपणे वाटतात.' अशा प्रकारे पारंपरिक ब्राह्मण पुरोहित हा महात्माजींना 'आध्यात्मिक खजिन्याचा वाहक' असल्याचे दिसून येते. परंतु पारंपरिक ब्राह्मणाचे दुसरे चित्रही रेखाटता येऊ शकेल. ब्राह्मण विष्णूचा-उत्पत्तीच्या देवाचा- पुरोहित असू शकतो. तो शंकराचा-विनाशाच्या देवाचा-पुरोहित असू शकतो, मानवतेचा सर्वात थोर गुरू, ज्याने प्रेमाचे उदात्त तत्त्व शिकविले त्या बुद्धाची बुद्धगया येथे पूजा करीत असलेला तो पुरोहित असू शकतो, जिची रक्ताची तहान भागवण्यासाठी रोज प्राण्यांचा बळी लागतो त्या काली देवतेचाही तो पुरोहित असू शकतो, तो रामाच्या- क्षत्रिय देवाच्या देवळाचा पुरोहित असेल, तो परशुरामाच्या- ज्याने क्षत्रियांचा नाश करण्यासाठी अवतार घेतला त्या देवाच्या देवळाचा देखील पुरोहित असेल, तो विश्वनिर्मात्या ब्रह्माचा पुरोहित असू शकेल, ज्याचा खुदा अल्ला जगावरील आध्यात्मिक साम्राज्यात भागीदार असल्याचा ब्रह्माचा दावा चालू देणार नाही अशा पिराचा पुरोहित असू शकेल. जीवनातील हे खरे चित्र नाही असे कोणीही म्हणू शकणार नाही. जर हे चित्र खरे आहे तर ज्यांचे गुण इतके विरोधी आहेत त्या देवदेवतांविषयी निष्ठा बाळगण्याच्या ह्या वकूबाबद्दल काय बोलावे, तेच कळत नाही.

कोणताही प्रामाणिक माणूस त्या सर्वांचा भक्त असू शकत नाही. हिंदूंच्या धर्माचा मोठा सद्गुण म्हणजे त्याचा उदारमतवाद, त्याची सहिष्णुतेची भावना; याचा पुरावा म्हणून ते वरील असाधारण परिस्थितीचा हवाला देतात. या वरवरच्या दृष्टिकोणाविरुद्ध असे म्हटले जाऊ शकेल की, हिंदू धर्मात जी सहिष्णुता व उदारमतवाद आहे तो खरोखर उदासीनता किंवा धार्मिक बाबतीत दुर्बल उदारमतवाद याहून वेगळा असणार नाही. या दोन दृष्टिकोणांत त्यांच्या वरवरच्या दिसण्यावरून भेद करणे कठीण आहे. परंतु ते दृष्टिकोण मूलभूतरीत्याच इतके विसंगत आहेत की, त्यांची जवळून तपासणी करणारा माणूस एकाला दुसरा समजण्याची चूक करणार नाही. अनेक देवदेवतांची पूजा करण्यास तयार असलेला माणूस हिंदू धर्माच्या सहिष्णुतेच्या भावनेचा पुरावा म्हणून उदाहरण म्हणून दाखवला जाईल. परंतु तो कसेबसे दिवस काढावयाच्या इच्छेतून जन्मास आलेल्या अप्रामाणिकपणाचा पुरावादेखील असू शकत नाही का? माझी खात्री आहे की, ही सहिष्णहुता केवळ अप्रामाणिकपणा आहे. जर या दृष्टिकोणाचा पाया उत्तम असेल तर कोणी असे विचारील की, एखाद्या व्यक्तीची उपासना करण्याचा व भक्ती करण्याचा ज्याद्वारे हेतू साध्य होतो त्या कोणत्याही दैवताचा पुरोहित व भक्त बनण्यास तयार असलेल्या व्यक्तीकडे कोणता खजिना असू शकतो? असा माणूस सर्व आध्यात्मिक खजिन्याचा केवळ दिवाळखोर आहे एवढेच समजता कामा नये; तर त्याने पुरोहितासारखा इतका उन्नयनकारी व्यवसाय करण्याचे साधे कारण म्हणजे, तो व्यवसाय त्याच्या पूर्वजांचा आहे. धर्माविना, श्रद्धेविना, वडिलांकडून तो मुलाकडे एखाद्या तांत्रिक प्रक्रियेप्रमाणे हस्तांतरित केला गेलेला आहे असे समजले पाहिजे. ते काही शीलसंवर्धन नव्हे. धर्माची सेवा करण्याच्या श्रेष्ठ व्यवसायाचा तो खरोखर वेश्याव्यवसाय आहे.

## ८.

प्रत्येकाने आपापल्या पूर्वजांचा व्यवसाय करावा, या सिद्धांताला महात्माजी का चिकटून आहेत? त्यांनी त्याची कारणे कोठेही दिलेली नाहीत. परंतु त्यांनी ती सांगण्याची पर्वा केली नसली तरी काही कारणे असलीच पाहिजेत. काही वर्षांपूर्वी त्यांच्या 'यंग इंडिया' मध्ये 'जात विरुद्ध वर्ण' या विषयावर लिहिताना त्यांनी असा युक्तिवाद केला होता की, सामाजिक स्थिरतेसाठी जात ही उत्तम संभाव्य तडजोड आहे. या कारणास्तव वर्गपद्धतीपेक्षा जातीपद्धती ही अधिक चांगली आहे. प्रत्येकाने त्याच्या किंवा तिच्या पूर्वजांचा व्यवसाय करीत राहावे, या सिद्धांताला महात्माजींनी चिकटून राहण्याचे जर हेच कारण असेल तर ते सामाजिक जीवनाच्या चुकीच्या दृष्टिकोणाला चिकटून आहेत असे म्हणावे लागेल. प्रत्येकाला सामाजिक स्थिरता

हवी आहे आणि ती स्थिरता प्राप्त करण्यासाठी व्यक्ती व वर्ग यांच्यामधील संबंधात काहीतरी तडजोड केलीच पाहिजे. परंतु मला खात्री आहे की, दोन गोष्टी कोणालाच नको आहेत. त्यापैकी कोणालाच नको असलेली एक गोष्ट म्हणजे स्थिर संबंध. काहीतरी अपरिवर्तनीय, काही तरी सर्व काळासाठी कायम केलेले. स्थिरतेची आवश्यकता असते, परंतु परिवर्तन जेव्हा अत्यंत जरूरीचे असेल तेव्हा त्या परिवर्तनाचा बळी देऊन नव्हे. जातीच्या पायावरील म्हणजे, प्रत्येकाच्या त्याच्या वंशपरंपरागत व्यवसायाच्या पायावरील सामाजिक संबंधाची सुव्यवस्था हे दोन दोष टाळते असे म्हणता येऊ शकेल काय? माझी खात्री पटली आहे की ती (हे दोन दोष) टाळत नाही. ती सामाजिक सुव्यवस्थेच्या दोन्ही तत्त्वांचा म्हणजे गतिमानता व न्यायपरता यांचा अधिक्षेप करीत असल्यामुळे ती उत्तम संभाव्य सुव्यवस्था असणे तर दूरच, ती अत्यंत गर्हणीय व्यवस्था आहे.

## ९.

महात्माजी आता केवळ वर्णावर विश्वास ठेवतात व जातीवर विश्वास ठेवत नाहीत, इथपर्यंत महात्माजींनी पुष्कळच प्रगती केली आहे, असे काहींना वाटेल. महात्माजी हे जातीवंत व खानदानी सनातनी हिंदू होते असा एक काळ होता, हे खरे आहे. त्यांचा वेदांवर, उपनिषदांवर, पुराणांवर व हिंदू धर्मशास्त्रे या नावाखाली जे जे येते त्या सर्वांवर आणि त्यामुळे अर्थातच अवतारांवर व पुनर्जन्मावर विश्वास होता. त्यांचा जातीवर विश्वास होता व त्यांनी एखाद्या रूढीवाद्याच्या जोमाने तिचे समर्थन केले. त्यांनी सहभोजन, सहपान व आंतरजातीय विवाह यांच्या मागणीचा निषेध केला होता आणि सहभोजनाविषयीच्या निर्बंधामुळे मोठ्या प्रमाणात 'इच्छाशक्तीचा विकास करण्यास आणि विवक्षित सामाजिक सद्‌गुणांचे संवर्धन करण्यास उपयोग झाला' असा युक्तिवाद केला होता. त्यांनी आता हा मूर्खपणा टाकून दिला आहे आणि जात ही 'अध्यात्म व राष्ट्र या दोहींच्या विकासाला मारक आहे' हे मान्य केले आहे, हे एक बरे झाले. त्यांच्या मुलाने त्यांच्या जातीबाहेर विवाह केला त्यांचा काही तरी त्याचा दृष्टिकोण बदलण्याशी संबंध असेल. परंतु महात्माजींनी खरोखर प्रगती केली आहे काय? महात्माजी जी भूमिका मांडतात तिच्यानुसार वर्णाचे स्वरूप काय आहे? सामान्यतः समजून घेण्यात आलेली व स्वामी दयानंद सरस्वती आणि त्यांचे आर्यसमाजी अनुयायी यांनी उपदेशिलेली ती वर्णसंकल्पना आहे काय? एखाद्याच्या नैसर्गिक स्वभावाला अनुरूप असा व्यवसाय करणे हा वर्णाच्या वैदिक संकल्पनेचा गाभा आहे, तर नैसर्गिक स्वभावाचा विचार न करता पूर्वजांचा व्यवसाय करणे हा महात्माजींच्या वर्णसंकल्पनेचा गाभा आहे. महात्माजींच्या समजुतीनुसार जात व वर्ण

यांमध्ये काय भेद आहे? मला कोणताही दिसत नाही. महात्माजींनी व्याख्या केल्यानुसार वर्ण हे केवळ जातीचे दुसरे नाव ठरते. त्याचे कारण अगदी साधे आहे : पूर्वजांचा व्यवसाय करणे या बाबतीत तत्त्वतः तो एकसारखा आहे. प्रगती करणे तर दूरच राहो, परंतु महात्माजींनी पीछेहाट केली आहे. वर्णाच्या वैदिक संकल्पनेला हा अर्थ लावून त्यांनी खरोखर जे उदात्त होते ते विडंबनात्मक करून टाकले आहे. या भाषणात दिलेल्या कारणांसाठी वर्णव्यवस्था नाकारत असतानाच मी हे मान्य केले पाहिजे की, स्वामी दयानंद व इतर काहींनी आकलन केलेला वर्णाचा वैदिक सिद्धांत ही विचारी व अनाक्रमक गोष्ट आहे. समाजात व्यक्तीचे स्थान ठरवताना जन्म हा निर्णायक घटक असल्याचे तो मानत नाही. तो केवळ गुण ओळखतो. महात्माजींचा वर्णविषयक दृष्टिकोण वैदिक वर्णाची केवळ निरर्थक बडबड करतो असे नाही, तर तो ती एक उद्वेगजनक गोष्ट बनवतो. वर्ण व जात या दोन अगदी वेगवेगळ्या संकल्पना आहेत. वर्ण हा 'प्रत्येकाच्या गुणानुसार' या तत्त्वावर आधारलेला आहे, तर जात ही 'प्रत्येकाच्या जन्मानुसार' या तत्त्वावर आधारलेली आहे. या दोन्हींमध्ये लोण्यात आणि चुन्यात जसा फरक असावा तसा फरक आहे. वास्तविक त्या दोहोंमध्ये विरोध आहे. प्रत्येकाने त्याचा किंवा तिचा पूर्वजांचा व्यवसाय करावा, यावर महात्माजींचा विश्वास आहे आणि जर त्यांचा तसा विश्वास असेल तर ते जातीव्यवस्थेला वर्णव्यवस्था असे संबोधून जातीव्यवस्थेचे समर्थन करीत आहेत, हे अगदी स्पष्ट आहे. असे करण्यामध्ये ते केवळ अचूक शब्दयोजना न करण्याबद्दल दोषी नाहीत, तर ते त्यायोगे कमालीचा गोंधळ निर्माण करीत आहेत. मला खात्री आहे की त्यांच्या सर्व गोंधळाचे कारण म्हणजे त्यांना वर्ण म्हणजे काय व जात म्हणजे काय आणि हिंदू धर्माच्या जपणुकीसाठी त्या दोहोंपैकी कोणा एकाची कितपत आवश्यकता आहे याची सुनिश्चित स्पष्ट कल्पना नाही. जात हा हिंदू धर्माचा गाभा नाही, असे त्यांनी म्हटलेच आहे आणि त्यांचे मत बदलण्यास त्यांना काही गूढ कारण सापडणार नाही अशी आशा करू या. ते अद्याप वर्ण हा हिंदू धर्माचा गाभा आहे असे मानतात काय? कोणी याचे स्पष्ट उत्तर देऊ शकणार नाही. 'डॉ. आंबेडकरांचे आरोप' या त्यांच्या लेखाचे वाचक 'नाही' असे उत्तर देतील. त्या लेखामध्ये त्यांनी वर्णाचे धर्मतत्त्व हे हिंदू धर्माच्या प्रणालीचा एक अत्यावश्यक भाग आहे असे म्हटलेले नाही. वर्ण हा हिंदू धर्माचा गाभा बनविण्याऐवजी ते म्हणतात, 'सत्य हाच केवळ एकमेव ईश्वर आहे.' या विचारात आणि मानवी कुटुंबाचा नियम म्हणून त्यांनी केलेल्या अहिंसेच्या धीट स्वीकारातच हिंदू धर्माचे सार सामावलेले आहे.' परंतु श्री. संत राम यांना उत्तरादाखल लिहिलेल्या त्यांच्या लेखाचे वाचक म्हणतील, 'होय.' त्या लेखात ते म्हणतात, 'मुसलमान जर कुराण नाकारत असेल तर तो मुसलमान कसा काय राहू शकेल किंवा ख्रिस्ती जर बायबल नाकारत

असेल तर तो ख्रिस्ती कसा काय राहील? जर जात व वर्ण हे परिवर्तनीय शब्द असतील व हिंदू धर्माची व्याख्या करणाऱ्या शास्त्रांचा वर्ण हा एक अविभाज्य भाग असेल तर जी व्यक्ती जात म्हणजे वर्ण नाकारते ती स्वतःला हिंदू कशी काय म्हणू शकेल, हे मला समजत नाही.' हा दुतोंडेपणा कशासाठी? महात्माजी कशासाठी मर्यादा (कुंपण) घालून घेत आहेत? त्यांना कोणाला खूष करावयाचे आहे? सत्य जाणून घेण्यात महात्माजीं अपयशी ठरले काय? की संताच्या मार्गात राजकारणी उभा राहिला आहे? माहात्माजींचा हा गोंधळ का उडाला याच्या खऱ्या कारणाचा बहुधा दोन मार्गांनी शोध घेता येईल. पहिला म्हणजे, महात्म्याजींचा स्वभाव होय. प्रत्येक गोष्टीत त्यांचा बालकाचा साधेपणा आणि स्वतःची फसवणूक करून घेणारी वृत्ती आहे. एखाद्या बालकाप्रमाणे त्यांना ज्यावर विश्वास ठेवावा वाटेल त्या गोष्टीवर ते विश्वास ठेवू शकतील. त्यामुळे ज्याप्रमाणे त्यांना जातीवरील त्यांच्या श्रद्धेचा त्याग करणे आवडले त्याप्रमाणे वर्णावरील श्रद्धेचा त्याग करणे आवडण्याची वेळ येईपर्यंत आपणाला थांबले पाहिजे. गोंधळाचे दुसरे एक उगमस्थान म्हणजे, महात्माजी पर पाडू इच्छित असलेली महात्माजींची व राजकारण्याची अशी दुहेरी भूमिका होय. एक 'महात्मा' म्हणून ते राजकारणाचे आध्यात्मिकीकरण करण्याचा प्रयत्न करीत असावा. त्यांनी त्यात यश मिळवलेले असो किंवा नसो, परंतु राजकारण्याने मात्र त्यांचे व्यापारीकरण करून टाकले आहे. राजकारण्याला माहीत असले पाहिजे की, समाज संपूर्ण सत्य सहन करू शकत नाही आणि त्याने संपूर्ण सत्य बोलता कामा नये. तो जर संपूर्ण सत्य बोलत असेल तर ते त्याच्या राजकारणासाठी वाईट आहे. महात्माजी जात व वर्ण यांना नेहमी पाठिंबा देत आहेत, त्याचे कारण म्हणजे त्यांनी जर त्यांना विरोध केला तर ते राजकारणातील त्याचे स्थान गमावून बसतील, अशी त्यांना भीती वाटते. या गोंधळाचे काहीही कारण असो, महात्माजींना हे सांगितलेच पाहिजे की ते वर्णाच्या नावाखाली जातीचा उपदेश करून स्वतःला फसवीत आहेत व लोकांनाही सवीत आहेत.

## १०.

महात्माजींचे असे म्हणणे आहे की, मी हिंदू व हिंदू धर्म यांची तपासणी करण्यासाठी वापरलेले मापदंड हे इतके कठोर आहेत की, त्या मापदंडांवर उतरण्यास अस्तित्वात असलेला प्रत्येक ज्ञात धर्म कदाचित अपयशी ठरेल. माझे मापदंड हे उच्च आहेत ही त्याची तक्रार खरी असू शकेल. परंत ते उच्च आहेत की नीच आहेत हा प्रश्न नाही. प्रश्न आहे तो लागू करण्यासाठी ते मापदंड योग्य ओत काय? लोक आणि त्यांचा धर्म यांचा परामर्श सामाजिक नीतिशास्त्रावर आधारलेल्या सामाजिक

मापदंडावर घेतला गेला पाहिजे. धर्म ही जर लोकांच्या कल्याणासाठी एक आवश्यक चांगली गोष्ट मानली तर दसऱ्या कोणत्याही मापंडाला काही अर्थच असणार नाही. मी असे म्हणतो की, हिंदू व हिंदू धर्म यांची तपासणी करण्यासाठी मी वापरलेले मापदंड हे अत्यंत उचित मापदंड असून त्याहून अधिक चांगले दसरे कोणतेही मापदंड मला माहीत नाहीत. माझ्या मापदंडाने तपासल्यास ज्ञात असलेला प्रत्येक धर्म बाद ठरेल हा निष्कर्ष खरा असेलही. परंतु ह्या वस्तस्थितीने हिंदूंना व हिंदू धर्माचा कैवारी असलेल्या महात्म्याला, एखाद्या वेड्याच्या अस्तित्वामळे जसे दसऱ्या वेड्याला समाधान मिळते किंवा एखाद्या गन्हेगाराच्या अस्तित्वामुळे जसे दुसऱ्या गुन्हेगाराला समाधान मिळते त्याप्रमाणे समाधान मिळवण्यास आणखी सबब मिळू नये. मला महात्माजींना असे खात्रीपूर्वक सांगावयाचे आहे की माझ्यावर जिचा आरोप करण्यात येतो ती हिंदूंनी व हिंदू धर्माने माझ्यात उत्पन्न केलेली घृणेची व तिरस्काराची भावना हेच केवळ हिंदू व हिंदू धर्म यांचे अपयश नाही. मी जाणतो की, जग हे अत्यंत अपूर्ण जग आहे आणि ज्या कुणाला त्यात राहावयाचे आहे त्याने त्याची अपूर्णता सहन केली पाहिजे. परंतु ज्यामध्ये मला कार्य करणे दैवप्राप्त असेल त्या समाजातील अपूर्णता व उणीवा सहन करण्याची मी तयारी केली असतानाच जो समाज चुकीचे आदर्श जोपासतो किंवा जो समाज योग्य आदर्श असतानाही त्या आदर्शानरूप सामाजिक जीवन घडविण्यास संमती देणार नाही अशा समाजात राहण्याचे मी माय का करावे? मला जी हिंदूंची व हिंदू धर्माची घृणा वाटते त्याचे कारण ते चुकीचे आदर्श जोपासत आहेत व चुकीचे सामाजिक जीवन जगत आहेत याची मला खात्री पटलेली आहे, हेच आहे. माझे हिंदू व हिंदू धर्म यांच्याशी असलेले भांडण त्यांच्या सामाजिक वर्तणुकीतील अपूर्णतेबाबतचे नाही. ते अधिक मूलभूत आहे. ते त्यांच्या आदर्शाबाबतचे आहे.

## ११.

हिंदू समाजाला नैतिक पनरुज्जीवनाची गरज आहे असे मला वाटते. ते पुढे ढकलणे धोकादायक आहे आणि प्रश्न आहे- हे नैतिक पुनरुज्जीवन कोण ठरवू शकेल व कोण त्यावर नियंत्रण करू शकेल? अर्थातच, ज्यांची बौद्धिक उन्नती झाली आहे आणि जे बौद्धिक बंधमुक्ततेपासून उदयास आलेल्या आपल्या मतांविषयी धैर्य ठेवण्याइतपत पुरेसे प्रामाणिक आहेत तेच. या मापदंडानुसार परामर्श घेतला असता हिंदू पुढारी हे माझ्या मते या कार्यासाठी अगदी नालायक ठरतात. त्यांची प्राथमिक बौद्धिक उन्नती झाली आहे असे म्हणणे अशक्य आहे. जर त्यांची बौद्धिक उन्नती झाली असती तर अज्ञजनांसारखे ते स्वतः सहजपणे फसले नसते किंवा ते आता जसे

घेताना दिसतात त्याप्रमाणे त्यांनी इतरांच्या अज्ञानाचा फायदा घेतला नसता. हिंदू समाजाची स्थिती मोडकळीस आलेली असतानादेखील ज्या आदर्शांचा वर्तमानकाळाशी हरतऱ्हेने कसलाही संबंध असण्याचे बंद झाले आहे, जे त्यांच्या आरंभीच्या काळात कितीही योग्य असले तरी आता मार्गदर्शक बनण्याऐवजी धोकादायक बनले आहेत, अशा भूतकाळातील आदर्शांसाठी हे पुढारी बेशरमपणे आवाहन करतील. त्यांना अद्यापिही रूढ आचारांबद्दल कमालीचा आदर आहे. त्यामुळे ते त्यांच्या समाजरचनेचा पाया तपासायला तयार नाहीत– नव्हे त्यांचा अशा कोणत्याही तपासणीस विरोध आहे. हिंदू बहुजन समाज अर्थातच आपल्या श्रद्धा व श्रद्धाविषयांबद्दल तसा बेफिकीर आहे. परंतु हिंदू पुढारीदेखील असेच आहेत. आणि सगळ्यात वाईट काय असेल तर हे हिंदू पुढारी. जेव्हा कोणी त्यांचे श्रद्धांशी असलेले साहचर्य त्यांच्यापासून हिरावून घेण्याचे ठरवतो तेव्हा त्या श्रद्धा टिकवण्यासाठी चवताळून उठतात. महात्माजींचाही त्याला अपवाद नाही. विचार करण्यावर महात्माजींचा विश्वास नाही असे दिसते. ते संतांचे अनुकरण करणे पसंत करतात. एखाद्या जीर्णमतवाद्याप्रमाणे त्यांना अशी भीती वाटते की, एकदा का विचार करायला सुरुवात केली की त्यांनी उराशी बाळगलेले अनेक आदर्श व संस्था पवित्र कल्पनांविषयीच्या त्याच्या आदर्शभावनेबरोबर नाश पावतील. स्वतंत्र विचार करण्याची प्रत्येक कृती हा बाह्यतः स्थिर असलेल्या जगाचा काही एक भाग धोक्यात आणत असते. परंतु हे देखील तितकेच खरे आहे की, संतांवर विसंबून राहणे आपणाला सत्य जाणण्याकडे नेऊ शकत नाही. नाही तरी संत ही माणसेच होती आणि लॉर्ड बॅलफोरने म्हटल्यानुसार, 'मानवी मन हे डुकराच्या नाकापेक्षा मोठे सत्यशोधनाचे साधन आहे.' हिंदुच्या या पुरातन समाजरचनेला आधार देण्याकरिता कारणे शोधण्यासाठी तो जो काही विचार करतो तो म्हणजे मला त्याचा बौद्धिक वेश्याव्यवसाय वाटतो. महात्माजी पुरातन समाजरचनेचा अत्यंत प्रभावी समर्थक आहेत व त्यामुळे ते हिंदूंचा सर्वांत मोठा शत्रू आहेत. महात्माजींपेक्षा वेगळे असे काही हिंदू पुढारी आहेत की, जे केवळ विश्वास ठेवणे, अनुसरण करणे यात समाधान मानत नाहीत. ते विचार करण्याचे आणि त्यांच्या परिणामानुसार कृती करण्याचे धाडस करतात. परंतु बहुजन समाजाला योग्य मार्गदर्शन करण्याचा प्रश्न येतो तेव्हा ते पुष्कळच अप्रामाणिक असतात किंवा उदासीन असतात. बहुतेक प्रत्येक ब्राह्मणाने जातीच्या नियमांचे उल्लंघन केलेले आहे. बूट विकणाऱ्या ब्राह्मणांची संख्या पुरोहितगिरी करणाऱ्या ब्राह्मणांच्या संख्येहून कितीतरी मोठी आहे. व्यापारासाठी ब्राह्मणांनी केवळ त्यांच्या पूर्वजांचा पुरोहिताचा व्यवसाय सोडून दिला नाही तर ते शास्त्रांनी मनाई केलेल्या व्यापारांमध्येसुद्धा घुसले. तरी दररोज जात मोडणारे किती ब्राह्मण जातीच्या विरुद्ध व शास्त्रांच्या विरुद्ध उपदेश

करतील? कारण एखादा प्रामाणिक ब्राह्मण त्याच्या व्यावहारिक प्रेरणेमुळे जात आणि शास्त्रे यांवरील मतांना नैतिक जाणिवेची पुष्टी देऊ शकत नाही. तरी जे हजारो ब्राह्मण जाती मोडतात व शास्त्रे जुमानत नाहीत तेच ब्राह्मण जातीच्या सिद्धांताचे आणि शास्त्रांच्या पावित्र्याचे अत्यंत कडवे पुरस्कर्ते आहेत. हा दुटप्पीपणा का? कारण त्यांना असे वाटते की, जर बहुजन समाज जातीच्या जोखडातून मुक्त झाला तर ते त्यांच्या सत्तेला आणि वर्ग म्हणून असलेल्या ब्राह्मणांच्या प्रतिष्ठेला धोक्याचे ठरेल. बहुजन समाजाला विचार करण्यापासून मिळणारी फळे मिळू न देणाऱ्या या बुद्धिमान वर्गाचा अप्रमाणिकपणा हे अत्यंत लाजिरवाणे दृश्य आहे.

मॅथ्यू अर्नाल्डच्या शब्दांत, हिंदू हे 'दोन जगांमध्ये भटकत आहेत. एक मेलेले जग तर दुसरे जन्म घेण्यास असमर्थ जग.' त्यांनी काय करावे? ज्या महात्म्याकडे ते मार्गदर्शनाची अपेक्षा करतात तो महात्मा विचार करण्यावर विश्वास ठेवत नाही व त्यामुळे जे अनुभवाच्या कसोटीवर उतरू शकेल असे म्हणता येईल असे कोणतेही मार्गदर्शन तो देऊ शकत नाही. ज्यांच्याकडे बहुजन समाज मार्गदर्शनासाठी पाहतो तो बुद्धिमान वर्ग एकतर अगदी अप्रामाणिक आहे किंवा योग्य दिशेने त्यांचे प्रबोधन करण्यास तो अगदी उदास आहे. आपण खरोखर एका मोठ्या शोकनाट्याचे साक्षीदार आहोत. या शोकनाट्याला पाहून सर्वजण केवळ शोक करू शकतील आणि म्हणू शकतील-

'हिंदूंनो ! असे आहेत तुमचे पुढारी !'

★★★